# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

## अनुभवांचे मुक्त संचित

प्रवास म्हटला की एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे, अशी साधी सरळ व्याख्या. जीवन प्रवासात कलाप्रवास, साहित्यप्रवास, सामाजिक, राजकीय, व्यावसायिक प्रवास असेही प्रवास असतात. हे सगळे जोडलेले असतात ते अनुभवांशी. जीवनाशी, निसर्गाशी, देशोदेशीच्या वैविध्याशी. ज्यांना तो आपल्या शब्दात रसाळपणे मांडणे शक्य झाले, त्यांना आपण प्रवासवर्णन म्हणतो. हे प्रत्यक्षात असते जगणे, अनुभवणे. हा अनुभव समोरच्या वाचकाला आपल्या अनुभवांशी जोडून घेतो. ज्यांना जे पाहता, अनुभवता आले नाही, ते या वर्णनातून तो पाहू शकतो. त्या अर्थाने प्रवासवर्णन हे संजयाची भूमिका पार पाडते. 'माझा अनुभव... माझे अनुभव' हे रेखा राव यांचे प्रवासवर्णन तो अनुभव घेऊन आलेले आहे.

**माझा प्रवास... माझा अनुभव**
**रेखा राव**




मनाशी एखादा निश्चय पक्का केला आणि त्याचा प्रयत्नपूर्वक पाठपुरावा केला, तर इप्सित साध्य होण्यास फारसा वेळ लागत नाही. ते साध्य होताना पाहताना अर्थातच होणारा आनंद मोठा असतो. परंतु जेव्हा काही गोष्टी सहजपणे घडून जातात, अपेक्षा केलेली नसताना त्यांचा उपभोग घेण्याची संधी मिळते, तेव्हाच्या आनंदाला मात्र पारावार उरत नाही. रेखा राव यांना मिळालेला आनंद दोन्ही प्रकारांचा आहे. त्यामुळे त्यांना स्वतःला भाग्यशाली समजण्याचे भाग्य लाभलेले आहे. आपण परदेशी जावे, तिकडे राहावे, असा ध्यास असलेल्या राव यांना त्याप्रमाणे प्रथम परदेश प्रवासाची संधी मिळाली ती नैरोबीची. बँकेत असलेल्या श्री. राव यांना तिकडे बदली मिळाली, आणि रेखा राव यांच्या स्वप्नांना पंख लाभले. नैरोबी हे आफ्रिकन शहर, त्याला 'सिटी इन द सन' असे म्हटले जाते. निसर्गसौंदर्याने नटलेले वातावरण. आर्बोरेटम, लिमरू, रिफ्टवॅली, थिका ब्ल्यूपेस्ट,थॉमसन फॉल्स अशा रमणीय स्थळांनी नटलेले. गेमपार्क, नॅशनल पार्क सारख्या स्थळांनी शहराच्या सौंदर्यात भर घातलेली, परंतु महत्वाचा प्रश्न आला तो भाषेचा. त्यांची भाषा स्वाहिली. तिच्याशी परिचय नाही. मग नोकर, दुकानदार, प्रवास, इथे संवाद कसा साधणार? पण ते तेवढेच. देहबोली ही भाषा इथे प्रभावी ठरली. दुसरी अडचण चोरीची. इथे त्यांचे प्रमाण अधिक. त्यामुळे सावधगिरीचे जगणे आले. परंतु हळूहळू सगळ्याच गोष्टींची सवय होते. अवघड वाटणारे जगणे सुसह्य होते. हे व्यक्तिगत अनुभव राव यांनी मोकळ्या मनाने आणि तितक्याच खिलाडू वृत्तीने मांडलेले आहेत. इथे, केनियात भारतीय आहेत. जे स्वातंत्र्यपूर्व काळात तिकडे गेलेले आहेत. त्यांच्या पुढील पिढ्यांनी भारत पाहिलेला नाही, तरी ते स्वतःला विदेशी भारतीय म्हणवून घेतात. सण, परंपरा, रीतिरिवाज, यात भारतीयपण अजूनही पाळले जाते. यांना स्वाहिली भाषेत 'मुयीडी' म्हणतात. परंतु भारतातून नव्याने नोकरीधंद्यांच्या निमित्ताने आलेल्यांकडे पाहण्याची आपुलकी त्यांच्यात अभावाने दिसली, हे निरीक्षण चटका लावून जाणारे आहे. नैरोबी, किसुमु, केनिया, मोंबासा असे वेगवेगळ्या ठिकाणी दहा वर्षांचे वास्तव्य मिळाले. या वास्तव्यात स्थानिकांचे जगणे, जाती, चालीरीती, विवाह संस्था, शिक्षण, कष्टाळूपणा, शासन, शिस्त, लबाडी, यांचा अभ्यास करता आला. त्यांची संस्कृती, आपली संस्कृती यातले अंतर मोजता आले. निसर्ग, माणूस यांच्या सहवासात भरभरून आनंद मिळवता आला. या काळातले कौटुंबिक आयुष्य, आप्तांच्या विरहातील ताणतणाव आणि घरी असलेले नोकर यांचे वर्णनही यात आले आहे.

राव यांनी अमेरिका, मस्कत, श्रीलंका, केरळ असा बराच प्रवास केलेला आहे. मस्कतचे वेगळेपण, अमेरिकेची विविधता, रावणाची लंका, केरळची देवभूमी, अशी प्रत्येकाची स्वतःची वैशिष्ट्ये आहेत, ती त्यांनी सौंदर्यदृष्टीने टिपली आहेत. इतिहास, भूगोल, समजून घेतलेला आहे. त्याच्याशी समरस होऊन त्यातला आनंद मनसोक्त घेतला आहे. वय, शरीर यांची तक्रार वा लोक काय म्हणतील याची पर्वा न करता तरूण होत सारे भरभरून अनुभवले आहे. त्यामुळेच सांगण्यासारखे संचित त्यांच्याकडे साचू शकलेले दिसून येते. सँडी वादळाची भीषणता आपण नुसते ऐकून आहोत, वा टीव्हीवरच्या दृश्यांवर विसंबून विश्वास ठेवला आहे. परंतु अमेरिकेतील हे वादळ त्यांनी झेलले आहे. केवढा मोठा अनुभव!

राव यांचा निसर्गाकडे ओढा किती आहे, याचे अनुमान त्यांनी केलेल्या वर्णनांतून दिसून येते. नायगारा धबधबा पाहताना त्या वर्णन करतात, 'हळूहळू सूर्य जसा वर आला तशी कोवळी किरणं त्यावर पडून पाण्यात असंख्य रुपेरी चांदण्या चमकू लागल्या.' हिवाळ्यात पडलेला बर्फ रस्ते खुले करण्यासाठी बाजूला केला जातो, त्यांच्याकडे पाहून त्या लिहितात, 'अनेक आठवडे हे डोंगर भुतासारखे रस्त्याच्या दोन्ही कडेला उभे असलेले दिसतात. जेव्हा सूर्यनारायणाची कृपा होते तेव्हा या बर्फावर त्याचे किरण पडून हा हिम मोत्यासारखा चमकू लागतो.' अशी अनेक उदाहरणे यात आलेली आहेत.

एका गृहिणीने विविध ठिकाणी केलेला प्रवास आणि त्यानिमित्ताने घेतलेले अनुभव या पुस्तकातून शब्दबद्ध केले आहेत. या लेखांत मांडलेले अनुभव प्रामाणिक आहेत. 'मिशन बॉस्टन' या लेखाच्या शीर्षकाखाली 'लेकीच्या बाळंतपणासाठी मुंबईहून अमेरिकेत' असे टिपण दिलेले आहे. लेकीच्या बाळंतपणासाठी भारतातून नेलेले मेथी–डिंकाचे लाडू अमेरिकेतल्या डॉक्टरी सूचनांमुळे मागे पडले तेव्हा त्या लिहितात, 'मग आम्ही दोघांनी आमची कंबर घट्ट होण्यासाठी हे लाडू संपवले. 'मनाचा मोकळेपणा म्हणतात तो हा. नजरेला जे दिसले, भावले, ज्यामुळे मन मोहरून गेले, वा मनस्ताप झाला, त्यांच्या वर्णनात कुठे डावेउजवे केलेले नाही. सहज सोप्या पद्धतीने समोर बसून अनुभव कथन करावेत, इतक्या सहजपणे हे लेखन लेखन केलेले आहे. त्यामुळे त्यातला प्रवाहीपणा काय राहिला आहे. उगाच कौतुकाचे, परदेशाचे म्हणजे सगळे चांगलेच असते हो, असा गोड गैरसमज कुठे येऊ दिलेला नाही. अनुभव हे अनुभवाच्या पातळीवरून जसे जगता येतात, तसे ते कथनही करता येतात, हे या लेखांमधून दिसून येते. सतीश भावसारांनी प्रवासात टिपलेल्या फोटोंचा एकत्रित संगम करून सुंदर आकार मखपृष्ठाला दिला आहे.

**मूल्य १६० रु. सवलतीत १०० रुपये**




# ग्रंथपान

**लाखातली एक**
**चित्रा मेहेंदळे**




## आठवणीचा सकारात्मक गोफ

''मला कधी कधी वाटतं की आपण रोजच्या जीवनात उगाचच साध्या साध्या गोष्टीत टेन्शन घेत असतो. 'टु बी ऑर नॉट टु बी' असे काही जीवनमरणाचे प्रश्न प्रत्येकवेळी नसतात. पण आपण उगीच गोंधळतो, पटकन निर्णय घेत नाही आणि मग आपलेच टेन्शन वाढवतो.'' हे सत्य सांगण्यासाठी कुठल्या मानसशास्त्रज्ञाची आवश्यकता नाही. अगदी साधे व्यवहारीकपणे जगण्याकडे पाहणे आहे. हे पाहणे थोडसे मोकळ्या मनाने असावे. तटस्थपणे स्वतःच स्वतःकडे आत डोकावून पाहिलेले असावे. बस्स! पहा, जगण्यातला फरक किती जाणवू शकतो. जगणे आणि मरणे यातली ही सीमारेषा आहे. सर्कशीतला कसरतपटू प्रत्येक खेळागणिक जीवनमरणाच्या सीमारेषेवरून येतो, असे कुसुमाग्रजांनी म्हटलेले आहे.तो परत येतो हे महत्त्वाचे. त्याचे निर्णय, पाहण्याचा दृष्टिकोन हे निश्चित असतात, हे त्याचे कारण. चित्रा मेहेंदळे तेच सांगत आहेत, 'लाखातली एक' या पुस्तकातून.

चित्रा मेहेंदळे या स्वतःचा उल्लेख 'लाखताली एक' असा करतात. स्वतःच्या वेगळेपणासाठी ही बिरुदावली केव्हाही अभिमानाची ठरते. लाखातली एक या नजरेने कुणी पाहत आहे, ही गोष्ट तर अंगावर, मनावर मोरपीस फिरवणारी ठरते. परंतु मेहेंदळे ज्या लाखातली एकची गोष्ट सांगताहेत, ती ना मोरपीस फिरवणारी आहे ना मोहरून टाकणारी आहे.ती आहे सगळ्या सुंदर, मनोज्ञ, पारंपरिक कल्पनांना छेद देणारी गोष्ट.जिच्यापासून प्रत्येकजण पळण्याचा, बचावाचा पवित्रा घेतो अशी गोष्ट. फुलांच्या राशीऐवजी काट्यांच्या राशी तुडवणारी गोष्ट. तरीही स्वतः वरचा भरोसा आणि जगण्याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन या गुणांच्या दृढ निश्चयामुळे त्यांना स्वतःविषयी ठामपणे म्हणता येते, होय आहे मी 'लाखातली एक'!

चित्रा मेहेंदळे यांना कॅन्सर या शब्दाने ओळख दिली, ती दुसऱ्या स्त्रीला झालेल्या ब्रेस्ट कॅन्सरमुळे. तिचे वर्णन ऐकून स्वतःची चाचपणी करून पाहिली. तिथे शंका डोकावली. डॉक्टरांचे उपचार आलेच. ग्रंथी निघाल्या मांसांच्या. पण रिपोर्ट आला तो 'नो मॅलिग्नन्सीचा'! शंकेपासून ते रिपोर्ट नकारात्मक येण्यापर्यंतचा प्रवास म्हणजे अनेक भावभावनांचा.ते साल होते १९७२. त्यापूर्वी झाले ते आजार सुद्धा लाखात एक ठरावेत असेच. प्रथम झालेला आजार म्हणजे घटसर्प! ते साल होते १९५९. इथून त्यांची आणि आजारांची जणू मैत्रीच झाली. आले ते आजार हे लाखातली एक ठरावी, अशा इराद्यानेच जणू. टॉन्सिल, नाकात रंगीत खडा फसणे, डोळ्यात पंख्याच्या ऑईलपेंट जाणे, चामखीळ, अक्कलदाढेचे आडवे येणे, कुणीतरी भिरकावेलेल्या दगडाने डोक्याला खोक पडणे, मनगटावर गँगलिऑन होणे, मानेवर टीबीची गाठ येणे, असे सतत काहीना काही आजार. प्रत्येकवेळी दवाखाना, ऑपरेशन ठरलेले. प्रत्येक वेळी कॅन्सरची शंका. असा 'कॅन्सर' या शब्दाने चाळीस वर्षे त्यांचा पाठलाग केला. प्रत्येक आजाराच्या वेळी 'देअर इज नो एव्हिडन्स ऑफ मॅलिग्नन्सी', असे रिपोर्ट येत. हुश्श वाटायचे. परंतु शेवटी तो एकदाचा आलाच भेटीला. सुटले एकदाची, ही त्यावरची प्रतिक्रिया! या सगळ्यांतून जाताना शाळा, कॉलेज, प्रेम, लग्न, मुलांचे जन्म, त्यांचे शिक्षण हे सोबत होतेच.ते सारे निभावून आजारांशी सामना चालू. नंतर तर परतवूनच लावले. परंतु हे परतवून लावणे, स्वत:ला सावरणे अवघड होते. हा आजाराशी जसा लढा होता, तसा स्वतःशीच स्वतःचा होता.जीवन मरणाचा लढा होता, सीमारेषेवर उभे राहून खेळण्याचा. यात आईवडिलांनी खंबीरपणे साथ देणे, पतीचे ठाम उभे राहणे, प्रेमाला कुठे उणेपण येऊ न देणे, मुलांचे अभ्यासात हुशार असणे, परदेशात स्थायिक होणे, या गोष्टी आत्मबळ वाढवणाऱ्या ठरल्या. कौतुकाच्या, जिव्हाळ्याच्या गोष्टी कायम पाठीशी राहिल्या, ही जमेची बाजू. परंतु आजारपणातले दिवस आनंदी करण्यास इतकेच पुरेसे ठरत नाहीत. स्वत:ला कुठेतरी सतत गुंतवून ठेवावे लागते. छंद, आवड यांची जोड द्यावी लागते. त्याचा अंगिकार केला. सतत वाचन करणे, कविता लिहिणे, ओरिगामी, रांगोळ्या यात मन गुंतवणे, त्यासाठी मुद्दाम अभ्यास करणे, आणि या छंदात प्राविण्य मिळवून पारितोषिके मिळविणे, इतपर्यंत प्रवास त्यातून झाला. हा सगळाच प्रवास वेधक आहे आणि तितकाच स्वत्वाची परीक्षा पाहणारा आहे.

लेखनासाठी वापरलेली शैली वेगळ्या धाटणीची आहे. ऑपरेशन थिएटरमधून बाहेर आल्यानंतरचे वातावरण तसे गंभीर, क्लेशदायक असते. परंतु मेहेंदळे तिकडे लक्ष केंद्रित करीत नाही. तर त्या आपला भूतकाळ जागा करतात. आठवणींचे सुंदर गोफ विणत राहतात. लेखनातला मोकळेपणा आणि मनाचा मोकळेपणा, यामुळे वाचकाला एकाचवेळी दोन पातळीवरचे अनुभव अनुभवता येतात.त्यात आलेले तत्वज्ञान हे काही ओढूनताणून आणलेले नाही, ते अनुभवातून बाहेर आलेले आहे. त्यात सहजपणा पेरलेला आहे. माझा आजार, माझे दुखणे, हे रडगाणे नाही, आहे ते जीवनगाणे, जगण्याचे गाणे. 'अजिबात जाणवत नाही मला पसरू चाललेला काळेख घनदाट। माणुसकीचे उत्तम नमुने घेऊन येणार आहे नवी रम्य पहाट।।' अशा कवितेच्या उत्तम ओळी त्या लिहून जातात. स्त्रीसुलभता आणि लाज या एकमेकींच्या गळ्यात गळा घालून नांदणाऱ्या सख्ख्या संकोची मैत्रिणी. परक्याच्या समोर काय, डॉक्टरच्या समोरही त्यांची ताटातूट करायला मन धजावत नाही. त्याविषयी त्या लिहितात, 'एकदा बाईची आई झाली की ही सर्व लाज कुठल्याकुठे जाते. एका डिलिव्हरीत प्रत्येक स्त्रीला हा अनुभव येतो... आईपण असे खूप काही शिकवून जाते.'

सुंदर धवलकांतीचे गुलाबपुष्प, कुणाच्याही मनाला मोहिनी घालते. परंतु नेमका याच फुलाच्या देशाला विळखा बसलेला दिसला तर? तर मन थरथर करायला लागते.पण या विळख्याची तमा न बाळगता सूर्य किरणांचे स्वागत करण्यासाठी हे पुष्प उमलत जाते, तेव्हा ती ठरते, लाखातली एक गोष्ट. शीर्षक सार्थ करणारे हे मनोवेधक मुखपृष्ठ साकारले आहे सतीश भावसार यांनी.

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रुपये**




# ग्रंथपान

**मनतरंग**

**दीपक घैसास**




## विचारांचे मनस्वी तरंग

लेखक लिहितो म्हणजे काय करतो, हा प्रश्न अनेकांना पडतो. त्याचे साधे उत्तर आहे, तो मनातले विचार अनुभवांच्या पातळीवर तपासून कागदावर उतरवतो. हे उतरवलेले विचार घटनांचे, अनुभवांचे, नातेसंबंधांचे विविध रंग घेऊन येतात. साध्या–साध्या गोष्टींच्या निरीक्षणातून वेगळे कल्पित आकाराला येते. फक्त त्यासाठी हवी ती तरलता, निर्मळपणा, प्रगलभता, आणि तितकीच सहजता. हे सूत्र सर्वच ठिकाणी लागू होईल असे नाही, परंतु दीपक घैसास यांचे 'मनतरंग' हे पुस्तक या सुत्राला अधोरेखित करणारे आहे, असे विश्वासाने म्हणता येते.

गुलमोहोर हा रस्त्याच्या कडेला उभा असलेला संन्यस्त वृक्ष आपल्या चांगल्याच परिचयाचा आहे. त्याची रूपे ऋतूंप्रमाणे कधी मोहक, प्रसन्न, तर कधी उदास करणारी भासतात परंतु त्याच्यावर पक्षी कधीही घरटी बांधीत नाहीत, हे सत्य उमगते ते या लेखातून. लेखकाचा त्याच्याशी जुळलेल्या आंतरिक नात्याचा जिव्हाळा तर अंतर्मुख करणारा आहे. लेखकाने या वृक्षाचे केलेले वर्णन हेही तितकेच सुंदर आहे. 'वसंताच्या हिरव्या जंगलात लाल रंगाने भरलेला गुलमोहोर उठून तर दिसतोच, शिवाय जणू त्याने आपले प्रत्येक पान इतर वृक्षांना देऊन त्या बदल्यात त्यांची फुले आपल्याकडे आणल्याचा मला भास होतो.'

जॅकफ्रूट, पलापझम, कटहल, कंथाल, पनसम, मिट, नंग्का, कनून अशी अनेक नावे असलेले फळ म्हणजे फणस. वेगवेगळ्या देशांनी दिलेली आणि वेगवेगळ्या भाषेतली ही नावे. तामिळनाडूत आंबा आणि केळी यांच्याबरोबरीने तीन पवित्र फळांमध्ये मान आहे तो फणसाला. बांगला देशाचे हे राष्ट्रीय फळ आहे. ही माहिती मिळते ती 'फणस' या लेखातून. तीच गोष्ट सोन्याची. यात दिलेली आकडेवारी थक्क करणारी आहे. लग्न, बारसे, सणासुदी, गुंतवणूक, अडीअडचणीची सोय, भेट, आवड, अशी सोने खरेदी करण्यामागची कारणे. त्यांची माहिती टक्केवारीसह या लेखात आहे. जगात भारताचा सोने खरेदीत हिस्सा २६ टक्के आहे, हीही बाब उघड होते ती इथे. अधिकमासाची संकल्पना आणि त्यामागचे खगोलशास्त्र, पंचांग आणि गणितातील अचूकता यात भारताची आघाडी अधोरेखित केलेली आहे. कार्तिकेय यांनी विश्वप्रदक्षिणा केली ती मोरावर बसून. तर गणपतीने आपल्या आईवडिलांनाच विश्वरूप देऊन त्यांच्याभोवती प्रदक्षिणा घातली, ही पुराणकथा सर्वांना ठाऊक आहे. परंतु यात भेद आहे तो अभिप्रेत असलेल्या कल्पनेचा. कार्तिकेयाची प्रदक्षिणा ही सर्वसामान्यांना अभिप्रेत असलेली आहे. आणि गणपतीला स्वतःला अभिप्रेत असलेली कलपना ही भावविश्वाची आहे. चौकटी बाहेरचा विचार करून कुठलीही गोष्ट केली तर यशाची शक्यता अधिक असते, ही यातून लेखकाने दिलेली सूचकता कुणालाही आपलीशी वाटल्याशिवाय राहणार नाही. पाप आणि पुण्य यात समाजाची कशी फरफट चालू आहे, याविषयी 'पुण्याचे दुकान' या लेखात वास्तव मांडलेले आहे. पुण्य नावाचा शब्द इंग्रजी शब्दकोशात नाही म्हणजे पुण्य या शब्दाचे अस्तित्वहीनत्व लक्षात येते. तरीही जग त्याच्याच मागे कसे धावते, गाईला हिरवा चारा देऊन पुण्य कसे मिळवले जाते, हे श्रद्धेचे लक्षण आहे की अंधश्रद्धेचे? असा प्रश्न प्रत्येकाला पडावा. तीच गोष्ट श्राद्धाची. धर्मातील रुढीची सवंगता. मूळ शब्द आहे श्रद्धा परंतु तो झाला श्राद्ध. ही गफलत आणि त्या जोडीने आलेले संस्कृतीतील नियम, यांची सांगड कशी मूळ धरून आहे हे 'पितृपक्ष' या लेखात वाचायला मिळते. निळा चंद्र ही संकल्पना तशी मजेशीर म्हणायला हवी. ती आहे चंद्र पौर्णिमेशी जोडलेली. एकाच महिन्यात दोनदा पौर्णिमा आली तर दुसरी पौर्णिमा, किंवा एका तिमाहीत चारदा पौर्णिमा आली तर तिसरी पौर्णिमा ही निळ्या चंद्राची पौर्णिमा समजली जाते. 'आज सूर्य कुठे उगवला?' तर इंग्रजीत 'वन्स इन ब्ल्यू मून' असा वाक्प्रचार आला तो या निळ्या चंद्रावरून. रात्रीचे सण या लेखात नवरात्री विषयी सुंदर वर्णन केलेले आहे. गरबा हा पारंपरिक नवरात्रीतला नाच. गर्भ या शब्दापासून आलेला गरबा हा शब्द. मधोमध गर्भदीप लावून त्याच्याभोवती फेर धरत नाचायचा सण. घरोघरी ज्योतिकलश लावायचा उत्सव. माणसाला सतत पडणारे प्रश्न आणि त्यांची मालिका, परंतु न सापडलेली उत्तरे; सावरकरांचे ' सागरा प्राण तळमळला...' या कवितेचे उगमस्थान त्यामागील भावविभोरता, बाजीरावाचे अखंड अपराजित असणे, असे अनेक लेख आहेत, जे वाचताना हरखून जायला होते.

'सकाळ' मध्ये प्रकाशित झालेल्या लेखांपैकी निवडक लेखांचा हा संग्रह आहे परंतु वाचत असताना तो रतीब घातल्यासारखा एकसुरीपणा दाखवत नाही. प्रत्येक विषय वेगळा, अनुभव वेगळे, आणि त्यासाठी केलेला अभ्यास, हे सारे वाचत असताना ठळकपणे जाणवत राहते. वृत्तपत्रीय लेखनाला शब्दांची मर्यादा असू शकते, परंतु विचारांना आणि विषयांना मर्यादा नसते. ती पाळूनही लालित्य जपण्यातला तरलपणा कसा असतो, याचाच जणू हे लेख प्रत्यय देत राहतात. जाता–जाता नवीन काही देऊन जातात.

या संग्रहातील प्रत्येक लेख स्वतंत्र आहे. आशयात उजवेपण आहे. मांडणी, शैली यांचे भान उत्तमपणे जपलेले आहे. त्यामुळे लेखांचा शेवट होईपर्यंत लेखकाची पकड त्यावर कायम राहिलेली दिसते. एक चांगला लेखसंग्रह वाचल्याचा आनंद 'मनतरंग'ने दिला असे हमखास म्हणता येते.

मनतरंग हे मनातल्या विचारांचे रंग दाखवणारे पुस्तक. विविध छटा असलेले. हे रंग इंद्रधनुष्यात एकत्रित सापडतात, तसे मोराच्या पिसाऱ्यावर. सतीश भावसार यांनी अलगद तेच पीस मुखपृष्ठासाठी निवडले. देठाला लेखणीचे रूप बहाल केले. आणि बाजूला मनातला लहानसा पक्षी. हे मुखपृष्ठ पाहताच मनाला भुरळ घालणारे.

**मूल्य १८० रु. सवलतीत ११० रुपये**




# ग्रंथपान

**मला उमगलेला पुरुष**
**संपादन : अरुण शेवते**




## पुरुष : उमगलेला–न उमगलेला!

मुलगा, भाऊ, पिता, आजोबा ही पुरुषांची पारंपरिक रूपे. मित्र, शिक्षक, सहकारी, प्रियकर ही दुसरी रूपे. या सगळ्यांत वावरणारा पुरुष प्रत्येक वेळी एकसारखा असण्याची शक्यता नाही. तसे त्याचे अनुभवही सारखे असण्याची शक्यता नाही. अनेक भूमिका, रूपे, पैलू, गुणावगुण, वेळ काळ आणि प्रसंगानुरूप होणारे बदल या सगळ्यांचा तो लोलक म्हणता येईल. नजरेच्या परिप्रेक्ष्यातून दिसणारा रंग प्रत्येक वेळी वेगळा असेल. अशा पुरुषाशी आयुष्यभराचा संबंध, सहवास असलेल्या स्त्रीला तो कसा उमगला, त्या अनुभवांची एकत्रित गुंफण असलेला संग्रह म्हणजे 'मला उमगलेला पुरुष.'

या लेखसंग्रहात दहा लेख आहेत. त्यांच्या लेखिका आहेत ज्योत्स्ना संभाजी कदम, मल्लिका अमरशेख, नीला सत्यनारायण, डॉ. प्रतिभा इंगोले, लीना मेहेंदळे, डॉ. वृषाली किन्हाळकर, रझिया पटेल, रश्मी करंदीकर, मेघना पेठे आणि प्रतिभा रानडे. कर्तृत्व, प्रतिभा, क्षेत्र, अनुभव असा समृद्ध वारसा असलेल्या या लेखिका आहेत. त्यामुळे निरीक्षण, अनुभव, अभ्यास, चिकित्सा, अशा विविधांगी पैलूंचे दर्शन या संग्रहात तर घडते.

पिता हा पहिला पुरुष असतो ज्याची ओळख मुलीला प्रथम होते. आदर्श, संस्कार, शिक्षण–शिकवण, स्वभाव, वृत्ती, माणूसपण हे सारे संचित आयुष्यावर प्रभाव टाकणारे ठरते ते पित्याचेच. यातून जी प्रतिमा मुलीच्या मनात निर्माण होते, त्यातून ती जगातील इतर पुरुषांकडे पाहायला शिकते. पुरुष या भूमिकेचा मानदंड तिच्या मनात तयार होतो तोही पित्याकडे बघूनच. रश्मी करंदीकरांचे हे मनोगत कुणालाही आपले वाटावे इतके चपखल आहे. बहुतेक लेखांतून 'पिता' या व्यक्तीने दिलेल्या वारशाविषयी आपुलकीने लिहिलेले दिसून येते. परंतु त्याचवेळी प्रतिभा रानडे ना.सी. फडके यांचा अनुभव पुढे करतात. त्यांच्या कमलाशी लग्न करून घरातून निघून जाण्यामुळे पंधरा वर्षांची लेक मात्र टवटवीत केळ करपून जावी तशी उन्मळून पडली. तर त्याच्या उलट दुर्गाबाई भागवत यांचे वडील; ऐन तारुण्यात पत्नीचे निधन झाले तेव्हा दुसरे लग्न करण्याचा विचार त्यांच्या मनात आला नाही. तीन मुलींचा सांभाळ तर केलाच परंतु त्यांना परावलंबित्व येऊ नये म्हणून आयुष्यभराची बेगमी करून ठेवली. त्यामुळेच नीला सत्यनारायण लिहितात, 'खरा पूर्ण पुरुष, पुरुष आणि स्त्री या दोघांचे गुण घेऊनच असतो आणि म्हणूनच तो परिपूर्ण असतो हे माझ्या वडिलांकडे पाहून जाणवले.

घरात स्त्रीच्या आयुष्यात दुसरा पुरुष असतो तो भाऊ. स्त्रीसाठी फार वेगळे असे प्रेम घेऊन येणारा. मात्र बऱ्याचदा संरक्षण या भूमिकेत अधिक जागरूक दिसणारा, धाक, बंधने घालणारा असाते. समान वयाच्या वृत्तीतून हे वागणे होते, परंतु त्याचवेळी दुसऱ्याची बहीण ही आपलीही बहीण असावी, या न्यायाला हरताळ फासताना दिसतो.

तिसरा पुरुष असतो नवरा–पती, ज्याच्यासाठी जन्मभराचा वा जन्मोजन्मीचा संबंध जोडला जातो. या व्यक्तीविषयी स्त्रीची अपेक्षा असते, पुरुषोत्तम असण्याची. हळुवारपणाने बाईला फुलवणारा रोमँटिक तरी बुद्धिमान, वात्सल्यपूर्ण, समजूतदार तरी कर्तृत्ववान अन् कामसू. परंतु प्रत्येकीच्या वाट्याला ती अपेक्षा पूर्तता करणारा पुरुष येतोच असे नाही. उलट अपेक्षा ठेवणारे, संशयी, मदत करणारे, दुय्यम स्थान देणारे, भावना न समजणारे, समजून न घेणारे, धोका देणारे, कौतुक करण्यात जीभ जड असणारे, उद्धाराची भूमिका घेणारे, अवलंबून असणारे, हक्क गाजवणारे, भोगवस्तू समजणारे, असे नाना प्रकारचे स्वभाव असणारे हे पुरुष. त्यांचा थांग लागणे कठीण, मात्र मनापासून प्रेम करणारा, आधार देणारा, स्त्रीत्व आदराने जपणारा संभाजी कदम यांच्यासारखा कलावंत निराळाच. आत्मसन्मान देणारा नामदेव ढसाळ वेगळा. परधर्म, सामाजिक विरोध यांना तोंड देणारा संवेदनशील श्रीकांत वेगळा. रझियाला कोसळण्यापासून वाचवणारा श्रीकांत मोठा ठरतो.

मुलगा, मित्र या रूपातही पुरुष स्त्रीच्या आयुष्याला व्यापणारा दिसतो. त्याच्या भूमिकेविषयीची विश्लेषणे वेगवेगळी आहेत. परमजितसारखा निखळ मित्र मिळणे ही मलिकासाठी मोठीच जमेची बाजू आहे.

'ऋतुरंग' दिवाळी अंकातील हे लेख पुस्तकरूपाने वाचकांच्या हाती देण्याचे श्रेय जाते ते संपादक अरुण शेवते यांच्याकडे. एक विषय घेऊन माणूस, नाते, संस्कृती यांचा शोध घेत जाण्याची त्यांची उत्कंठा वाचकांना गेली पंचवीस वर्षे खिळवून आहे. प्रस्तुत लेखसंग्रह हा त्याच रांगेत बसणारा आहे. आपल्याला दिसलेला 'पुरुष' हा वेगवेगळ्या भूमिकेत वावरणारा असेल, परंतु त्याचे माणूसपणे कसे भावले, उमगले हे उत्कटपणे मांडले आहे. जीवनाचा धावता आढावा त्यातून घेतल्याचे जाणवत राहते. आशयाला थेट भिडल्याने अस्सल अनुभवांची शिदोरी वाचकांच्या हाती आली आहे. रानडे, कानिटकर, दुर्गाबाई, ना.सी. फडके, खलिन जिब्रान, मर्ढेकर, विंदा यांच्या संदर्भांनी लेखांच्या सौंदर्यात भर घातलेली आहे.

प्रत्येक लेखाच्या सोबत रेखाचित्र दिलेले आहे. शीर्षकाच्या आशयाशी जुळणारे. तसेच चिनार वृक्षाचे बहुरंगी पान मुखपृष्ठासाठी साकारलेले आहे. एका लोलकातून हे रंग कसे भासतात, ही कल्पना अंतरंगात डोकावण्यास उद्युक्त करणारी आहे. सतीश भावसारांनी ही उत्तम रेखाचित्रे आणि मुखपृष्ठ साकारलेली आहेत.

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## पावन प्रीतीच्या रक्तिम सावल्या

**स्मिता भागवत**




### एका समर्पितेची कहाणी

'क्षत्रियत्वासाठी शराबची होती त्याहून अधिक गरज होती आमच्या समस्या समजून घेण्याची क्षमता असलेलया सहचरीची! मस्तानीची! विधात्याने आम्हास तलवार पेलण्याची शक्ती दिली तरी मनापासून मुक्ती नाही दिली! नशेत समस्येचे हंगामी विस्मरण होते. पण नशा उतरल्यावर? चिरंतन पाठबळ समर्पिताच पुरवू शकते. मस्तानी यवनकुळात जन्मली म्हणून आम्ही काळजाच्या जखमासाठी असलेले एकमेव मलम नाकारणार नाही. राजकाजाचे तणाव काळजास आग लावतात तेव्हा तुमच्या वहिनीसमक्ष आमचे ओठ नाही खुलत! समस्या समजण्याची क्षमता नसणे हा त्यांचा गुन्हा नाही. काशीजवळ आहे अलोट प्रेम! आम्हास ईश्वर समजून पुजणाऱ्या वहिनीसाहेब आणि मानव समजून आमच्या जखमेचे मलम ठरणारी मस्तानी यात फरक करू नका.'

स्मिता भागवत यांची ही 'पावन प्रीतीच्या रक्तिम सावल्या' कादंबरी ग्रंथालीने नुकतीच प्रकाशित केली आहे. ही कादंबरी अगोदर 'श्वेत प्रेमनां रक्तिम पडछाया' या नावाने गुजराती भाषेत प्रकाशित झालेली असून तिला गुजरात साहित्य परिषदेचा १९९५ सालचा सर्वश्रेष्ठ कादंबरीचा पुरस्कार मिळालेला आहे. त्याच कादबरीचा प्रस्तुत अनुवाद मराठीत आला आहे. गुजराती, मराठी आणि इंग्रजी अशा तीनही भाषांवर प्रभूत्व असलेल्या स्मिता भागवत यांची आजवरची एकूण ग्रंथसंपदा ३०च्या वर पोहोचली आहे. विविध विषयांवर त्यांनी लेखन केलेले आहे. अमेरिका स्थित असलेल्या भागवत यांना मागच्याच वर्षी त्यांच्या 'सावन घन बरसे' या तानसेनवरील कादंबरीला महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा 'सरफरोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार'लाभलेला आहे.

बाजीराव आणि मस्तानी यांच्या प्रीतीच्या गाथा अनेकदा वाचनात आल्या आहेत. अनेकांनी त्यावर लिहिले आहे. तरीही हा विषय कधी अवीट वा कालबाह्य झालेला नाही. प्रत्येकाने याची वेगवेगळी बाजू वाचकांच्या समोर मांडलेली आहे. याच विषयावर सिनेमा आला त्यावेळीही बराच गदारोळ झाला होता. पैकी मस्तानी कुटुंबीयांनी मस्तानीची प्रतिमा मलीन होणार नाही, यासाठी आग्रही असणे स्वाभाविक होते. परंतु ती प्रतिमा मलीन होणार कशी. एका उदात्त आणि समर्पित भावनेची ही प्रतिमा आहे. प्रेम, प्रेमभावना आणि त्याग हेच लेणे घेऊन आलेली मस्तानी कुलीन स्त्री इतकीच उच्च दर्जाची आहे. केवळ जन्माने ती यवन आहे, नर्तिका आहे हा तिचा दोष कसा असू शकतो. यवन असूनही ती मराठी छात्र धर्माची पूजा बांधते, ज्याच्याशी नाते जोडले आहे त्याच्या रीतीरिवाजांशी समरस होण्याचा प्रयत्न करते, बाजीरावास सर्वस्व मानते. त्याच्यासाठी सर्व काही सहन करायची तयारी ठेवते, त्याला सामोरी जाते. हे थोरपण प्रीतीच्या रंगाना गहिरे करणारे आहे. काशीबाई या बाजीरावाच्या पत्नी. पत्नी धर्मात ना त्या कमी आहेत, ना बाजीरावाने त्यांना कधी अंतर दिलेला. उलट त्यांच्यावर तितकेच प्रेम आहे जे मस्तानी येण्यापूर्वी होते. परंतु या प्रीतीला कलहाचे गालबोट लागत गेले ते इतरांच्या मुळे. ब्राह्मणांनी केलेले भडक आरोप, थेट भ्रष्टतेचा आरोप करीत बहिष्कार टाकण्यापर्यंत मजल जाते. ज्या बाजीरावाच्या शौयामुळे पुण्यातील सर्व ब्राह्मणवर्ग सुरक्षित आहे, अखंड हिंदुस्थान मराठी अंमलाखाली आहे, ते त्याचे क्षात्रतेज विसरून प्रीतीच्या आड उभे राहण्यात फुशारकी दाखवतात. त्यातून शनिवारवाडा सुटत नाही. तोही या तापलेल्या वातावरणात सहभागी होतो. मस्तानीचा काटा काढणे, बाजीरावाच्या आयुष्यातून तिला दूर करण्याच्यासाठी मारेकरी घालण्यासारखे कारस्थान करतो. हे सारे बाजीराव आणि मस्तानीसाठी जीवघेणे ठरते. उरले छत्रपती, तेही मागे राहात नाहीत. रणांगण आणि खाजगी यांच्या लढाईत सापडलेल्या या उभयतांचा झाला तो छळच. त्यांना कुणी ना समजून घेतले ना त्यांच्या भावनांची कुणी कदर केली. झाली ती उपेक्षाच.

बाजीरावाने दाभाड्यांचा अडसर दूर करताना भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व दिलेले आहे. त्याचप्रम ाणे बाजीरावाची निजामाशी ठरलेली भेट ही एक मोठी घटना आहे. यापाठी छत्रपतीचे कारस्थान हा आणखी वेगळा अनुभव. त्यामुळे संपूर्ण शनिवारवाडाच काळजीत सापडतो. परंतु बाजीराव या घटनेकडे वेगळ्या नजरेने पाहतो, तेही स्वतःवर असलेल्या विश्वासामुळे. लढाईच्या रणांगणात कधीही हार न पत्करलेल्या बाजीरावास स्वकीयांकडून मात्र पराभव पत्करण्याची वेळ येते. परंतु बाजीराव स्वतःच्या मताशी आणि निर्णयाशी ठाम राहतो. आणि कितीही संकटे आली तरी मस्तानीही बाजीरावासाठीच सर्वस्व पणाला लावण्याची तयारी ठेवते. त्या दृष्टीने एक अलौकिक अशी प्रेमकहाणी आहे, परंतु तिला रक्ताचा गंध लागलेला आहे.

या कथानकात येणाऱ्या इतर ठळक व्यक्तिरेखा म्हणजे चिमाजी आप्पा, गोपिकाबाई, राधाकाबाई, शिऊबाई, भिऊबाई, अन्नपूर्णाबाई, विरूबाई, छत्रपती शाहू महाराज. यांचे स्वभाव, त्यानुसार त्यांचे आचरण, आपसातले संबंध, यांचे ठळकपण लक्षात राहावे इतके उत्कटपणे दाखविलेले आहेत. भाषेचा आणि विचारांचा ओज लक्षात राहावा असा आहे. वर दिलेले वाक्यच नव्हे तर जागोजागी त्यांचे वेगळेपण वाचताना मनाची पकड घेते. 'कुठे जन्म घ्यायचा ते ठरवण्याचा हक्क कुणालाच नसतो. मस्तानी यवन असल्याचे भांडवल करणे अयोग्य आहे.' यातच सारे आले.

पुण्याचे केळकर, त्यांच्या केळकर म्युझियममध्ये मिळालेला दस्तऐवज आणि त्याकाळचे वैभव दाखवणाऱ्या वस्तू यांचा फायदा लेखिकेला योगायोगाने मिळाला आणि त्यांचे त्यांनी सोने केले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सतीश भावसार यांनी करारी बाजीराव आणि त्यांच्याशी नाते जोडलेली मस्तानी यांचे सुरेख मुखपृष्ठ साकारले आहे.

**मूल्य ४०० रुपये ● सवलतीत २०० रुपये**

# ग्रंथपान

## समाजाचा आणि माणसांचा भावस्पर्शी वेध

पत्र लिहिताना काही संकेत पक्के झालेले होते. त्यातला एक होता मायन्याची सुरुवात. म्हणजे पत्र लिहिताना जे मजकुराचे पहिले वाक्य लिहिले जायचे ते असायचे, 'पत्रास कारण की...' ज्यांनी पत्रे लिहिली असतील, वाचली असतील, त्यांच्या हे लक्षात असेल. मग ते पत्र पोस्ट कार्ड असो की अंतर्देशीय, मायना ठरलेला. या पत्र लेखनात उत्कट भावनांची, नात्यांची आपुलकी, जिव्हाळा शिगोशिग भरलेला असायचा. कुटुंबातील सर्व नात्यातील सदस्यांची दखल त्यात घेतलेली असायची. मानाप्रमाणे दंडवंत-शीरसाष्टांग नमस्कार, आशीर्वाद वगैरे. पाठविणारा आणि वाट पाहणारा दोघेही चिंब व्हायचे, अर्धी भेट झाली म्हणून. अरविंद जगताप यांनी बरोबर हे सर्व स्मरणात ठेवलेले आहे.

पत्रास कारण की... ही 'चला हवा येऊ द्या' या झी मराठी चॅनलवर सुरू असलेल्या कार्यक्रमात सादर झालेली, त्यातली काही निवडक पत्रे आहेत. मराठवाड्यात पडणारा सततचा दुष्काळ, आणि त्यानुसार सहन करावी लागणारी होरपळ, होणारी तगमग, त्यातून उत्पन्न होणारे प्रश्न आहेतच. परंतु पाणी वाटपावरूनही राजकारण व्हावे, ही माणुसकी बाजूला ठेवून प्रादेशिकता पुढे येते आहे. ही आजची परिस्थिती आहे, २०६० साली ती कशी असेल? महाराष्ट्र एकीकरणासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांचा त्याग विसरला जातो आहे, हे विदारक सत्य मागील काही घटनांनी अधोरेखित केलेले आहे. शहरातील महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे नसणे, आणि जी आहेत त्यांची प्रचंड अस्वच्छता, या विषयीचे क्रूर कुणालाही नाकारता येणार नाही. मुलीच्या लग्नात हुंडा देऊन नवरा नावाचा बैल खरेदी करण्यासाठी बापाने गेली चार वर्षे शेतीसाठी बैल खरेदी न करणे, ही अनिष्ट प्रथा आणि मुलीच्या बापाची अगतिकता नाहीशी करण्यासाठी मुलीनाच आता पुढाकार घ्यावा लागणार आहे. अंधारात न दिसणाऱ्या भुताला सारे शोधत राहतात, मात्र दिवसा ढवळ्या लुबाडणारे भ्रष्टाचार नावाचे भूत दिसत असूनही त्याकडे कानाडोळा केला जातो आहे. दाभोळकरांचे मारेकरी अजूनही सापडत नाहीत, यात ते मारेकरी होते की कुणाचे हत्यार म्हणून वापरले गेलेले अविवेकी लोक होते? त्यांच्या डोक्यात हा विचार आला कसा? माणसे मारून का विचार संपतो? उलट त्यामुळे अंनिसच्या कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या आहेत, अनेक दाभोळकर तयार झाले आहेत.

रामदास आठवले क्रांतिकारी नेता होते, त्यांना मिळालेले प्रेम हे त्यातून आलेले होते. परंतु सिस्टीमने त्यांचा आता कवी करून टाकला आहे. मराठी शब्दांवर प्रेम दाखवणारे नेते दारासमोरचा शिवाजीपार्क, इंजिन व ब्ल्यू प्रिंट यांना मराठी शब्द देऊ शकलेले नाहीत. नाणे नदीत टाकून पुण्य मिळवणे, रेल्वेरूळावर पैसे ठेवून चपटे झालेले पाहणे, यातून होणारी नाणेटंचाई, सहज वाटत असली तरी त्यातला उपरोध लक्षात घेण्यासारखा आहे. नारायण राणे यांची वर्षावर लागलेली नजर, दुष्काळ दूर करू पाहणारे सयाजी शिंदे, परिस्थितीला वाकवणारे नागराज मंजुळे, दहा सिल्व्हर ज्युबिली विनोदी सिनेमे देऊनही एकदाही पुरस्कार न मिळालेले दादा कोंडके, पाण्याचा थेंब थेंब वाचवण्यासाठी घराघरातील नळ दुरूस्त करणारे अबीद सुरती, भिंतीला भेग पाडून उगवणाऱ्या कमळासारखे जिद्दी मतीन भोसले, स्वतःचा बाज असणारे अनिल कपूर, कधीही अवीट न ठरणारे किशोरकुमार, सचिन पिळगावकर, गिरीश लाड, अशा अनेक विषय आणि व्यक्तींविषयी केलेले पत्ररूप लेखन या संग्रहात आहे. काही कविता आणि लेखही आहेत.

यात आलेली अनेक वाक्ये आपला ठाव घेणारी आहेत. 'बायकांचं नवऱ्याबद्दलचं खरंखरं मत काय आहे, हे जर त्या स्पष्ट बोलल्या तर कित्येक पुरुषांना आईच्या पोटात परत जावं वाटेल. या जगाला पुन्हा कधीही तोंड न दाखवण्यासाठी.' 'बाबा, जो माझ्या बापाचा घामाचा पैसा हुंडा म्हणून घेणार आहे त्याच्या गळ्यात मी फुलांचा हार कसा घालू? खेटराचा हार घालायला पाहिजेना त्याला?'

पत्रलेखन ही कला आहे का, असा समीक्षीय प्रश्न इथे निर्माण होण्याचे कारण नाही, असे ठामपणे विधान करता येईल, असे हे लेखन आहे. जी.ए. कुलकर्णी आणि सुनीताबाई देशपांडे यांचा पत्रव्यवहार, कवी अनिल आणि कुसुमावती देशपांडे यांचा पत्रव्यवहार या लेखनाला असलेले महत्त्व आणि उंची ही वाङ्मयीन दृष्ट्या सगळ्यांनी वाखाणलेली आहे. त्या मोजपट्टीचे परिमाण इथे लावता येणार नाही. परंतु विषयाला कवेत घेणारा बांधीवपणा, वाक्यांतील भिडणारा विरोधाभास, त्यातला तळापर्यंत घेतलेला वेध, चौकसपणा, सहजता, शब्दांवरील हुकूमत आणि त्यातले लालित्य, हे खिळवून ठेवणारे आहे, असे ठामपणाने प्रतिपादन करता येते. मुळातच या पत्रांचा जीव लहान आहे. मोजक्या शब्दात सारे व्यक्त करायचे आहे. दृश्य स्वरूपात दाखवले जात असल्याने त्यावर वेळ आणि प्रेक्षक यांचा अंत पाहिला जाणार नाही, याची टांगती तलवार डोक्यावर ठेवून केलेले हे लेखन आहे. परंतु वाचत असताना ना टीव्ही आठवत, ना सागर कारंडे, आपण एकरूप होतो, ते त्या विषयाशी, भावनेशी, विचाराशी. आजच्या या आधुनिकतेशी जोडून घेताना, खूप दिवसांनी वास्तवाकडे नेणारे लेखन वाचायला मिळाले, हे समाधान यातून मिळाले आणि हेच लेखकाचे खरे यश म्हणता येईल. या लेखनातील भूमिका आणि तिचे विश्लेषण मनोगतात व्यक्त केलेले आहे, तेदेखील पत्र लेखकांच्या मनातले बोल आहेत.

मुखपृष्ठावर पत्र टाकायची पेटी दाखवण्यातले औचित्य कुणालाही टाळता येणार नाही. प्रवास करायचा म्हटला की लाल रंगाची एस्.टी. नजरेसमोर येण्याला पर्याय नसतो, तसा पत्र म्हटले की, या लाल रंगाच्या पेटीला पर्याय नाही. कुठेही, केव्हाही नजरेला पडू देत, आपल्याला आलेल्या-पाठवलेल्या पत्रांची हमखास आठवण आल्याशिवाय राहत नाही. प्रदीप म्हापसेकरांनी तिचा दिलेला साज हा सर्व पत्रव्यवहारांचा खरा दागिना आहे.

**पत्रास कारण की...**

**अरविंद जगताप**




**मूल्य १५० रुपये ● सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथपान

**प्लॅटफॉर्म नंबर ९**

**किरण येले**




## प्लॅटफॉर्मवरील मुलांचे भावविश्व

रस्त्यावरील मुले आपण नेहमी पाहतो. म्हणजे त्यांना पाहून आपली नजर मरून गेली असंच म्हटलं पाहिजे. ती दिसतात, कचरा गोळा करताना, मजुरी करताना, हॉटेलात हरकाम्या म्हणून काम करताना, किंवा वाटेल ते करताना. ती दिसतात एस्.टी. स्टँडच्या आसपास, रेल्वे स्टेशनवर, फुटपाथवर, सिग्नलजवळ किंवा सार्वजनिक ठिकाणी. त्यांचा कळकटपणा, विस्कटलेपण आपण सवयीचे धरून चालतो. ही मुले रस्त्यावर का आली, कुणी आणली, यांचा त्राता कोण, ही अनाथ आहेत की पळून आलेली आहेत, असतीलच यांचे आईबाप तर त्यांना ठाऊक आहे का, आपली मुलं रस्त्यावर आहेत म्हणून, की सुटलो अशी त्यांची भावना असते? यांचे भविष्य काय, पुढे याचं काय होणार आहे? यांना स्वप्नं पडत असतील का, त्यांची पूर्तता कशी होणार? मुळात ही मुले शिकली आहेत की अशिक्षित, यांचे दैनंदिन व्यवहार कसे चालतात, यांचा वापर कोण करतो, कुणासाठी ती कामं करतात, रात्री ही मुलं मुक्काम कुठं करतात? असे अनेक प्रश्न या मुलांच्या भोवती गुंफलेले असतात. त्यांचे खुरटलेलं बालपण, हरवलेला आनंदीपणा, हे सारं दिसत असूनही आपण अलिप्त असतो त्यांच्यापासून, किंवा फिरवतो चेहरा त्यांचे आपल्या इस्त्री केलेल्या व्यक्तिमत्त्वावर डाग पडतील म्हणून.

किरण येले हे एक संवेदनक्षम कवी आहेत. नाटक, एकांकिका, अभिनय, हा कवितेइतकाच त्यांचा जिव्हाळा आहे. समाजभान जपण्याचा ध्यास घेतलेला आहे. सतत काहीतरी नवीन करीत राहण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यांनी नेमका रस्त्यावरील मुलांचा विषय या नाटकासाठी निवडला आहे. 'प्लॅटफॉर्म नंबर ९' हे त्याचे ठिकाण आहे. रेल्वे स्टेशनवर नव्याने तयार केलेल्या प्लॅटफॉर्म क्रमांक ९ वर रहदारी कमी आहे, परंतु हे नाटक घडत जातं ते तिथं. परश्या, नाऱ्या, हिमऱ्या, शेमऱ्या, शंकऱ्या ही या फलाटावरची मुले आहेत. बुटपॉलिश करणे, शेंगदाणे विकणे ही वरवरची कामे करताना दिसतात. परंतु कुणाचा माल विनासायास पोच करणे, कुणाला हॉटेल उपलब्ध करून देणे, अशी अवैध कामेही करतात. जम्मन हा दादा आहे. फलाटावर त्याचा अधिकार. तो सांगेल तसं काम करायचं, त्याच्याच मर्जीने वागायचं. त्यापलीकडं जाण्याचा प्रयत्न केला तर फलाटावरून हकालपट्टी ठरलेली. त्याच्या मनासारखं नाही वागला तर कानाखाली आवाज ठरलेला. त्याच्या अवैध धंद्याचे हे वाहक. शिवाय वर दिवसभरातील कमाईतला वाटा त्याला देणे आलेच. जणू तो या मुलांवर उपकार करतो आणि ही मुले त्याचे गुलाम असल्यासारखे वागतात. यांना आधार देण्याचे काम करणारा बंधू नावाचा कार्यकर्ता आहे. जो नर्मदा बचाव आंदोलनातही सहभागी आहे. तो या मुलांना सुधारण्याचा प्रयत्न करतो. शिक्षण देऊन स्वतःच्या पायांवर उभे करण्याची आशा बाळगतो. त्यांच्या झापड पडलेल्या डोळ्यांत स्वप्न पेरण्याचा प्रयत्न करतो. ही मुले त्याला 'शाळा' हे नाव देतात, त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात. त्यांना शिकण्याची इच्छा नाही. शिकून माणूस मोठा होतो, यावर या मुलांचा विश्वास नाही. इथेच नयना नावाची तरुणी आहे, जी जम्मनशी संसाराची स्वप्ने पाहते. अदिती नावाची तरुण मुलगी त्यांच्यात सामील होते. नवीन पाखरू म्हणून प्रथम ते तिच्याकडे पाहतात. तिच्या पैशांची चोरी करतात, परंतु नंतर हीच मुले तिचे मित्र होतात, भावांसारखे तिचे रक्षण करायला तयार होतात. जम्मनपासून तिला दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात. तिला तिच्या घरी परत जाण्याचा सल्ला देतात. अदिती त्यांना शिकवू पाहते. त्यांच्या वाईट सवयींपासून त्यांना दूर करण्यासाठी प्रयत्न करीत राहते. ती आल्याचे कळल्यापासून तिला ताब्यात घेण्यासाठी जम्मनचा आटापिटा सुरू होतो. या सगळ्या प्रयत्नात नाटक पुढे सरकत राहते. उत्कंठा वाढवीत जाते.

अदिती स्वतःहूनच घरातून पळून आलेली असते. सावत्र आईचा जाच समजण्यासारखा आहे. परंतु बापाची नकोशी वाटणारी सलगी अधिक क्लेशदायक आहे, हे घर सोडण्याचे कारण. तसे प्रत्येकाचे फलाटावर येण्यामागे वेगवेगळे कारण आहे.

ती काही खुशीने इथे आलेली नाहीत. परंतु तेवढेच नाही. त्यांच्याही डोळ्यांत स्वप्न आहे. आहे हे जीवन त्यांनाही बदलावेसं वाटतं. बंधूचेही तेच प्रयत्न आहेत. परंतु समाज, मिडिया, आंदोलने या घटकांचा स्वतःचा ठसा आहे. तो आपल्यापरीने काम करीत राहतो. त्याला येणारा कळवळा तीव्रता दाखवत असला तरी तो अल्पकालीन असतो. पुढे ज्याचे त्याचे जगणे, ज्याचे त्याचे काम त्यालाच पुढे न्यायचे असते. आहे त्यातच पुढे जायचे असते. एकदा रिंगणात उतरल्यानंतर त्यातून बाहेर पडणे अवघड होत जाते आणि त्या धडपडीतून आणखी वेगळे काही समोर मांडले जाते.

नाटक म्हटले की अनेक स्तरांवर अवधान ठेवावं लागतं. नेपथ्य, पात्रांच्या हालचालींचे कंसात दिलेले सूचन. परंतु त्यातला महत्वाचा भाग असतो तो पात्रांचा. त्यांचे प्रत्येकाचे वेगळेपण, त्यांची बोलण्याची ढब, त्यांची भाषा, त्यांचे व्यक्तिमत्त्व हे ठळकपणे एकापेक्षा वेगळे असावे लागते, तो ज्या परिस्थितीत उभा आहे, ज्या जागेवर उभा आहे, त्यातून तो साकार व्हावा लागतो. येले यांनी ती नस बरोबर पकडलेली आहे. भाव–भावनांचे नेमकेपण, हळवेपण, दादागिरीतले मगरूरपण, बेरकीपण, राडा, हे सारे संवादातून व्यक्त केले आहे. संवाद ही नाटकाची खरी कसोटी असते. नाटकात व्यक्तिरेखा दिसावी लागते. ती उभी राहू शकते ती अभिनय आणि संवादातून. येले यांनी पात्रांच्या व्यक्तिरेखेला साजेसे, नेमके, चपखल बसतील असे संवाद दिलेले आहेत. नाटक रेंगाळून चालत नाही. त्याची लय चढत्या भाजणीत असावी लागते. ती काळजी देखील इथे घेतलेली आहे. त्यामुळे एक चांगली कलाकृती साकार झालेली आहे.

राज्य नाट्य हौशी रंगभूमी आणि व्यवसायिक रंगभूमीवर या नाटकाचे प्रयोग झालेले आहेत. त्याचे फोटो आत दिलेले आहेत. त्यातील एका प्रसंगाचे चित्र देऊन सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ सजवले आहे. त्यापाठचे नेपथ्यही दाखविलेले आहे. त्यामुळे रेल्वेस्टेशनचे प्लॅटफार्म नंबर ९ जिवंत झाला आहेच.

**मूल्य १०० रुपये ● सवलतीत ६० रुपये**

# ग्रंथपान

**या फुलपाखराचं काय करायचं?**

**राधिका कुंटे**




**'एक दिलखुलास संवाद!'**

पुस्तक वाचायचे असेल आणि ते एक आगळेवेगळे हवे अशी अपेक्षा असेल तर राधिका कुंटे यांचे 'या फुलपाखराचं काय करायचं?' या पुस्तकाची शिफारस करायला नक्कीच आवडेल. विषयांचे बंधन नाही, भाषेची अडचण नाही, इतकेच काय, एकाच विषयाला धरून एका जागी दीर्घ काळ बसावे लागेल, ही भीती नाही. त्याचे स्वरूप आहे कसे आहे अगदी सुटसुटीत, साध्या–सोप्या आणि मनमोकळ्या भाषेत लिहिलेले, अनेक विषयांना मुक्तपणे व्यक्त केलेले, स्वतःचा स्वतःशी केलेला संवाद, असे! कुठलेही पान काढा, वाचायला सुरुवात करा, आपोआप पुढची पाने चाळून झाली कधी, हे कळणार देखील नाही. पूर्णपणे त्यात बुडून जाल, स्वतःच्या नकळत. समाधान तर पावलेले असालच, पण प्रतिक्रिया देखील उमटल्याशिवाय राहणार नाही, वेगळं काही वाचलं हे खरंय बुवा,अशी. स्वतःशी स्वतःची दिलेली ही दिलखुलास प्रतिक्रिया टाळता येणार तर नाहीच, पण त्यातून इतरांना वाचण्याची शिफारस केलीत, तर ती तुमच्या रसिकतेची खरी दाद असेल.

राधिका कुंटे या पत्रकार म्हणून वावरत असल्याने विषयांची कमरता नाही. व्यासंग आहेच नवनवीन शोध घेण्याचा. विचारांचा. मन तरल आणि संवेदनक्षम असल्याने या विषयांकडे वेगळ्या नजरेने पाहण्याची कला अवगत असलेल्या. त्या विषयांना कोणत्या चौकटीत मांडायचे, त्यांची रचना कशी करायची, हे तंत्रही त्यांना अवगत असल्याचे दिसते. त्यामुळे विषय आणि विचार अगदी सहजपणे व्यक्त झालेले दिसतात. फुलपाखरू म्हणजे आपल्या भोवती रुंजी घालणारेच फुलपाखरू अपेक्षित नाही, ते आहे विचाराचे, भावनेचे, फुलपाखरू, परंतु त्याभोवती जे कोंदण घातले गेले, ते आहे तितकेच कोमल, सुंदर, आकर्षक आणि कुतूहलाने माखलेले असे हळुवार. एखादी कल्पना अगदी सहज आणि अचानक सुचते आणि आपण विचार करायला लागतो, ते फुलपाखरूच असते. ज्याच्याविषयी कुंटे लिहितात, 'एकदा काय झालं, एक फुलपाखरू उडत उडत आलं नि एका फुलावर बसलं. तितक्यात तिकडून आला...' इथून पुढे सुरू होतो प्रवास विचारांचा, कल्पनेचा, कुतूहलाचा. ऊन आणि उन्हाळा यांच्यापासून आपण पळ काढू पाहतो, परंतु राधिका कुंटे त्याला 'देखणा उन्हाळा' म्हणतात. त्या वर्णन करतात, 'सकाळच्या कोवळ्या उन्हाचा फिल घेतलाय का कधी? आपल्याला उठवायलाच येतं ते... एकदम मायेनं... मग ही बाळं वयात येतात नि आपल्याच रुबाबात राहतात... एकदम रोखठोक... कुणालाच न जुमानणारं कडकडीत ऊन...' हाच उन्हाळा खरा 'रंगयात्री' असतो. फक्त त्यासाठी तुम्ही तुमच्या कोशातून बाहेर येऊन आवतीभोवती पाहा. सगळी झाडी कशी विविध रंगांनी बहरलेली असतात ती याच ऋतूमध्ये. 'कॉफीशप्पथ'मध्ये त्या लिहितात, 'चहा आणि कॉफीची तुलनाच होऊ शकत नाही. चहातला कोरडेपणा कॉफीत नाहीए. कॉफीत आहे आपलेपणा... एक फ्रेंडलीनेस...' एकेकाळी स्वतंत्र कॅमेरे असायचे, भटकंतीचा खरा सोबती. आता स्मार्ट फोन आले आणि बिचारा कॅमेरा 'अँटिक पीस' झाला. स्मार्ट फोटोवरील प्रतिक्रिया भरभरून असतात. परंतु त्या पाहताना प्रश्न पडतो, ही मनापासूनची दाद असते का? बरं जी असते ती फोटोच्या विषयाला की फोटो काढण्याच्या कौशल्याला, की आपलं क्लिकायचं म्हणून क्लिकायचं? हल्ली पाण्याच्या बाटल्यांनी सर्वत्र चांगलाच धुमाकूळ घातलेला दिसून येतो. त्यातून प्रवासात असाल तर प्रवास संपल्यानंतर गाडीतच तिला सोडून देण्याची सवय दिसून येते. रिकामी असो वा अर्धवट रिकामी. ही मागे राहिलेली बाटली किती प्रश्न, तर्क निर्माण करते, याचा अनुभव 'पाणी...बाटली...पाणी' मध्ये व्यक्त केला आहे. मोबाईलवर अपडेट असणे ही वेगळीच समस्या म्हणावी लागेल. त्याविषयी त्या लिहितात, 'अपडेट असणं म्हणजे नेमकं काय असणं अपेक्षित असतं? अपडेट राहून खरंच आपल्या आयुष्यात फरक पडतो की अपडेट न राहिल्यानं खरोखरंच कोणता अपराध घडतो.' स्वातंत्र्याची व्याख्या आणि त्याचा शोध घेताना त्या लिहितात, '...आईशप्पथ...कारण हे मूल्य, स्वायत्तता, शोध घेणं, अभिव्यक्त होणं हे सगळं आपल्या डोक्यावरून जायला लागलंय राव...या शब्दांचं काय करावं आता?' असे अनेक विषय आहेत, ज्यांच्यावर त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. हे विषय आताचे, सगळ्यांशी परिचित असलेले. तरीही वाचतांना त्याच्यातले वेगळेपण जाणवावेत असे.

हे सर्व ब्लॉगवर लिहिलेले लेख आहेत. ब्लॉग म्हणजे स्वतःचे व्यक्त होणे. आपल्या आवडी, विचार, कल्पना, मनोकळेपण, त्यावरील प्रतिक्रिया हे सारे यात सामावलेले असते. राधिका कुंटे यांचे हे पुस्तक त्याच लेखांचे आहे. हे लेख म्हणजे त्यांचा स्वतःचा स्वतःशी संवाद असावा, अशा तऱ्हेचे आहेत. ' कसंय ना की..., नाही बॉ..., काय करावं राव..., आईशप्पथ... असा हा संवाद आढळतो. इंग्रजी शब्द, इंग्रजी वाक्ये, जी आपल्या सरावाने तोंडात बसली आहेत, तीही इथे आलेली आहेत. उदा. 'डर्टी फेलो, हॅप्पीनेस, सेन्सेटीव्ह, रिलेट करणं, फिलिंग सेम, फॅनफॉलोइंग, यंगस्टर्स, सिनिअर्स, सरप्राईज्ड...' कुंटे या उत्तम कवयित्री आहेत. त्यांनी व्यक्त केलेले विचार अनेकदा कवितांमधून आले आहेत. 'शब्द', 'ऊन', 'बाबा', 'कल्हई' या उत्तम कविता आहेत. या एकूण प्रवासाविषयी त्या मनोगतात लिहितात, 'या व्यक्त होण्यातून काही नेहमीचेच, काही हटके लिखाणाचे फॉर्म्स सापडत गेले. कधी ललित लेखानं काव्याचं रूप धारण केलं. कधी कविता ललित लेख झाली, कधी काव्य चौकोनी, त्रिवेणी स्वरूपात उमटलं...'

अरुण शेवते यांनी दिलेल्या शुभेच्छा प्रस्तावनेचा ब्लॉगलेख म्हणता येईल. प्रत्येक लेखाला रेखाचित्र आहे. या पुस्तकाचे शीर्षक जितके हळुवार आणि आकर्षक आहे, तितकेच मुखपृष्ठ सुरेख झालेले आहे. विविध विषयांचा, आधुनिक तंत्रज्ञानाचा, निसर्गाचा वस्तीचा असा समग्र विचारांचा गोफ या फुलपाखराभोवती विणला गेला आहे. प्रज्ञा मिरगळ यांची कल्पना उत्तमच!

**मूल्य १०० रुपये ● सवलतीत ६० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## बिमल रॉय यांची मधुमती

**सरोज बावडेकर**




### अंतरंग शोधण्यातला कुतुहलाचा प्रवास

'मधुमती ' नावाचा चित्रपट पडद्यावर झळकला तो १९ सप्टेंबर १९५८ रोजी. तो काळ म्हणजे ब्लॅक अँड व्हाईटचा. त्या काळात पाहिलेले आणि कायमचे स्मरणात राहिलेले जे चित्रपट आहेत त्यात 'मधुमती'ने आपले स्थान अढळ ठेवलेले असल्याचे सगळेच मान्य करतील. 'मधुमती' हा चित्रपट बिमल रॉय यांच्या दिग्दर्शनामुळे गाजला. दिलीप कुमार आणि वैजयंतीमाला यांच्या उत्कट अभिनयाने गाजला. सलील चौधरी यांचे मधुर संगीत आणि शैलेंद्र यांच्या भावविभोर गीतांमुळे गाजला. ब्लॅक अँड व्हाईट असूनही निसर्गसौंदर्यामुळे तो लक्षात राहिला. आजही त्याची 'सुहाना सफर...', 'बिचुवा...', 'आजारे, कबसे खडी...' ही गाणी कानांवर पडली की संपूर्ण चित्रपट नजरेसमोर उभा राहातो.

'मधुमती' हा बिमल रॉय यांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट. बिमल रॉय हे हिंदी सिनेमातील प्रतिभावान दिग्दर्शक आणि एक अविस्मरणीय, असामान्य, आदरणीय व्यक्तिमत्त्व. चित्रपट निर्मिती करताना ते कथा निवडीपासून ते कथा पडद्यावर साकार करण्यापर्यंत कसा विचार करीत, पात्रांची चपखल निवड कशी करीत, चित्रपटासाठी संगीत आणि गीत यांच्याविषयी कसे चोखंदळ असत, शूटींगसाठी स्थळांची कशी निवड करीत, दृश्य अधिक परिणामकारक व्हावे म्हणून कसे प्रयत्न करीत, करायचे ते नेमके आणि परिपूर्ण याविषयी कसे आग्रही असत, आलेल्या प्रसंगांवर मात कशी करीत आणि या सगळ्यात एक दिग्दर्शक, एक व्यक्ती, एक माणूस म्हणून कसे इतरांशी वागत, या सगळ्यांचे कुतूहल अनेकांना आहे. तेच कुतूहल त्यांची कन्या रिंकी रॉय–भट्टाचार्य यांनाही होते. वडिलांच्या पश्चात ते अधिक प्रकर्षाने जाणवू लागले. त्या कुतुहलापोटीच त्यांनी 'मधुमती' आणि या चित्रपटामागील घटनांची निवड या पुस्तकासाठी केलेली आहे. त्या अर्थाने हा त्या चित्रपटाचा दस्तऐवज म्हणता येईल.

बिमल रॉय प्रॉडक्शनची स्थापना 'रोशोमान' हा चित्रपट पाहिल्यानंतर झाली आणि त्यासारखा चित्रपट काढण्याची कल्पनाही याच चित्रपटामुळे पुढे आली. ही हृषीदांची आठवण थेट मुळाशी घेऊन जाते. भुतखेत –पुनर्जन्म यांच्या समन्वयावरील ऋत्विक घटक यांनी लिहिलेल्या या कथेला बिमलदांनी भूतकाळ आणि वर्तमानकाळाशी जोडणारी प्रेमकथा म्हणून सादर केले. अभिनेता म्हणून दिलीपकुमारची निवड केली. आनंद आणि दुःख यांच्या भूमिका समर्थपणे पेलणारा हा नट. ही भूमिका स्वीकारण्याचे कारण विचारले असता दिलीपकुमार उत्तर देतात, 'बिमलदांबरोबर काम करण्याची संधी, पण मधुमतीमध्ये प्रोत्साहन आणि अनिश्चितता ह्यांचा सुरेख मेळ होता.' तर वैजयंतीमाला म्हणतात, 'बिमलदांसारख्या गंभीर चित्रपट बनवणाऱ्या दिग्दर्शकांनी माझी निवड केली तेव्हा कुणीतरी मला स्वर्गातून अमृत पाठवल्याचा आनंद झाला.'

या चित्रपटातील भरपूर नृत्य आणि एकापेक्षा एक सरस मधुर गाणी यासाठी सोहनलाल, सचिन शंकर, सत्यनारायण यांना श्रेय जाते. 'बिचुवा' या गाण्यात एक तेरा वर्षाची मुलगी नाचताना दाखवली आहे, ती आहे आजची प्रसिद्ध कोरिओग्राफर 'सरोजखान'. पुढे तिने नृत्यशिक्षक सोहनलाल ह्यांच्याशी लग्न केले. सिनेमॅटोग्राफर दिलीप गुप्ता हे पहिले सिनेमॅटोग्राफर होते, ज्यांनी हॉलिवूडमध्ये रीतसर शिक्षण घेतलेले होते. त्यांनी प्रकाश आणि काळोख याचा सुरेख उपयोग केल्याने अनेक प्रसंग प्रत्ययकारी झालेले आहेत. त्यांच्यामुळे 'मधुमती' हा चित्रपट सिनेमॅटोग्राफीच्या विद्यार्थ्यांना एक अभ्यासग्रंथ वाटतो, असे एका विद्यार्थ्याने मत व्यक्त केले. शूटींगसाठी नैनिताल, राणीखेत, भोवाली, घोराखाल अशा ठिकाणांची निवड करताना, तेथील लोकजीवन, कपडे, वागणे यांचा अभ्यास केल्याचे जाणवते. तसेच इगतपुरी, खंडाळा यांचाही उपयोग वरील ठिकाणांसारखाच केलेला आहे.

सलील चौधरी हे रीतसर शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतलेले संगीतकार नसून ते पडलेले संगीतकार आहेत, असे सर्वजण म्हणत परंतु बिमलदांनी त्यांच्यावर पूर्ण विश्वास दाखवला. तो किती सार्थ ठरला हे पुढे सिद्ध झाले. '' 'आजारे परदेसी...' हे गाणे रेकार्ड झाले तेव्हा शैलेंद्रने खूश होऊन मला मोठ्ठा फुलांचा गुच्छ दिला होता'', असे लता मंगेशकर सांगतात.

सर्वांगाने अत्यंत यशस्वी ठरलेल्या या 'मधुमती'च्या पडद्यामागील अप्रकाशित घटनांची कहाणी शोधण्याचा लेखिकेने कसोशीने प्रयत्न केला आहे.

संशोधनाचे कुतूहल नजरेसमोर ठेवून लिहिलेले असले तरी लिखाणातला सर्वांगीण वेध घेण्याचा चौकसपणा लक्षात येण्यासारखा आहे. हवे ते मिळविण्यासाठी जशी धडपड आहे, तशीच लेखनाचा स्तर प्रवाही ठेवण्यातला दर्जेदारपणाही आहे. 'सावलीत पारा चाळीस डिग्री असूनही तो थंड स्वभावाचा माणूस वितळला नाही', असे वाक्य त्या लीलया लिहून जातात.

त्यामुळेच हे पुस्तक केवळ 'मधुमती' चित्रपट आणि त्याच्याशी संबंधित व्यक्ती, स्थळे याविषयी वर्णन करीत नाही तर त्यानिमित्ताने त्या काळच्या अनेक व्यक्ती, घटना, चित्रपट, संगीत, कलावंत, पुस्तके, वचने, यांची माहिती देत जाते. प्रत्यक्ष भेटलेल्या अनेकांची मुलाखत देते. त्यांचे आपसातले व्यवसायिक आणि अंतरिक नाते उलगडून दाखवते.

दिलीपकुमार आणि वैजयंतीमाला यांच्यावरील दिव्याच्या प्रकाशातील एक दृश्य घेऊन प्रकाश आणि काळोख यांचे गूढ निर्माण करणारे उत्तम मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी साकारले आहे.

**मूल्य २०० रुपये ● सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**श्रेय ज्याचे त्याचे**

**माधुरी अरुण शेवते**



**आपलेपणातली आपली व्यक्तिचित्रे**

'श्रेय ज्याचे त्यास द्यावे' हे व्यक्तिचित्रणाचे पुस्तक ग्रंथालीने प्रकाशित केले आहे. माधुरी अरुण शेवते यांचे हे पहिलेच पुस्तक. ग्रंथाली अशाच लेखकांच्या शोधात असते. ज्यांच्याकडून सराईताहून वेगळे काही अस्सल मिळण्याची अपेक्षा असते. आणि ही अपेक्षा अनेक लेखकांनी पूर्ण केलेली आहे त्याच अपेक्षाची पूर्ती करणारे हे पुस्तक आहे. यातील लेख यापूर्वी दिवाळी अंकांतून प्रकाशित झालेले आहेत. मोजकेच आठ लेख आहेत परंतु मनाचा ठाव घेणारे आहेत. अगदीच स्पष्टपणे सांगायचे झाले तर नितळ मनाने अंतरंगातील सुंदर अनुभवांना मोकळे केलेले आहे; ताज्या टवटवीत फुलांची प्रसन्न ओंजळ समोर घरावी!

गुलजार आणि अरुण शेवते ही दोन नावे आता वेगळी करता येणार नाहीत, दिसतील फक्त वेगळी टाळांसारखी इतकेच परंतु त्यांच्यातून निघणारा नाद एकच असेल. गुलजार साहेबांचा लेख ऋतुरंगमध्ये असणे ही ऋतुरंगची संपादकीय लेखासारखी अनिवार्यता झालेली आहे. त्यामुळे गुलजार साहेबांचा स्नेह शेवते कुटुंबीयांची जणू एक जन्मोजन्मीचा अनुबंध व्यक्त करणारी नातेठेव आहे. त्यांचा वत्सल स्नेह, वडिलकीच्या नात्याने दिलेले प्रेम हा या कुटुंबाचा मौलाचा ठेवा आहे. लग्न सोहळा असो, दिवाळी असो, पुस्तक प्रकाशन, दिपाळीअंक प्रकाशन वा कुठलेली निमित्त असो, गुलजारसाहेबांची अगत्यपूर्वक उपस्थिती ठरलेली! फोनवरून चौकशी करणे तर हक्काचेच झालेले. बहूच्या हातच्या वड्यांची तारीफ, पोहे आणि हिरव्या टोमॅटोची चटणी, बेसनाचे लाडू हे आवडीचे पदार्थ आणि त्यासाठीची आग्रहपूर्वक मागणी, ही लेखिकेसाठी मोठी बिदागी असते. शर्वरीचे आजोबांच्या नात्याने लाड करणे हा वेगळाच अनुभव. 'दिवाळीच्यावेळी त्यांच्याकडून वेलदोडे घातलेली खडीसाखरेची बरणी येणे म्हणजे अप्रूपच. साखरेला लागलेला वेलदोड्याचा वास, तुमच्या गाण्यांचा सूर, सुगंध, कवितेच्या ओळी, तुमचा चेहरा आठवत बरणीतील साखर संपू नये असे वाटते. चव, सुगंध, प्रतिभा सर्व एकत्र होऊन साखर जास्त गोड होऊन जाते.' ही लेखिकेची भावनिक साद सारेच सांगून जाते.

यशवंतराव गडाखसाहेब म्हणजे पित्याच्या जागी असलेले दुसरे व्यक्तिमत्त्व. त्यांचे सोनई साखर कारखान्याचे चेअरमनपद, त्यांची खासदारकी, त्यांचा राजकीय दबदबा, हे सारे शेवते कुटुंबीयासाठी झुलीसारखे बाजूला ठेवले जातात आणि उरतात ते फक्त आपसातले नात्याचे बंध. साहेबांनी या कुटुंबाला आपल्याच कुटुंबातील एक मानलेले आहे. प्रत्येक सुखदुःखात ही दोन्ही कुटुंबे वेगळी नसतात. आईच्या मृत्यूनंतर अनावर शोक व्यक्त करण्यासाठी आश्वासक आधाराचा खांदा गडाखांचाच होता, यातून आपलेपणाच सिद्ध होतो. वाढदिवसासाठी हजर राहण्याला तर कुठेच पर्याय नसतो. कुलू-मनालीची ट्रीप अर्ध्यावर सोडून थेट महाबळेश्वरला वाढदिवसासाठी हजर होण्यातली शेवते यांची तगमग या नात्यातील जिव्हाळा दाखवते. आणि साहेबही बंगल्याच्या बाहेर उभे राहून वाट पाहतात. तेव्हा लेखिका लिहितात, 'मनातून गलबलून आले. वाट दाखविणाऱ्यालाच वाट पाहावी लागत होती. याचे खूप वाईट वाटले.' गडाखसाहबांचे मोठेपण नुसते बाहेरच नाही, तर कुटुंबातही आहे. संपूर्ण घर एकत्र नादंत आहे. समारंभाला सर्व कुटुंब, नातेवाईक यांना एकत्र आणतात. सगळ्यांची काळजी घेतात. पोरींनो जेवून घ्या, हा आग्रह धरतात. अतिशय कुटुंबवत्सल असे हे व्यक्तिमत्त्व आहे.

'बाई' या लेखात सासूबाईविषयी लिहिलेले आहे. त्यांचा जिव्हाळा, त्यांनी केलेले प्रेम, दिलेले संस्कार, हा ठेवा खूप मोठा आहे. त्यांनी काबाडकष्ट केले पण आपला करारीपणा सोडला नाही. उपाशी राहण्याचे दिवस आले, पण शेजाऱ्यांना दिसावे म्हणून खोटी-खोटी भांडी घासली आणि चूल पेटलेली ठेवली. दोन मुलांना वाढवले. त्याही परिस्थितीत वाचनाचा छंद जोपासला. त्यांच्या धीर आणि धीटपणाविषयी लेखिका लिहितात, 'त्यावेळेस तुमच्यासमोर अंधार होता. त्याचबरोबर पाणी देखील अथांग होते, पण तुम्ही त्या अंधारावर, पाण्यावर मात करत मुलांना वाढवलेत. डोळ्यांतले खारे पाणी गोड्या पाण्यात मिसळून टाकलेत... डोळ्यांतले पाणी नदीला दिले वाहण्यासाठी आणि मन मात्र नदीसारखे अथांग केले होते.'

अरूण शेवते आणि शर्वरी ही तर रक्ताने जोडलेली नाती. पती आणि कन्या. अरूण हे लेखक, कवी, संपादक. 'अरे जगणं मरणं एका श्वासाचं अंतर' या कवितेच्या ओळी आयुष्यात कशा सार्थ आहेत, त्यांचा संदर्भ ठेवून अरूण यांच्याविषयीचे अनुभव या लेखात दिलेले आहेत. शर्वरी म्हणजे पौर्णिमेचे चांदणे. तिच्यामुळे त्यांच्या आयुष्यात चांदणे आले. तिच्या खाऊच्या डब्यात फुलवाती ठेवण्याची कल्पकता ही फुलासारखी फुलण्यासाठी, वातीसारखी तेवण्यासाठी. या दोघांविषयी लिहिताना संयम आणि तटस्थता यांची परीक्षाच होती. तरीही नेमकेपणाची कास ठेवून अंतरंग मोकळे केलेले आहे. तीच गोष्ट शरद पवार साहेबांचे सचिव धुवाळीसाहेब यांची. देवाधर्माचे वेड जपण्यापेक्षा माणसांचे काम करणे एवढेच ध्येय जपलेले. आयुष्यभर निष्ठा बाळगली ती साहेबांची. घरी आलेली चंदाराणी, एक परकरी गरीब पोर कामानिमित्ताने येणारी आणि खरेच मनाला चटका लावणारी आहे.

एक सुंदर पुस्तक वाचल्याचा आनंद हे पुस्तक देते. व्यक्तिचित्रणात अनेक पैलू आहेत. त्यातला भावनिक जिव्हाळा, आत्मीयता, उत्कटता एका गृहिणीच्या नितळ नजरेतून दिसतो. माणूस आणि नात्याला आत्मसात असलेली तरलता या लेखांतून दिसून येते. पुस्तक पहिले असले तरी त्यातला दमदारपणा आश्वासक आहे.

**मूल्य १२० रुपये ● सवलतीत ८० रुपये**

# ग्रंथपान

**सौंदर्ययात्री**

**माया परांजपे**




**इथे नांदतो ध्यास सौंदर्याचा!**

'मुलांच्या वाढत्या वयात आजी, आजोबा किंवा चांगल्या वळणाची मोठी माणसे जवळ असणे आजच्या धकाधकीच्या आयुष्यात नक्की मुलांच्या आयुष्यात फरक करतात. ही आपली संस्कृती आपण जितकी जपू तेवढी फायद्याची आहे.' मन संस्कारक्षम असेल तर कुटुंबही त्याच वळणाने जाते. गरज आहे ती ते वळण जपण्याची, सोबत घेऊन चालण्याची, पुढे जाणाऱ्याच्या पाठीशी उभे राहण्याची. तसे घडले तर कुठल्याही वळणावर मागे वळून पाहण्याची गरज पडत नाही. अशाच संस्कारक्षम कुटुंबाच्या कर्तृत्वाच्या यशाची गाथा म्हणजे 'सौंदर्ययात्री'!

पुण्यात बीएससीपर्यंत केवळ लायब्ररीच्या पुस्तकांवर अभ्यास करणारी, पहिला वर्ग प्रत्येक वर्षी मिळवणारी माया लग्नानंतर पतीच्या नोकरीमुळे थेट स्वित्झर्लंडला गेली. सदाशिव पेठेतील दोन खोल्यांत राहणारी माया विमानाने जगाचे नंदनवन असलेल्या स्वित्झर्लंडला जाते ही गोष्ट परिकथेसारखी ठरली. परंतु ही त्यांच्या भावी कर्तृत्वाची नांदी ठरली. तिथे आरामात राहण्याऐवजी त्यांनी लॅब असिस्टंटची नोकरी स्वीकारली. त्यात शिकण्याचा ध्यास कायम ठेवला. भारतात परतल्यानंतर ओव्हेशन नावाच्या प्रसाधन कंपनीत 'ब्युटी काउन्सिलर' म्हणून नोकरी मिळाली. कौशल्याच्या जोरावर 'सौंदर्य समुपदेशक म्हणजे स्टार ब्युटी काउन्सिलर' वर नेमणूक झाली. कंपनीने पार्लरचे सौंदर्यशिक्षण देणे सुरू केले. त्याच्या जोडीला केशरचनांच्या वर्गांत प्रवेश घेतला. नव्याची खूप ओढ व नावीन्यपूर्ण गोष्टी शिकण्याचा आस्थापूर्वक छंद या अंगभूत गुणांच्या जोरावर 'इंटरनॅशनल स्कूल ऑफ नॅचरल ब्युटी थेरपी' लंडन येथे संपूर्ण ब्युटीचे शिक्षण घेतले. या जोरावर , स्वतःवर पूर्ण विश्वास ठेवून आणि काम करण्याची प्रचंड इच्छा मनात ठेवून स्वतःचे पार्लर सुरू केले. ही सुरुवात भावी आयुष्याला खूप वेगळे वळण देऊन गेली. पुढे आणखी शिक्षण घेतले. सौंदर्यशास्त्राच्या वेगवेगळ्या कला जगातल्या तज्ज्ञांकडून आत्मसात केल्या. लागणारी प्रसाधने स्वतः तयार करण्याचा ध्यास घेतला. यातून ब्युटीपार्लर, स्पा ची अनेक ठिकाणी केंद्रे सुरू झाली. स्वतःची प्रसाधने निर्मिती स्वतःच्या कारखान्यात सुरू झाली आणि पाहता पाहता व्याप आणि कीर्ती यांनी गगनाला गवसणी घातली. आकाशवाणी, दूरदर्शनवर याच विषयांवर कार्यक्रम करण्यासाठी आमंत्रित करण्यात येऊ लागले. वृत्तपत्रांतून सदरलेखन सुरू झाले. 'अस्थेटिक' व 'बॅबटॅक' ची सदस्यता चालत आली. ब्रिटिश स्कूलशी संलग्नता मिळाली. आंतरराष्ट्रीय परीक्षा घेण्यास मान्यता मिळाली.. जगातल्या छत्तीस देशांमध्ये भारताचे नाव सिडेस्कोच्या नकाशावर आले व सिडेस्को परीक्षा देणारी भारतातील पहिली शाळा ठरण्याचा मान त्यांच्या संस्थेला मिळाला. नुसतेच ब्युटीपार्लर चालवले नाही तर त्याद्वारे प्रशिक्षण देणारे केंद्र, कॉलेज सुरू केले, आणि त्यांना जागतिक स्तराचा दर्जा प्राप्त करून दिला.

पती –विजय यांनी दिलेले प्रोत्साहन, वडिलांच्या जागी असलेले कडक शिस्तीचे सासरे, अनय आणि आदित्य या मुलांचे शिक्षण आणि त्यांचा व्यवसाय, दीपा आणि प्राजक्ता या सुना, नातवंडे या सगळ्यांचे वेगळेपण, वैशिष्ट्ये जे अनुभवास आले, जाणवले, त्यांचे वर्णन तपशिलाने केले आहे. बालपण, शिक्षण, ब्युटी पार्लरविषयी असलेला समज याविषयी समरसून लिहिले आहे. जगभराचा झालेला प्रवास मोठाच परंतु तिथल्या प्रवासवर्णनापेक्षा ब्युटीपार्लर, प्रसाधने, त्यातले बारकावे, शिक्षण देणाऱ्या संस्था, शिक्षक यांच्याविषयी अधिक तपशील दिलेला आहे. या निमित्ताने या व्यवसायाचे जाळे किती मोठे आहे, याचा प्रत्यय या लेखनातून येतो.

मिळालेले यश कसे साध्य झाले याविषयी माया परांजपे लिहितात, 'मागणी आणि मैत्रिणी, ग्राहक ह्यांच्या आग्रहामुळे जे काही घडत गेले त्या साऱ्याच्या मागे माझी नावीन्याची ओढ, अभ्यास करण्याची आवड आणि परिश्रमातून निर्माण झालेली कला आहे. ह्या साऱ्याचा एकत्र संगम होऊन जे काही उभे केले ते घडले.'

स्वतःविषयी लिहितांना अनेकदा संकोच वा दडपण आल्यासारखे होते परंतु विनाकारण फाफटपसारा सांगत बसण्यापेक्षा, आपल्याला जे सांगायचे आहे त्याच्याशीच एकनिष्ठ राहिले, तर असे होण्याचे कारण नसते. माया परांजपे यांची एकनिष्ठता अनेक पातळीवरील आहे. कुटुंब आहे, व्यवसाय आहे, स्वतःच्या जगण्याच्या कल्पना आहेत आणि मिळालेले यश तर उत्तुंग म्हणावे असे आहे. तरीही अतिशय संयमितपणे त्यांनी आपल्या प्रवासाविषयी लिहिलेले आहे. बरे हा प्रवास तसा नाजूक आणि तितकाच कुतुहलाचा. नवनवीन प्रयोगांचा, शिक्षणाचा, प्रवासाचा, ध्यासाचा, उद्योगजकतेचा आणि यशाचा. या सगळ्यांत त्यांचे अस्तित्व केंद्रस्थानी असूनही त्यांनी इतरांच्या मोठेपणाला केंद्रस्थानी ठेवलेले आहे. स्वतःच्या पुढे जाण्यात इतरांचा वाटा किती आहे, याची कृतज्ञता वारंवार स्पष्ट केली आहे. तीही मोकळेपणाने. कटुतेचा कुठे उल्लेख नाही. त्यामुळेच हा आलेख आत्मचरित्राचा असला तरी तो एका कर्तृत्ववान गृहिणीचा, ध्यासासक्त उद्योगी महिलेचा सौंदर्यशील प्रवास आहे, असे म्हणावेसे वाटते.

नीला सत्यनारायण यांनी प्रस्तावनेत माया परांजपे यांच्या कर्तृत्वाविषयी आपुलकीने लिहून कौतुक केले आहे. स्वतः लेखिकेनेही आपल्या मनोगतात या प्रवास–यात्रेविषयी लिहिले आहे. पुस्तकात काही फोटो दिलेले आहेत, ते एकूण प्रवासातील काही खुणा स्पष्ट करतात. पुस्तकाच्या शेवटी लेखिकेचा परिचय दिलेला आहे. तो जिज्ञासूंनी जरूर लक्षात घ्यावा असा आहे. एक गृहिणी कुठल्याकुठे आणि कशी झेप घेऊ शकते, याचा अंदाज त्यावरून येईल. कुणाही ध्यासवेड्यासाठी हे आत्मचरित्र नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर सजवलेल्या पंखांचा उंच झेप घेतलेला पक्षी दाखवला आहे. हा पक्षी लेखिकेच्या कर्तृत्वाचा साता समुद्रापार पोहोचलेल्या यशोगाथेचा प्रतिनिधी आहे असेच त्याकडे पाहताना वाटत राहते.

**मूल्य २०० रुपये ● सवलतीत १२० रुपये**




# ग्रंथपान

**नेदरलँड डायरी**
**आपलेपणाचे आख्यान**
**सुलभा कोरे**




**निसर्गाइतकाच निमग्न लोकांचा देश**

'नेदरलँड – डायरी' हे पुष्पिता अवस्थी यांनी हिंदीतून लिहिलेले पुस्तक. त्याचा मराठीत अनुवाद केला आहे सुलभा कोरे यांनी. नेदरलँड हा हृदयाच्या आकाराचा देश. समुद्राला बांध घालून त्याची जमीन मिळवलेला. त्या जमिनीवर वसवलेला. त्यामुळे हा निसर्गनिर्मित देश नसून मानवनिर्मित आहे. हा नद्यांचा देश आहे तसा कालव्यांचा. आश्चर्याची बाब म्हणजे इथल्या तंत्रज्ञांनी प्रशस्त व छान रस्ते बनविलेले आहेत ते नदीच्या खालून, ज्यावरून मोठमोठे अवजड ट्रक, उंच डबलडेकर बसेस अरामात येऊ जाऊ शकतात. इतकेच नाही तर, समुद्राच्यावरूनही नद्या वाहतात, ज्यातून मोठमोठी जहाजे जातात. अमस्टरडॅम शहरात शंभर कालवे आहेत. या कालव्यांवर एक हजारांवर स्वयंचलित पूल आहेत. बरे हा देश लांबी रुंदीने मोठा आहे, असे समजण्याचे कारण नाही. त्याची लांबी ३०४ कि.मी. व रुंदी २५६ कि.मी. आहे. यात १२ प्रांत आहेत. इथली लोकसंख्या १६.७ दशलक्ष आहे तर प्रतिव्यक्ती जेडीपी कॅपिटा ४०,०४० यूरो आहे. इथल्या बेकारीचा टक्का ६.५ असून त्यासाठी सरकारकडून ठरावीक रक्कम दिली जाते. हा देश पूर्वी कोळी आणि शेतकऱ्यांचा असल्याने ग्रामीण संस्कृती इथे पावलोपावली दृष्टीस पडते. नेदरलँडचे मूळ निवासी डच आहेत. फ्रांसिसी, इंग्रजी, जर्मन, स्पॅनिश आणि पोतुर्गीज अशा अनेक भाषा या लोकांना आत्मसात आहेत. इथल्या शाळांमधूनही त्या भाषा शिकविल्या जातात परंतु या देशाची भाषा डच असून ती या देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला आलीच पाहिजे, हा दंडक आहे. शिक्षणाबाबत हे लोक जागरूक आहेत. मूल चार वर्षाचे झाले की, त्या भागातील शाळेत त्याचे नाव सरकारकडून नोंदविले जाते. शिक्षणाबाबतची नोंद मजेशीर आहे. मूल किंवा तरुण वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झाला की त्याचे आईवडिल त्यांच्या घराच्या दरवाजाजवळ काठीला दप्तर आणि फुगे टांगून ठेवतात. त्यावरून त्या भागात कोणकोण मुले पास झाली आहेत, याचा अंदाज इतरांना येतो. जिथे असे काही टांगलेले नसेल, तर लोक समजतात, या घरातला मुलगा नापास झाला आहे.

हा देश पवनचक्क्यांचा देश म्हणून ओळखला जातो. आज इथे बाराशे पवनचक्क्या आहेत. इथली माणसे आपले काम आपणच करतात. स्वतःसाठी आणि आपल्या घरासाठी काम करण्याची या लोकांची ही सवय एवढी खरी व प्रामाणिक असते की कुणाच्याही घरात नोकर वा ड्रायव्हर दिसणार नाही. सरकारी अधिकाऱ्यांना अन् मंत्र्यांना सरकारी घर, नोकर, कार, ड्रायव्हर यासारख्या सुविधा मिळत नाहीत. सायकलचा वापर सर्रास केला जातो. सायकल ही जणू त्यांची प्राथमिक गरज आहे. स्वावलंबन, स्वातंत्र्य आणि वेगाचे प्रतीक म्हणून मिरवल्या जातात त्या सायकलीच. कुठल्याही शाळेची स्वतःची बस नाही. इथे पुढे जाण्यासाठी वशिला वा अन्य प्रकार नाही कारण हा देश योग्यता आणि क्षमतेचा पुजारी आहे. जात, धर्म, वर्ण, वर्ग याला महत्त्व नाही.

साहित्य, कला यांची विशेष दखल घेणारा हा देश आहे. व्हॅनगॉगच्या नावाने इथे मोठे संग्रहालय आहे. अनेक मजल्यांची पुस्तकांची दुकाने इथे आहेत. प्रत्येक गावात, खेड्यात पुस्तकांची दुकाने आढळतात. पुस्तकनिर्मिती, विक्री, लेखकाचे मानधन, त्याचा दर्जा, यांची विशेषत्वाने काळजी घेतली जाते.

चीझ हा इथली विशेष खासियत. पशुपालन इथला सर्वात मोठा व्यवसाय आहे. १.९ मिलियन गायींपासून मिळणाऱ्या दुधापासून चीझ बनविण्याचा व्यवसाय इथे चालतो. चीझच्या बावीस फॅक्टरीज इथे आहेत. चीझचे अनेक प्रकार असून त्याचे स्वतंत्र संग्रहालय आहे. त्याचा खास महोत्सव आयोजित केला जातो.

इथल्या लोकांना भटकंतीचे वेड आहे. सुट्टी मिळाली की ते भटकंतीवर निघतात. मनासारखे राहणे, जगणे यातही ती आनंद, सुख मिळवत असते. लग्न हा त्यासाठी अडसर नाही. दागिन्यांची हौस नाही. शरीर हाच तिच्यासाठी दागिना असतो.

फूटबॉलचा खेळ ही या देशाची ओळख. तशी ट्युलिपची फुले. हा देश ओळखला जातो तो या दोहोंसाठी. भारतीय लोक पिढ्यान् पिढ्या इथे नांदत आहेत. त्यांनी चालीरिती जपल्या आहेत.

एखाद्या देशाविषयी लिहिताना प्रथम तो देश पूर्णपणे आत्मसात करावा लागतो. त्याच्या अंतरंगात उतरावे लागते. मानवी मन, समाजाचे तत्वज्ञान समजून घ्यावे लागते आणि निसर्गाचा एक भाग होऊन जगावे लागते. तर तो देश कळू शकतो, शब्दांत मांडता येऊ शकतो. पुष्पिता अवस्थी यांचे लेखन या सगळ्यांची साक्ष देते. एकेक प्रकरण घेऊन त्यांनी तिथली सगळी वैशिष्ट्ये वाचकांच्या समोर चित्रित करून दाखवली आहेत. त्यामुळे आपण पुस्तक वाचत नसून प्रत्यक्ष नेदरलँडमध्येच वावरत आहोत, असा भास होतो. आणि वाचून झाल्यानंतर असा देश एकदातरी पाहायलाच हवा, या निर्णयावर येतो. अवस्थी या हिंदीतील उत्तम साहित्यिक आहेत त्यांचे या भाषेतील साहित्यिक योगदान मोठे आहे. आणि त्यांचा त्यासाठी अनेक पुरस्कारांद्वारे सन्मान देखील करण्यात आलेला आहे. त्याच श्रेणीतील हे पुस्तक असून त्याचा अनुवाद मराठीत त्याच दर्जाने झालेला आहे, हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. जीवन आणि निसर्ग यांचे सौंदर्य उलगडून दाखवताना भाषेचे सौंदर्यही पदोपदी जाणवते. आपण अनुवादाच्या स्वरुपात हे पुस्तक वाचत आहोत, असे परकेपण इथे अभावाने देखील जाणवत नाही. सुलभा कोरे यांचे भाषेतील सिद्धहस्तपण इथे उठून दिसते.

नेदरलँडची ओळख म्हणजे तिथली जीवनशैली, सायकलचा जास्तीत उपयोग, बागा, मन मोहून टाकणारी ट्युलिपची फुले, पवनचक्की आणि भरपूर दूधदुभते. ही सगळी एकत्रित मांडून मुखपृष्ठ सजवले आहे. पाहताच क्षणी नेदरलँडची ओळख व्हावी. सतीश भावसार यांची ही कल्पना उत्तमच.

**मूल्य २०० रुपये ● सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**कथाव्रती अरविंद गोखले**
**लेखन-संपादन**
**नीला वसंत उपाध्ये**




**कथाकार अरविंद गोखले**

आयुष्यभर ज्यांनी उपासना केली ती कथेची. व्रतस्थ घ्यास घेतला तो कथेचा. जीवनाशी जोडून घेतली ती कथाच. असे कथा आणि कथाविश्वात रममाण झालेले कथाकार म्हणजे कथाव्रती अरविंद गोखले. ज्यांची पहिली कथा 'परशुरामियन' मधून छापून आली १९३५ मध्ये, म्हणजे वयाच्या १४ व्या वर्षी, तिचे नाव होते 'हेअर कटिंग सलून'. तिथून सुरू झालेला हा प्रवास अखंडपणे प्रवाही राहिला, अगदी त्यांच्या अखेरपर्यंत. या प्रदीर्घ प्रवाही काळात प्रकाशित झालेल्या कथांची संख्या आहे सहाशे. तर विविध प्रकाशकांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांची संख्या आहे एक्याऐंशी. इतके व्रतस्थपणे एकाच साहित्यप्रकाराशी इमान राखणे म्हणजे स्वतःच स्वतःची कसोटी पाहणे, पण ज्याना हे उत्तमपणे जमले, जगण्याशी जुळवून जगणे जमले, ते अरविंद गोखले सर्वांच्याच आदराचे स्थानक आहेत. असा अथक प्रवास करणाऱ्या ध्येयासक्त प्रवाशाविषयीचा ग्रंथ साकार केला आहे नीला वसंत उपाध्ये यांनी. नीला उपाध्ये म्हणजे 'पायोनियर रिपोर्टर!' एम्.ए. झाल्यानंतर तीव्र इच्छा होती ती प्राध्यापक होण्याची. जगणे पावन झाले ते मात्र पत्रकाराच्या खडतर व्रताने. पुरुषांच्या मक्तेदारीत पहिल्या झुंजार महिला पत्रकार. त्यांची या क्षेत्रावर उमटलेली कर्तबगारीची यशस्वी मोहर सर्वमान्य आहेच. त्यांच्या या यशस्वीतेच्या सन्मानावर गौरवाच्या मोहरांनी शिक्कामोर्तब केलेले आहे. एक नव्हे दोन नव्हे, तब्बल तीन डझन प्रतिष्ठेच्या पुरस्कारांचे शिक्कामोर्तब! या सगळ्याचे श्रेय त्या देतात ते अरविंद गोखले यांना. त्या अर्थाने ही एक भावांजली आहे, शीलू पाटील/नीला उपाध्ये यांनी काकांना वाहिलेली. शिष्येने गुरूला मनापासून वाहिलेली अनोखी भावांजली. एका स्वतंत्र ग्रंथाची भावांजली. तीही जन्मशताब्दीच्या प्रारंभाचे औचित्य आत्मीयतेने लक्षात ठेवून. अरविंद गोखले यांच्या जन्मशताब्दीचा प्रारंभ दि. १९ फेब्रुवारी २०१८ पासून सुरू झाला आहे. (जन्म १९ फेब्रुवारी १९१९, मृत्यू २४ ऑक्टोबर १९९२)

अरविंद गोखले हे नवकथेचा पाया रचणाऱ्यांच्या मांदियाळीतील एक समृद्ध नाव. गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, दि.बा. मोकाशी यांच्या पंक्तीतले. गोखल्यांचे लेखन यांच्या अगोदर सुरू झालेले. त्यामुळे नवकथेचा पाया रचण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. तरीही अरविंद गोखले यांनी ज्या प्रमाणात कथा लेखन केले, त्या प्रमाणात त्यांची समीक्षा झालेली नाही, असे म्हटले जाते. या ग्रंथात दि.के.बेडेकर, यशोधरा काटकर, उमाकांत कामत व डॉ. संस्कृती आवलगावकर अशा चार समीक्षकांनी गोखले यांच्या लेखनावर केलेल्या समीक्षेचा समावेश आहे. गोखले यांनी लिहिलेल्या 'मंजुळा', 'कोकराची कथा' अशा कथांसह इतर कथासंग्रहांची उत्तमप्रकारे समीक्षा केलेली आहे. तिच्यातून गोखल्यांच्या लेखनाच्या वेगवेगळ्या पैलूंचे दर्शन घडते. मूळ कथा आणि समीक्षकांनी त्यांच्या नजरेतून दाखविलेली गुणावगुणांची वैशिष्ट्ये, ही वाचकांसाठी आनंदाची, तर अभ्यासकांसाठी उत्तम मार्गदर्शक अशी शिदोरी म्हणावी लागेल. प्रकाशकांनी आपल्याला भावले त्याप्रमाणे गोखल्यांविषयी लिहिले आहे परंतु आनंद अंतरकरांनी गोखलेंविषयी लिहिलेला लेख मनाला चटका लावून जाणारा म्हणावा लागेल. गिरिजा कीर यांना 'दागिना' भेट देणारे गोखले, उत्तम शेजार लाभला असे डॉ. बाळ फोंडके यांना स्वतःहून सांगणारे गोखले, हा शेजारधर्म गोखल्यांमधील माणूसपणाचे दर्शन घडवणारा आहे. हेच माणूसपण वामन देशपांडे यांनाही अनुभवास आलेले. तीच गोष्ट त्यांच्या साहित्यिक उदारपणाची. नवकथेविषयीच्या प्रश्नाला ते मोकळेपणाने उत्तर देतात, 'गाडगीळांची कथा खऱ्या अर्थाने नवकथा म्हणता येईल.'

साधारणपणे अशा शताब्दीच्या भावनिक प्रसंगी उत्सवी स्वरूपाचे उत्साही ग्रंथ प्रकाशित होताना दिसतात. त्यांना झूल चढवली जाते ती सर्वात्मकतेची परंतु रूप प्राप्त होते ते मात्र स्मरणिकेचे. त्यामुळे तो सिद्ध झालेला ऐवज तात्कालिक ठरतो, उत्सवापुरता. त्यांना 'ऋतुविशेष' म्हणता येईल असे परंतु नीला उपाध्ये यांनी सिद्ध केलेला प्रस्तुतचा ग्रंथ हा त्या सगळ्यांना अपवाद म्हणावा लागेल. हा ग्रंथ सर्वार्थाने परिपूर्ण असा आहे. केवळ अनुक्रमणिकेवर नजर टाकली तरी या विधानाची सत्यता लक्षात येईल. अरविंद गोखले ही एक कुटुंबवत्सल व्यक्ती आहे. ते बहुआयामी असे स्वतंत्र शैलीचे लेखक आहेत. त्यांना मान्यवर प्रकाशक लाभले तसेच त्यांच्यावर मनापासून लोभ असलेले मैत्र लाभलेले आहे. शेजार, चाहते, आप्तस्वकीय आहेत. त्यांची चित्रपटाविषयीची आवड, त्यांच्या कोमेजल्यांनंतरच्या इतरांच्या भावना, असा सर्वांगाने विचार होऊन सिद्ध झालेला हा ग्रंथ आहे, हे या ग्रंथाच्या वाचनातून प्रत्ययाला येते. शेवटी त्यांचा अल्पसा परिचय दिलेला आहे, त्यावरूनही गोखले यांच्या एकूण प्रवासाचा वेध घेता येतो. यास्मिन शेख यांनी आपल्या विद्यार्थिनीविषयी वाटणारा अभिमान मोजक्या परंतु मौलिक शब्दांतून निर्मळपणे व्यक्त केला आहे. तो किती सार्थ आहे, हे ग्रंथाच्या सिद्धतेतून सिद्ध झाले आहे. यासाठी नीला उपाध्ये यांची काकांविषयीची कृतज्ञता (पृ.क्र. १५३) जरूर पाहावी. तसेच त्यांनी सुरुवातीला लिहिलेली प्रस्तावना पाहावी. कथा, तिचा कालखंड, तंत्राविषयीचा सखोल अभ्यास, लेखकाची मनोविश्लेषण पद्धती, नवकथेचे शिलेदार, असा दीर्घ आवाका असलेली ही प्रस्तावना म्हणजे कथालेखकांसाठी अभ्यासाचा उत्तम नमुना ठरावा. यातून नीला उपाध्ये एका विषयाकडे पाहताना किती समग्र विचार करतात, त्या बरहुकूम वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यास करतात, हे त्यांच्या लेखनातून दिसून येते. आणि साक्षेपी संपादक कसा असावा, हेही त्या यातून प्रत्ययास आणून देतात.

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २५० रुपये**

# ग्रंथपान

**इवल्या इवल्या गोष्टी**
**डॉ. उत्कर्षा बिर्जे**



## इवल्यांची गोमटी फळे

'अरे! अहेवपण संपलं म्हणून तिचं 'आहे'पण देखील संपवायचं? या कुंकवावर, या फुलांवर, या बांगड्यांवर अगदी बालपणापासूनचा हक्क आहे ना तिचा. मग पती निधनानं त्यांच्यावर घाला का? तिचे रंग त्या पुरुषाशी खरंच जुळलेले असतील आयुष्याचे, तर त्याच्या जाण्यानं तिनं बेरंग होऊन जगावं का? कशासाठी?' हे उद्‌गार आहेत डॉ. उत्कर्षा बिर्जे यांच्या एका लेखातील! डॉ उत्कर्षा बिर्जे यांच्या लेखांचा संग्रह ग्रंथालीने प्रकाशित केला आहे. डॉ. बिर्जे म्हणजे बहुआयामी व्यक्तिमत्व. व्यवसायाने डॉक्टर, त्या क्षेत्रात स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटवलेल्या. नाटक, कला, अभिवाचन, कार्यशाळा, लेखन, असे साहित्य आणि कलेल्या प्रांतात आकंठ बुडालेले व्यक्तिमत्व. मनाचा सळसळता उत्साह, झोकून देऊन काम करण्याची आवड, आजूबाजूला जे घडते त्याकडे पाहणारी चिकित्सक नजर, स्वतंत्रपणे विचार करण्यातली प्रगल्भता. त्यामुळे सतत गोतावळ्यात राहूनही वेगळेपण असलेले उठावदार व्यक्तिमत्व. त्यांचा हा 'इवल्या इवल्या गोष्टी' संग्रह म्हणजे लेखसंग्रह होय. नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रह. डॉक्टर -रुग्ण, कॉलेज, होस्टेल, सण, संस्कृती, परंपरा, निसर्ग, व्यक्तिविशेष अशा विविध विषयांवरील हे लेख आहेत.

समारंभात दिलेला फुलांचा गुच्छ अनेकदा तिथेच टाकून दिला जातो, घरी नेला तर तातपुरता घराचा कोपरा सजवण्यास मदत करतो. त्यापेक्षा कुठल्याही समारंभात पुस्तक भेट द्यावी. त्यासाठी त्यांनी सफदर हाश्मीच्या ओळी दिल्या आहेत,

'किताबे कुछ कहना चाहती है, तुम्हारे पास रहना चाहती है.'

दिव्यांची पूजा करणे ही एक संस्कृती. परंतु मृत्यू-अपघाती मृत्यू येतो तेव्हा अवदान करून दुसऱ्याच्या जीवनाची ज्योत पुढेही तेवत ठेवू पाहणारे लोक आहेत. त्याचे अनुकरण सगळ्यांनी केले तर ती खऱ्या अर्थाने दीपपूजा ठरेल. मृत्यूसमयीचे संगीत हा आणखी एक वेगळा विषय. 'जगणं सुंदर करणारे संगीत मृत्यूही सुंदर करू शकतो, मग इहलोकी उरलेल्यांना डेथबँड दिलासा देत असेल तर यात नवल ते काय?'

चांदरात म्हणजे भुरळ घालणारा देखावा आणि त्यात सळसळणाऱ्या सापाची कांती तशीच दिसावी, ही त्यातला आनंद घेण्याची नजर. केशरी रंग हा लेखिकेचा आवडता रंग. त्याच रंगात दिसणारी फुले, फळे, रस, कपडे, विस्तव, ही जणू त्यांच्या अंतरंगात झिरपली आहेत. त्या लिहितात, 'केशरी रंग नुसता रंग नाही तर एक वृत्ती होऊन राहिलाय माझ्यात.'

स्वातंत्र्य हा विषय केवळ देशापुरता मर्यादित विषय नाही. महिलांनाही त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारापासून स्वातंत्र्य मिळायला हवे. होणाऱ्या अत्याचाराने केवळ पिडित महिलाच नाही, संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. या घटनेकडे केवळ अपघात म्हणून पाहिले तर ही परवड कमी होईल, असे त्यांना वाटते. पैशाच्या मागे धावून समृद्धीचा ध्यास धरण्यापेक्षा मनाप्रमाणे जगण्याची समृद्धी खरी समृद्धी. शिक्षणातून भाषा कळते, आत्मसात होते, परंतु माणूस वाचण्याची, त्याचा इतिहास समजून घेण्याची भाषा अवगत होणे तितकेच महत्त्वाचे आहे. डॉक्टरी व्यवसायात येणारे अनेक अनुभव आहेत. त्यात डॉक्टरांचे स्वभाव कळतात, तसे रुग्णांचेही स्वभाव कळतात. रुग्णाच्या नातेवाईकांची तऱ्हा आणखी वेगळी असते. त्यांचे समाधान, डॉक्टरांकडून असलेल्या अपेक्षा, खोटेपणा त्याविषयीचेही स्वतंत्र लेख आहेत. निसर्ग हा सुद्धा लेखिकेच्या मनाचा हळवा कप्पा आहे. त्यात म नसोक्त राहायला, पाहायला, अनुभवायला मनापासून आवडते. त्याविषयी भरभरून कौतुक केलेले आहे. एक समृद्ध अनुभव देणारे असे हे लेख आहेत. त्यात दिलेले अनुभव, घटना, व्यक्ती, उदाहरणे यांची व्याप्ती पाहता त्यांच्यावर प्रत्येकी स्वतंत्रपणे कथा लिहिता येतील.

नियतकालिकातून सदर लेखन करायचे म्हणजे त्याला अनेक मर्यादा असू शकतात. विशिष्ट चौकटीत लेखन करायचे असते, तेही कसदार. विषयावरील हुकूमत सुटता कामा नये, त्यात सैलपणा असता कामा नये. जे सांगायचे ते मोजक्या शब्दात परंतु चपखलपणे. त्यातही सातत्य राखण्याचे आव्हान असते. हे एकप्रकारचे शिवधनुष्य पेलण्यासारखे असते परंतु डॉ. बिर्जे यांनी हे शिवधनुष्य लीलया पेललेले आहे असे ठामपणे दिसून येते. अंगभूत व्यक्त होण्याची ताकद, सोबतीला अनुभवांचा प्रचंड खजिना आणि मनाचा तरल चिकित्सकपणा. विचारांची प्रगल्भता आहे. शरीरशास्त्रासोबतच मानवी स्वभावांचा अभ्यास आहे. त्यामुळे झालेले लेखन कसदारपणे उतरले आहे. स्पष्ट आणि परखडपणे त्यांनी आपली मते व्यक्त केलेली आहेत. लेखनाची शैली ही चित्रदर्शी आहे. तपशिलांचे सर्व रंग त्यात भरलेले दिसून येतात. गण्याकडे मुक्त नजरेने पाहण्याची दृष्टी लेखिकेने जपलेली दिसून येते. अडथळ्यांना कुरवाळत बसण्यापेक्षा त्यातून मार्ग निघू शकतो, असा आशावाद त्यांच्याकडे आहे. त्याचा प्रत्यय लेखांमधून येतो. लेख लहान असले तरी ते मनाचा ठाव घेणारे आहेत, त्या त्या विषयांशी वाचकाला खिळवून ठेवणारे आहेत, स्वतंत्र विचारांची हमी देणारे आहेत, इतकेच नव्हे तर वाचकाला स्वतंत्रपणे विचार करायला भाग पाडणारे आहेत. कविता हा लेखिकेचा जिव्हाळ्याचा विषय. त्यांच्या ओळी लेखांच्या ओघात चपखलपणे येतात.

पुस्तकाला अंजली अंबेकर आणि शुभदा पटवर्धन यांचे प्रस्तावना स्वरूपाचे सुंदर मनोगत लाभले आहे. लेखनातली वैशिष्ट्ये आणि मैत्रीतले भाव उत्कटपणे व्यक्त केलेले आहेत.

सतीश भावसार यांनी या पुस्तकाचे तरल-कल्पक मुखपृष्ठ सजवले आहे.

**मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रुपये**

# ग्रंथपान

**कत्ती**
**विलास माने**




**आभाळाखालचा कार्यकर्ता**

'माझ्या समाजातील सर्व समाजबांधव आणि भगिनी सामाजिक, सांस्कृतिक परंपरा, देवदेवता, अंधश्रद्धा या अनिष्ट चुकीच्या मार्गात अडकलेल्या व पिढ्यानपिढ्यांपासून चुकीचा मार्ग सोसत, भोगत आहेत. त्यांना वरील सर्व अन्यायाच्या बेडीतून मुक्त करून एक नवीन दिशा देऊन, त्यांना संस्कारित समाजाच्या प्रवाहात आणून, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक अशा सर्व गोष्टीपासून लाखो मैल दूर असलेल्या समाजाला बौद्ध धम्माच्या प्रवाहात आणण्यासाठी मी आणि माझे सर्व सहकारी यांनी काट्यावरची लढाई केली. सगळ्या जमातीच्या सम ाजाला धम्मात आणण्याची कसरत केली.' असा हा विलास माने नावाचा खंदा कार्यकर्ता, संघटनेचा नेता, संस्थेचा सचिव, कुटुंबाचा प्रमुख. सर्ववेळ कार्यकर्ता . परंतु ना त्याला स्वतःचे घर, ना त्यासाठी पैसा. जन्मापासून हेच भोग सहन करीत आलेला, नव्हे पिढ्यान्‌पिढ्या अशाच परिस्थिचा वारसा चालविणारा हा कार्यकर्ता. त्याचे हे आत्मकथन, 'कत्ती!' लक्ष्मण माने यांचे 'उपरा', दया पवार यांचे 'बलुतं' या परंपरेतील, एक अस्सल आत्मकथन म्हणजे 'कत्ती!'

गावकुसाबाहेर, वळचणीला असलेल्या समाजवस्तींपैकी कैकाडी समाजातील विलास माने हे या आत्मकथनाचे चरित्रनायक. लहानपणापासूनचे जगणे हे जगण्याला लाज वाटावी असे. कधी भाकरतुकडा आहे, तर कधी नुसतेच पाणी पोटात रिचवून झोपायचे. राहायला घर नाही. काबाडकष्ट करूनही उपासमार ठरलेली. राबायला शेतजमीन नाही. आईवडिल, बहीणभाऊ हीच वडिलोपार्जित कमाई. आलीच काही बापकमाई तर ती दारूच्या व्यसनात त्याच्यासोबत पवित्र होऊन जाई. आजूबाजूचे वातावरण शुद्ध असण्याची कल्पना म्हणजे स्वप्नात वावरण्यासारखे. सारे काही गावाच्या मर्जीवर, सरपंचाच्या मेहरबानीवर, उरलीसुरली ती स्वतःची हिंमत. या गावावरून त्या गावाला पाल टाकणे, परिस्थिती सारखीच. शिंदीच्या फोकापासून पाट्या विणायच्या, त्या विकायच्या, त्यावर गुजराण. त्यातच संसार, मुलींची लग्ने, शिक्षण. या साऱ्यात आशेचा एकच किरण, विलासचे शिक्षण. कसेबसे तो ते पूर्ण करतो परंतु त्याचा उपयोग स्वतःच्या कुटुंबासाठी न करता, आपल्या समाजासाठी करतो. तळागाळात रूतलेला हा समाज त्यातून वर काढण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे हे आत्मकथन ढोबळमानाने स्वतःच्या दुःखाची शाल घेऊन येत नाही, तर ज्यांना समाजाने, संस्कृतीने खरोखर भरडून टाकले आहे त्यांना नवीन जगण्याची, उमेदीची ऊब देणारी शाल कशी बहाल करता येईल, या धडपडीची, कष्टाची, जिद्दीची ही कथा आहे.

अंधश्रद्धा, नवस यासारख्या परंपरेने आलेल्या अनेक गोष्टींची दखल लेखकाने घेतली आहे. त्यांना स्वतः डोळ्यांनी पाहिले आहे, अनुभवले आहे. लग्न रिवाज हा केवळ सोहळा नाही, तर अनेक धागेदोऱ्यांनी त्याला आवळून टाकलेले आहे. त्यात सरपंचाचा शब्द अखेरचा. लग्न झाल्यानंतरही संसार सुरळीत पडेल याची ग्वाही नाही. स्त्रियांवरील अत्याचाराला तर सीमाच नाही. हे अत्याचार त्यांच्याच समाजाकडून होतात असे नाही, तर धनदांडगे, इतर समाज त्यात आघाडीवर असतो. आपण कुठल्या जगात वावरतो आहोत, कुणाशी कसे वागतो आहोत, माणूस म्हणून जगण्याचा हक्क फक्त ठरावीक जातीतील समाजालाच आहे का, असे अस्वस्थ करणारे असंख्य प्रश्न नजरेसमोर उभे राहतात.

'उपरा'कार लक्ष्मण माने यांच्यासारखे अनेक कार्यकर्ते सोबत आहेत. बौद्ध धम्माची दीक्षा हा मोठा आणि वेगळा निर्णय डॉ. बाबासाहेबांनंतर घेण्याची क्षमता असलेले हे नेते. त्यांनी या समाजाला स्वतःचे स्थान निर्माण करून देण्यात जी दूरदृष्टी दाखवली, त्यासाठी मेहनत घेतली, त्यात विलास माने यांच्यातला कार्यकर्ता उठून दिसतो. किल्लारीचा भूकंप झाला, त्यात झोकून देऊन काम करणारा हाच कार्यकर्ता. अनेकांचे प्रश्न सोडवताना द्वेषाला पात्र ठरून चाळीस दिवसाची पोलिसकोठडी सहन करणारा हाच तो कार्यकर्ता आणि जन्माला आला तेव्हा ज्या परिस्थितीत उघड्यावर राहत होता, आजही तसाच उघड्यावर राहणारा आभाळाखालचा कार्यकर्ता!

हे आत्मनिवेदन प्रथम पुरुषी आहे. ते त्यांच्याच भाषेत आहे. भाषेत गोडवा आहे, तसा राकटपणाही आहे. सराईतपणे बोलली जाते, त्याच पद्धतीने निवेदनाचा बाज ठेवलेला आहे. संवादात शिव्यांचा वापर सर्रासपणे करण्याकडे असलेला कल इथेही तसाच कायम ठेवलेला आहे. परंतु तो अंगावर न येता त्या भाषेचा मोकळेपणा दाखवतो. म्हणींचा वापर वा त्यासारख्या वाक्यांचाही वापर हा या भाषेचे वैभव दाखवतो. 'मी काय अकरामाशी अन् माझी बायको फिकरामाशी न्हाय. मी पिवर बारामाशी हाव.' 'उकड्यांचं पांग फिटतंय, हे तर मानूस हाय.' 'येड्याचं चित बोड्यावर, गुरवाच चित निवदावर.' 'माझं लग्न हे वैशाखी वनव्यातला वसंत होता. पण जे घडलं होतं ते या वसंतातल्या आगीने दिलेल्या चटक्यासारखं होतं.' कैकाडी समाजाची स्वतःची अशी भाषा आहे. ती जशीच्या तशी समजून घेणे वाचकासाठी अवघड आहे. म्हणून तिचा वापर मर्यादित ठेवला आहे. तिचा अनुवादही वाचकासांठी दिलेला आहे.

आत्मनिवेदन म्हटले की त्याला आत्मस्तुतीचा गंध असतो. स्वतःचे मोठेपण उगाळून उगाळून सांगण्यावर भर असतो. परंतु 'कत्ती' हे त्याला अपवाद म्हणावे लागेल. मुळातच या कथानकाला असलेला परीघ खूप मोठा आहे. कुटुंब, समाज, त्यांचे प्रश्न, सामाजिक–सांस्कृतिक प्रश्न यांचा तळ इतका खोल आहे की, त्याची जुळणी करण्यातच लेखकाला मोठेपणा वाटलेले आहे. हा निरपेक्षपणा त्यांच्या वृत्तीचा निदर्शक आहे. स्वतःच्या कुटुंबापेक्षा समाज नावाच्या कुटुंबाचा विचार त्यांना मोठा वाटलेला आहे. त्यामुळेच इतर मोठ्या नेत्यांसोबत नेहमी राहूनही ते त्यांच्याविषयी सांगत राहतात. मानेसारख्या खंद्या कार्यकत्याच्याच ठायी असा मोठेपणा असू शकतो. अवश्य वाचावे असे हे आभाळाखालचे पुस्तक आहे.

पालावरच्या जगण्याचे प्रतीक असलेली 'चूल' असलेले समर्पक मुखपृष्ठ सजवले आहे चित्रकार सतीश भावसार यांनी.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

## सौंदर्य आणि सामर्थ्याचा संगम

डॉ. द.ता. भोसले यांचा ग्रंथालीने नुकताच प्रकाशित केलेला 'कथा रत्नावली' हा रूपककथांचा ताजा संग्रह. डॉ. भोसले हे नाव मराठी साहित्याच्या नभांगणात कसे आणि कुठे आहे, असा प्रश्न कुणाला असेल तर त्याचे उत्तर आहे, या संग्रहाच्या मुखपृष्ठावर साकारलेला चंद्र दिसतो ना, तसे आहे. स्वतःच्या मनस्वीपणात रमलेले, स्वतःच्या परिघात मावू न शकणारे परंतु वर हिमनगासारखे अस्तित्व दाखवणारे. फार नाही परंतु ज्यांचे मोजमाप करण्यासाठी मानदंडाला स्वतःचा परीघ तपासावा लागावा असे पस्तीस ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. त्यांचा हा नवा अविष्कार रूपककथांच्या रूपाने वाचकांच्या हाती आला आहे.

रूपककथा म्हणजे काय, तिचे स्वरूप, तंत्र, आशय म्हणजे काय, असा प्रश्न काहींच्या मनात असू शकतो. विशेषतः इसापनीती वा पंचतंत्रातील कथा वाचणाऱ्या वाचकांना. तर त्याचे उत्तर आहे डॉ. भोसले यांचा हा कथासंग्रह. कथासंग्रहाच्या प्रारंभीच डॉ. भोसले यांनी लिहिलेले मनोगत अवश्य वाचावे. नव्याने या साहित्यप्रकारात लिहू इच्छिणाऱ्या लेखकांसाठी, साहित्याच्या अभ्यासकांसाठी मार्गदर्शक ठरावी, अशी ही प्रस्तावना आहे. इसाप, खलील जिब्रान यांनी केलेले अशाप्रकारचे लेखन हे निश्चित उत्तम आहे. परंतु ते शेवटी एका निर्णयावर येते, त्यातला बोध व्यक्त करते, प्रयोगशाळेतील प्रयोगासारखे. डॉ. भोसले यांची कथा यापेक्षा वेगळी आहे. ती वि.स. खांडेकरांची परंपरा सांगणारी कथा आहे. खांडेकरांनंतर इतकी सशक्तपणे लिहिली गेलेली ही पहिलीच कथा आहे, 'कथा रत्नावली'! या कथेला सापेक्ष असे प्रयोजन आहे. हेतूतः तार्किक संगती आहे, आणि तिच्या सिद्धतेविषयीचा ठाम विश्वास आहे. तो सफल व्हावा, वाचक तिचे स्वागत करतील, अशी लेखकाची अपेक्षा आहे.

या कथा यापूर्वी प्रकाशित झालेल्या आहेत, 'दै. पुढारी' आणि 'जडणघडण' मासिकातून. आकाराने दोन पानी म्हणूयात. परंतु आशय आपण घ्याल तसा. म्हटला तर मूठभर म्हटला तर कवेत घेता येणार नाही असा. ईश्वराच्या शोधासाठी अनेकजण घरदार, संसार, वैभव सोडून बाहेर पडतात. जंगल, डोंगर दऱ्याखोऱ्यांत भटकंती करतात. परंतु प्रत्यक्षात अशी वणवण करण्याची गरज नाही. ईश्वाराला देहरूपात शोधण्यात अर्थ नाही. प्राणिमात्र, निसर्ग हाच ईश्वररूपाने आपल्याबरोबर वावरत असतो. तोच मन:शांती देत असतो, हे 'राजपुत्र'कथेत लहानशा उदाहरणावरून लक्षात आणून दिले आहे. 'हरवलेले दिवस' शोधून त्यांना अमरत्व देण्यात व्यर्थ धडपड करण्यापेक्षा, उरलेल्या आयुष्याला अमरत्व देणाऱ्या जागा नव्याने शोधण्यात शहणपण आहे. माणसाला सोसण्याचे, सहन करण्याचे, पचवण्याचे, झेलण्याचे 'बळ' आणि शहाणपण येते कुठून? ती शक्ती गरिबीत आहे. ती घडवतेही आणि तुडवतेही. विसाव्या शतकाने माणसाला रिटायर केले आहे. एकविसावे शतक कदाचित माणूसकीलाच रिटायर करून टाकील. यात मनाला चटका लावून जाणाऱ्या काही कथा आहेत. त्यापैकी एक आहे 'शिल्प'. राजवाड्यासमोर शिल्पे तयार करून घेतली जातात. काळवेळ बदलते. शिल्पे भग्न पावतात. पायदळी येतात. कुणाला त्याचे काहीच देणेघेणे वा सुखदुःख नसते. मात्र हे शिल्प तयार करणारा शिल्पकार नव्या राजाचे शिल्प करायला प्रारंभ करतो. मनाला चटकाच नव्हे तर गोठवून टाकणारी ही कथा आहे. म्हातारी मेल्याचे दुःख नाही, मी कर्तव्यात कसा निरपराध आहे, हे आजच्या काळाचे लक्षण 'दोष कुणाचा' या कथेत मार्मिकपणे मांडले आहे.

राज्यकर्त्यांचा लहरीपणा हा जनतेसाठी करमणुकीचा खेळ नव्हे तर चिंतेचा विषय झाला आहे. त्याचे उदाहरण म्हणजे 'बदल' ही कथा. अशा जवळपास पन्नासेक कथा या संग्रहात आहेत. प्रत्येकीचे वेगळेपण, माणूस, स्वभाव, गरिबी, शोध, षड्रिपू, निसर्ग, अशा विविध पैलूंचे दर्शन या कथा घडवितात.

डॉ. द.ता. भोसले हे नुसते लेखक नाहीत, वा नावांवर पुस्तकांची वाढलेली संख्या पाहण्यासाठी खर्डेघाशी करणारे लेखनकामाठी नाहीत. तर आहेत जीवनाकडे अतिशय तरलतेने पाहणारे, जगण्याचा सर्वांगीण अन्वयार्थ शोधणारे, वाङ्मयातल्या अभिजात कलात्मकतेवर प्रेम करणारे, सौंदर्य आणि सामर्थ्य यांचा जिवंत प्रवाह सतत खळाळता ठेवणारे, असे जीवनभाषी लेखक. त्यांची आतापर्यंत प्रकाशित झालेली साहित्यसंपदा आणि त्यांचा एकूण लेखनप्रवास यातून त्याची प्रचीती येते. लेखन करताना आपण कोणत्या साहित्यप्रकारातील लेखन करीत आहोत, त्याचे तंत्रमंत्र आणि आशय कसा आहे, आपणाला काय सांगायचे आहे, याचा आधी केलेला सर्वांगीण अभ्यास, चिंतन, संदर्भांचा मेळ, त्यांचे साहित्य वाचताना प्रत्ययास येतो. सदरच्या पुस्तकात देखील त्यांच्या या अभ्यासाचा, चिंतनाचा, लेखनातील वेगळेपणाचा अनुभव येत राहतो. भाषा साधी सोपी असावी. कुणालाही ती सहजपणे आकलन व्हावी. आशयाच्या नेमकेपणापर्यंत वाचकाला घेऊन जाता आले पाहिजे. त्यांच्या मनांत आशयाबाबत संभ्रम शिल्लक राहता कामा नये. मात्र हे सारे सूचकतेने आणि कलात्मकतेने व्हावे, ही त्यांनी घेतलेली दक्षता खरोखरच दुर्मीळ आहे. वाचकाला ती वाचनाचा आनंद देऊ शकते. 'कथा रत्नावली' हे त्याच परंपरेतले नवे पुस्तक, स्वतःचे वेगळेपण जपलेले. त्यातली तरलता, भाषेचे नितळ सौंदर्य, विचारांतील सुस्पष्टता, नेमकेपणातला जोपासलेला काटेकोरपणा, ही याची वैशिष्ट्ये म्हणावी लागतील. कुठलेही पान काढा, वाचा, मनाची पकड घेते. वाचले ते मनात रेंगाळत राहते, दृष्टांत म्हणून सहज सांगता येतील अशा या सुंदर कथा घेण्याजोग्या आहेत.

या पुस्तकाचे मुखपृठ सजवले आहे चित्रकार सतीश भावसार यांनी. भावसार यांच्याकडे ती नजर आहे, याचा प्रत्यय मुखपृष्ठाकडे पाहून येतो. आत कथांना अनुरूप अशी श्रीधर अंभोरे यांनी रेखाटलेली रेखाचित्रे आहेत. तीही अतिशय बोलकी आहेत.

**कथा रत्नावली**

**द.ता. भोसले**




**मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान


**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**


**कारवारी माती**

**वसंत नरहर फेणे**




**माती, माणसे आणि काळ**

'खरोखरीची विरक्ती ज्याला येते त्यानं संन्यास स्वीकारणे, हे त्याचे कर्तव्यच! संसारात पराभूत झालेल्यांसाठी संन्यास ही सन्माननीय पळवाट! या दोन्ही गोष्टी स्वतःला लागू पडत नाहीत, हे गणा जाणत होता. त्यामुळे ज्यात आपला जीव नाही, त्या आताच्या संतपणाच्या सोंगात आपण अधिक काळ रमाणार नाही, हे तो जाणत होता. लौकिक जगातच नाव कमवावं, इतरांपेक्षा श्रेष्ठ ठरावं, ही त्याच्या जिवाची आस!'

आकाराने प्रचंड म्हणावी अशी ही कादंबरी ६२० पृष्ठांची आणि तिचा कालखंड आहे सत्तेचाळीस वर्षांचा, म्हणजे १९०१ ते १९४७ च्या स्वातंत्र्यदिनापर्यंतचा. यातील प्रमुख व्यक्तिरेखा आहेत गणा, त्याची पत्नी गंगाबाय, मुलगी मथी आणि मुलगा विद्याधर. गणा त्याकाळचा व्ह.फा. आपण इतरांहून काही वेगळे करून नाव कमवावे ही ओढ. स्वाभिमानी. त्यापायी त्याचा सततचा प्रवास. शिक्षक, शेतकरी, हरदास, वैद्य. घरदार सोडल्याने मागे गंगाबायची परवड. ती धीराने उभी राहते. कुटुंब सांभाळते. मुलगी मथीचे लग्न तिच्या वडिलांसमान बिजवराशी होते. पार्वतीबाय म्हणून तिचा संसार सुरू होतो. तो मध्येच खुंटतो पण आयुष्य आणि जबाबदाऱ्या कायम आहेत. विद्याधर हुशार, एकपाठी. त्यालाही शिकून वेगळे काही करून नाव कमवायचे आहे. अशा चार व्यक्तिरेखा या कादंबरीचा सगळा तोल सांभाळतात. त्यांच्या जोडीला इतर अनेक व्यक्तिरेखा आहेत. गंगाबायचा भाऊ गजा, पार्वती झालेल्या मथीची काशा, दुर्गा ही सावत्र मुले. तिचा स्वतःचा दिगंबर. शिवाय गणाच्या आयुष्यात येणारी लक्ष्मी. या सगळ्यांचा वावर हिचकड, होन्नेकरी, धारवाड, अर्वशा, मुंबई, कलकत्ता, विलायत येथे आहे. त्यांच्या आयुष्याच्या दिशा त्यांच्या-त्यांच्या ध्येयानुसार ठरतात, काही परिस्थितीला सामोरी जातात तर काही भिरभिरत राहतात.

वसंत नरहर फेणे आपणास परिचित आहेत ते एक कसदार लेखक म्हणून. जवळपास तीस पुस्तकांची संपदा त्यांच्या नावावर आहे. 'कारवारी माती' ही त्यांची शेवटची कादंबरी. वयाच्या ९२ व्या वर्षी प्रकाशित झालेली. विशेष म्हणजे या कादंबरीच्या प्रकाशनाला, तिच्यावर झालेल्या चर्चासत्राला उपस्थित राहून त्यांनी या कादंबरीमागील प्रेरणा, कालखंड, तिच्याशी असलेले नाते स्वतः व्यक्त केले होते. योगायोग असा 'सेंट्रल बसस्थानक' ही पहिली कादंबरी प्रकाशित करण्याचा मान 'ग्रंथाली'कडे गेला तसा त्यांची 'कारवारची माती' ही शेवटची कादंबरी प्रकाशित करण्याचा मान 'ग्रंथाली'कडेच आहे. आजही आपल्या स्मरणात त्यांची पहिली कादंबरी, 'सेंट्रल बसस्थानक' आहे. स्मरणात राहण्याचे कारण विषयातले वेगळेपण, विषयाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी, कथानकाला बांधीव स्वरूपात आकार देण्याची शैली, व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये ठाशीवपणे रेखाटण्यातले कसब आणि सतत काळाचे राखलेले भान. हे गुण केवळ 'सेंट्रल बसस्थानक'पुरते मर्यादित आहे असे नव्हे, तर त्यांच्या एकूण सर्वच साहित्यातून ते प्रत्ययाला येतात. 'कारवारी माती' ही या सगळ्या गुणांनी संपन्न असलेली कादंबरी म्हणता येईल. लेखनात महत्त्व असते ते कथानकाची गुंफण कशी केली याला. त्यादृष्टीनेही ही कादंबरी श्रेष्ठ ठरते. गणा घर सोडतो त्याचे कारण भूक. घरात शिजवायला अन्नच नाही असे पत्नी गंगाबाय त्याला सांगते. ही घटना कादंबरीच्या सुरुवातीला येते आणि कादंबरीच्या अखेरीस विद्याधर, गणाचा मुलगा घर सोडतो, त्यालाही कारण भूक असते. विद्याधरचा हा घर सोडण्याचा प्रसंग वाचताना वाचक थेट गणाच्या प्रसंगाशी येऊन-येऊन थांबतो. लेखकाचा कसदारपणा हा त्याच्या चिंतन, ध्यासातून व्यक्त होतो. त्याचीही उदाहरणे आपणास जागोजागी प्रत्ययास येतात. उदा. 'बाई गं, तू धीर सोडायचा नाही. पुरुष चेवानं पराक्रम करतोही आणि अपेशानं खचतोही, पण धीर सोडते ती बाईच नाही.' 'जात ही एकच गोष्ट या समाजात आहे, जी अनेक अंगांनी अनेक प्रकारे एकाचवेळी कार्यरत असते.'

ही कादंबरी इतिहासाचा मागोवा घेते. समकालीन होत असलेल्या घटनांचा उल्लेख करते. ब्रिटिशांची सत्ता आणि तिच्या विरोधात उभी राहिलेली चळवळ दाखवताना मोजक्याच घटनांचा उल्लेख केलेला आहे परंतु त्या सनावळीसह दिलेल्या आहेत. यात बंगालच्या फाळणीपासून ते स्वातंत्र्यापर्यंतच्या घटना आहेत. गांधी, टिळक, जीना, डांगे, वसंतदादा पाटील, काँग्रेस, कम्युनिस्ट, भूमिगत चळवळ आणि या सगळ्याकडे तिऱ्हाईतासारखे पाहत लाभ उठवणारी मंडळी रेखाटलेली आहेत.

फेणे हे लेखनावर निष्ठा असलेले असे एक लेखक. वाचकाला कथानकाशी खिळवून ठेवण्याची ताकद असलेले लेखक. त्यांची ही कादंबरी म्हणजे त्यांच्या आजवरच्या लेखनातली सर्वात उजवी अशी ही वृत्ती म्हणावी लागेल. आपल्या मातीची, मातीतल्या माणसांची, समाजभानाची, स्वातंत्र्याची पार्श्वभूमी लाभलेली, तो काळ प्रादेशिकतेसह नजरेसमोर साकार करणारी, वाचण्याचा समग्र आनंद देणारी ही कादंबरी आहे.

या पुस्तकाचे मुखपृठ सजवले आहे चित्रकार मनोज आचार्य यांनी. या पुस्तकातील लेखनाचा काळ, कारवार - धारवाड भागाची पार्श्वभूमी, त्याकाळाचे राहणीमान, घरे यांची ओळख आणि कथानक ज्या व्यक्तित्वाभोवती गुंफलेले आहे त्याची प्रतिकृती मुखपृष्ठावर छानपणे साकारलेली आहे. मातीचा लालसरपणा आणि त्यावर कृष्णधवल रंगातली विरक्त व्यक्ती हा समन्वय खिळवून ठेवणारा आहे.

**मूल्य ६०० रुपये सवलतीत ४०० रुपये**

# ग्रंथपान

## नोबेल साहित्यिक
**संजीवनी खेर**




**ज्ञानाचा 'नोबेल' कुंभ**

''तसं पाहिलं तर नोबेल मिळालेल्या प्रतिभावंतांची प्रतिभा समजून, त्या-त्या काळातील, त्या त्या देशांतील समाजमनाचा कानोसा घेताना आपल्या जाणिवांना बंद खिडक्यांप्रमाणे खाडखाड धक्के देऊन उघडत जातं. स्थल, काल, संस्कृती यांचे भेद भाषांतरित वाङ्मयातून आपल्यापर्यंत पोहोचून आपल्याला आनंद देतात. खऱ्या अर्थाने विश्वमानवाची स्पंदनं आपल्याला जाणवतात. अशा साहित्यिकांच्या लेखनातून निखळ नग्न मानवी जीवन आपण अनुभवू शकतो.''

आल्फ्रेड नोबेल यांच्या नावे देण्यात येणारा साहित्याचा नोबेल पुरस्कार हा नेहमीच औत्सुक्याचा आणि अभिमानाचा विषय असतो. १९०१ पासून म्हणजे ११७ वर्षांची परंपरा असलेला जगातील सर्वोच्च आणि श्रेष्ठ असा हा सन्माननीय पुरस्कार आहे. हा पुरस्कार मिळणे म्हणजे साहित्य आणि साहित्यिक यांची जागतिक पातळीवर दखल घेतली जाणे, त्यांचा सन्मान केला जाणे, यासारखा दुसरा सन्मान तो काय! हा सन्मान साहित्याचा असतो तसा त्याच्या लेखकाचा असतो. खरे तर इतकाच मर्यादित हा सन्मान राहत नाही, तो त्याच्या देशाचा, खंडाचा सन्मान ठरतो. लेखिकेने नमूद केल्याप्रमाणे तेथील लोक, संस्कृती, जनजीवन यांचा सन्मान असतो. हा सन्मान काही वेगळाच आनंद अभिमानासोबत घेऊन येतो. अशा जागतिक पातळीवर दखल घेतेलेल्या साहित्याविषयी रसिक, वाचक-अभ्यासकांच्या मनात नेहमीच कुतूहल असते, वाचनाची तीव्र इच्छा अनावर होते. साहित्यकृतीसोबत त्या लेखकाविषयीची माहिती मिळविण्याचे कुतूहल त्यातूनच येते. हे कुतूहल काही प्रमाणात शांत व्हावे, असे निवडक सव्वीस साहित्याचे नोबेल पुरस्कारप्राप्त साहित्यिक'नोबेल साहित्यिक' या पुस्तकात आहेत.

रवींद्रनाथ टागोर यांना साहित्याचे नोबेल मिळाले ते १९१३ साली. रवींद्रनाथ हे एकमेव भारतीय आहेत ज्यांना 'गीतांजली' या महाकाव्यासाठी साहित्याचे नोबेल मिळाले. त्यांचे साहित्य हे तत्त्वज्ञान, सौंदर्याच्या कोमल भावना आणि काव्यातील प्रासादिकता यांचा सुंदर संगम आहे, या लेखांत रवींद्रनाथ आणि त्यांचे साहित्य, इतकाच तपशील येत नाही, तर त्यांचे समकालीन लेखक, राजकारणी, त्यावेळचे सामाजिक, राजकीय वातावरण, जगाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन, शांतिनिकेतन, यांवरही लेखिकेने प्रकाश टाकलेला आहे. रुडयार्ड किपलिंग हे तर मुंबईत जन्मलेले ब्रिटिश लेखक. त्यांना १९०७ साली हा सन्मान मिळाला. त्यांच्या लेखनातून भारतीय मातीचा सुगंध येतो असे म्हटले गेले. त्यांच्याविषयी लेखिका लिहितात, 'आपल्या भारतीय चेहऱ्याच्या लेखनानं इंग्लिश साम्राज्य जवळ आणलं असं म्हटलं जातं. सुवेझ कालव्यानंही भारत इंग्लंडच्या जितका जवळ गेल नव्हता, तितका रुडयार्ड किपलिंगच्या लेखनानं जवळ गेला.' विद्याधर नायपॉल हे आणखी एक पुरस्कार प्राप्त लेखक, ज्यांची नाळ भारताशी जोडली गेलेली आहे. यांना हा सन्मान २००१ साली प्राप्त झाला. माणसाच्या अथांग महासमुद्रात व्यक्तींचा अस्तित्वासाठी चाललेला संघर्ष लेखनाला प्रवृत्त करतो, असे सांगणारे चिनी लेखक गॅओ झिंगजिॲन; शब्दासोबत शिल्प व चित्रांतून व्यक्त होणारे आणि भारत हा पांगुळगाड्यावर उभा असलेला शक्तिशाली देश आहे असे सांगणारे गुंथर ग्रास; 'ग्लास बीड्स गेम' आणि 'सिद्धार्थ'चे लेखक हरमन हेस; असे जागतिक पातळीवर मान्यता मिळालेले सव्वीस साहित्यिक या पुस्तकात आहेत.

'नोबेल साहित्यिक' हा लेखसंग्रह आहे. या पुरस्काराविषयीचे कुतूहल वाचकांच्या मनात नेहमीच असते हे लक्षात घेऊन त्याची माहिती लेखिकेने मनोगतात करून दिलेली आहे. लेखकाच्या कोणत्या साहित्यकृतीने या पुरस्कारासाठी निवड समितीवर प्रभाव टाकला, त्याच्या कोणत्या साहित्यकृतींनी वाचकांवर प्रभाव टाकलेला, त्याची अन्य दखल घ्यावी अशी कोणती साहित्यसंपदा आहे, त्यांची वैशिष्ट्ये, विषय कोणते आहेत, या विषयी लेखिकेने दिलेले तपशील त्यांच्या संशोधनातल्या बारकाव्यांची साक्ष देणारे ठरतात. वाचकांना वाचनाची आवड असते. उत्तम वाचण्याकडे त्यांचा नेहमीच कल असतो, परंतु अडचण असते ती नेमक्या संदर्भांची. त्यांची माहिती सहजपणे मिळते, असे कधी होत नाही. ती सोय या पुस्तकाने करून दिलेली आहे. नोबेलप्राप्त साहित्यिकांचे साहित्य ही तर वाचकासाठी पर्वणीच. त्यादृष्टीने वाचकांच्या हाती हा सदर्भ ग्रंथ मिळाला असे म्हणता येईल. लेखक आणि त्याच्या निवडक पुस्तकांचे फोटो पुस्तकाच्या मांडणीत भर घालतात तसे वाचकांना पुस्तक निवडीसाठी मदत करण्यात उपयुक्त ठरतील, असे आहेत. प्रत्येक लेखाच्या शेवटी त्या साहित्यिकाच्या साहित्याची यादी देखील मुद्दाम दिलेली आहे. लेखिकेने संपादक, पत्रकार, लघुपटकार, टीव्ही कार्यक्रम संचालक अशा वेगवेगळ्या भूमिकेतून लेखन केलेले आहे. कादंबरी, लेखसंग्रह, इतिहास, अनुवाद अशी मिळून प्रकाशित झालेल्या एकवीस पुस्तकांची संपदा त्यांच्या नावावर आहे. विषयातला नेमकेपणा हा विशेष गुण या लेखनात दिसून येतो. मोजक्या शब्दात आशयाला न्याय देण्यामुळे लेखांचा आटोपशीरपणा लक्षात घेऊनही खूप काही वाचकाच्या हाती शक्य झाले आहे. भाषेतला गोडवाही सहजपणे भावणारा आहे. साहित्यिक निवडण्यात डावेउजवे असे नाही, तरी भारताशी, आशियाशी नाते असलेल्यांची नोंद विशेषत्वाने जाणवते. खरे तर सगळ्याच नोबेलप्राप्त लेखकांचा परिचय करून देण्याचा उपक्रम लेखिकेने हाती घ्यायला हवा. वाचक त्याचे उत्स्फूर्त स्वागत करतील.

या पुस्तकाचे समर्पक मुखपृष्ठ सजवले आहे चित्रकार सतीश खानविलकर यांनी. पुस्तकांनी भरलेला कुंभ त्यांनी मुखपृष्ठावर साकारलेला आहे. ज्ञानामृताचा काठोकाठ भरलेला कुंभ आहे, असेच त्याच्याकडे पाहून वाटत राहते. आणि त्यावर नोबेलची प्रतिकृती भासावी असे शीर्षक याजलेले आहे. अतिशय तरल अशी ही कल्पना आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

## ग्रंथपान

**परीघ**

**सचिन जगदाळे**




**पत्रकाराची शोधपत्रकारिता**

'दादासाहेब! या सोडून देण्याच्या स्वभावामुळे तुम्ही सुखच सोडून दिलंय, असं नाही वाटत तुम्हाला? आपण एका परिघावर उभे आहोत. फिरून परत त्याच जागेवर यायचंय. तुम्ही कितीही टाळलं तरी आपला सामना होतंच राहणार. यातून सुटका नाही. हा कोश तुमहीच स्वतःभोवती गुंफून घेतलाय. तो आत्ताच तोडा, नाहीतर आणखी गुरफटत जाल. इतकं की नतंर यातून पूर्ण शरीराने बाहेर पडणं अवघड होऊन जाईल. एक एक अवयव वेगळा करून बाहेर काढावं लागेल. मन, बुद्धी ...सगळं भ्रमिष्ट होऊन जाईल. चांगला वाईटातला तुम्हाला अजूनही कळत असलेला फरक हळूहळू कळणं बंद होऊन जाईल.'

सचिन जगदाळे यांची 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेली 'परीघ' ही दुसरी कादंबरी आहे. परीघ हा काही माणसे स्वतः निर्माण करतात, कोशासारखा. त्या कोशाला ते आपले जग समजतात. काही जण या भ्रमात राहतात, आपल्याभोवती हे सुरक्षेचे कवच आहे. त्याच्या आत आपली सत्ता आहे, तिला कुणी हात लावू शकणार नाही. काहींना त्या कोशात ओढले जाते, काहींना या कोशाच्या फसवेपणाची कल्पनाच येत नाही. येते तेव्हा फार उशीर झालेला असतो. एका अर्थाने हा परीघ म्हणजे जाळे असते आकर्षक वाटावे असे, कधीतरी त्यात आपलाच बळी जाईल याची कल्पना नसलेले. जगदाळे यांनी अशाच एका परिघात असलेल्या वास्तवाचे चिवट धागे अलगदपणे वेगवेगळे करून दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. नव्हे एक परीघ भेदण्याचा प्रयत्नकेलेला आहे, भूमितीतील प्रमेय सोडवावे तसा.

ही एक गूढकथा आहे. जुन्नर तालुक्यातील वडगाव येथे गौरा लामखेडे आणि रूपाली विधाते या ऊस तोडणी कामगारांच्या मुलींचं हत्याकांड, हे या कथेचे आशयसूत्र आहे. याचा उलगडा करण्याच्या जबाबदारी पत्रकार अनिरुद्ध याच्याकडे आहे. त्यासाठी तो शहरातून या वडगावला येतो. तिथे मुक्कामाला राहतो. आणि तपासाच्या दिशेने पावले उचलतो. ग्रामीण भाग असल्याने तिथला बागाईतदार दादासाहेब, त्यांचा मगरूर आणि प्रतापी मुलगा प्रतापराव, सुशिक्षित, प्रेमळ मुलगी सुमन, प्रतापचा पाठीराखा आणि सतत त्याच्यासोबत सावलीसारखा राहणारा पहिलवान आप्पा, या यातल्या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. पालावरची अनेक कष्टकरी माणसं आहेत, जी सतत दहशतीच्या वातावरणात वावरताना दिसतात. त्यातली एक वेगळी व्यक्तिरेखा आहे सरू. जीवावर उदार होणे म्हणजे काय, याची महती सांगणारी सरू. अनिरुद्ध हा खुनाचा तपास करायला आलेला दुसरा पत्रकार आहे. अगोदरचा पत्रकार याच उद्देशाने आला होता आणि हाती काही लागण्यपूर्वी गौरा व रूपाली यांच्या मार्गानेच निघून गेला होता. अनिरुद्धसाठी देखील हाच मार्ग वाट पाहत त्याच्यासमोर उभा असतो. आपल्या उद्दिष्टापर्यंत पोहोचताना या मार्गाला कसे भेदायचे हे आव्हान अनिरुद्ध समोर सदैव आहे. यातच सुमन त्याच्यावर आपली प्रीती दाखवते. प्रतापराव आणि आप्पा हे त्याला आपल्या मार्गातला काटा समजून दूर करण्यासाठी तयारी करतात. या सगळ्यात महत्त्वाचे असते ते दादासाहेब यांनी स्वतः चा काही निर्णय घेणे. असे हे एक मोठा पट असलेले कथानक आहे.

सचिन जगदाळे यांचे हे लेखन वाचत असताना सारखा प्रश्न पडत होता, 'गुलाबराव पारनेरकर' लिहिणारे हेच का ते जगदाळे? त्यांचे गुलाबराव हे विनोदी अंगाने जाणारे खुशखुशीत असे लेखन होते. तर 'परीघ' हे लेखन अगदी विरोधी टोकाचे. गंभीर म्हणावे असे. शोध पत्रकारितेचा आदर्श दाखविणारे. स्वतः पत्रकार आहेत, हा भाग जरी लक्षात ठेवला, तरी लेखनात पत्रकार डोकावणार नाही, याची त्यांनी पुरेपूर काळजी घेतलेली दिसते. नाही म्हणायला सुरुवातीच्या भागात पत्रकारितेचे वातावरण आहे. तिथे कशाप्रकारे बोलले जाते याचा नमुना वाचायला मिळतो. परंतु आपण एक ललितकृती वाचकांच्या हाती देत आहोत, तेव्हा तिच्यातले लालित्य जपले पाहिजे, याचे भान त्यांनी ठेवलेले आहे. प्रसंगांतील नेमकेपणा कायम ठेवून त्यांचे वर्णन केलेले आहे. संवादात वातावरणाला अनुरूप ठरेल अशी चपखल भाषा, मर्मावर अचूक टोक ठेवण्यातले कसब, ही लेखकाची ताकद दाखवते. कथानकासोबत असलेले ग्रामीण वातावरण, त्यातली सुबत्ता, यांची वर्णने लेखकाने सूचकपणे केलेली आहेत. शेतातून पाणी रस्त्यावर वाहत आहे, याचा अर्थ इथे पाणी मुबलक असून सुबत्ता आहे. बेफिकीरपणे जाणारी मोटारसायकल ही तरुण आणि मगरूरपणाची प्रतीक आहे. शेताभोवती ऊसतोडणीसाठी पडलेली पाले, त्यांच्याभोवती असलेला पोलिसांचा पहारा, हे गावच्या राजकारणासोबतच दहशतीचे प्रतीक असल्याचे स्पष्ट होते. लेखकाने या सगळ्याच गोष्टींकडे बारकाईने लक्ष दिलेले आहे. त्यासाठी स्वतः मेहनत घेतल्याची, तयारी केल्याची नोंद त्यांच्या मनोगतात दिलेली आहे. यात विशेष बाब म्हणजे प्रस्तावना. ही प्रस्तावना लिहिली आहे वडगावचे सरपंच, संजय विठ्ठल खेडकर यांनी. ज्या गावाचा उल्लेख लेखनात आलेला आहे, त्याच गावचे हे सरपंच आहेत. हे औचित्य नावीन्यपूर्ण आहेच, शिवाय ते एकमेव असावे असे वाटते. त्यांनीही लेखकाच्या लेखनाचे मनापासून कौतुक केलेले आहे.

उत्कंठावर्धक आणि मनाची पकड घेणारे असे हे पुस्तक आहे. लेखनाला गती आहे. विषयावर पकड आहे. शेवटपर्यंत वाचकाला आपल्याशी खिळवून ठेवण्याची त्यांत ताकद आहे. आणि हेच या लेखनाचे, लेखकाचे यश आहे, असे म्हणावेसे वाटते.

ग्रामीण भागाचे मनाला भावणारे सुपीक वातावरण डोळ्यांना आल्हाददायक असते. त्यात बागडणारे अल्लडपणाचे प्रेम तर विलोभनीय म्हणावे असे. परंतु या प्रेमाला छेद देऊ पाहणारा त्रिकोण नेहमीच जणू परीक्षा पाहण्यासाठीच निर्माण झाला आहे असे वाटते. आणि त्यात असणारी विहीर ही जीवन संपन्न करणारी की जीवन संपवणारी, असाही प्रश्न उपस्थित होतो. यात येणारे गावचे राजकारण वेगळेच. असा सगळा आशय मुखपृष्ठावर सजीवपणे साकारणे अवघडच. परंतु सतीश भावसार यांनी हा सगळा तोल अतिशय उत्तम रीतीने सांभाळलेला आहे. त्यामुळे पुस्तकाचे मुखपृष्ठ पट्कन नजरेत भरते.

**मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**अस्तित्व आणि अगतिक**

'कविताच ... माझी कबर' हा 'ग्रंथाली'ने नुकताच प्रकाशित केलेला काहीसा आडवळणाचे शीर्षक असलेला कवितेचा संग्रह हाती आला. मृत्यू, कबर, विरह, विलाप असे शब्द प्रेमाच्या विफलतेतून जन्माला येतात. गझलेचे सजीवपण ज्या खांबांवर टांगलेले दिसते त्याचे हे शब्द म्हणजे प्राण. त्यामुळे संजय चौधरी यांचा हा संग्रह कवितेचा आहे की गझलचा, असा काहीसा संभ्रम मनात डोकावला. परंतु संग्रह वाचायला सुरूवात केली तेव्हा लक्षात आले, ही गझल नाही, परंतु गझलेच्या कुळात जन्म घेतलेली मुक्त कविता आहे.

माणूस शहराकडे धाव घेतो, त्याला कारण त्या शहाराचे आकर्षण कारणीभूत नसते, कारणीभूत असते ती पोटातली आग. शहरांची सूज ही काही त्याच्या पौष्टिकतेची साक्ष नाही, तर ती आहे अशा आगीने पोळलेल्या माणसांच्या अगतिक आगमनाने ताणली गेलेली शहराच्या अवयवांची लांबीरुंदी. ही एक गुहा आहे. इथे आलेला माणूस पुन्हा परतण्याची ग्वाही सोबत घेऊन येतो, ती ग्वाही त्याला सतत परतीचे दिवे दाखवीत राहते. परंतु ते परतणे होत नाही. माणूस तिथेच चिकटून राहतो. मग हरवते जन्म देणारी माय आणि आयुष्यभर पोसणारी माती. अखंड पोटाची आग विझवण्यासाठी धडपडत राहतो. त्यासाठी अनेक तडजोडी करीत राहतो. स्वतःचे परकेपण मिरवित राहतो. स्वतःचा चेहरा हरवून बसतो. हा हरवलेला चेहरा शोधण्यासाठी पुन्हा धडपडत राहतो. घर इथली मूलभूत गरज. परंतु माणूस दिवसभर घराबाहेर राहतो. खरंतर घरानेच त्याला बेघर केलेले असते. त्यावर कवी म्हणतात, माणसाने घराचे व्यसन लावून घेऊ नये. इथे माणसाचे मूल्य म्हणजे व्यवहारातून बाद झालेल्या राणीच्या रुपयासारखे आहे. आपल्या हयातीच माणूस आऊडेटेड होत जातो. शहरातील माणसांची परवड या कवितांमधून व्यक्त झाली आहे.

माणसे उद्याचा दिवस चांगला असेल या आशेवर जगत राहतात. हे जगणे म्हणजे सावलीला झाड नाही, पायाखाली तापलेली सडक आणि न संपणारी लांबलचक जळती दुपार. आडोसा नाही, झरा नाही, फक्त व्यवहाराने भरलेले मृगजळ असे. स्वतःच्या जगण्याकडे कवी अतिशय तटस्थेने पाहत आहे. हे जगणे म्हणजे लादलेले जगणे आहे. जन्माला घालण्यापूर्वी कुणीही आपली आवड विचारलेली नाही. निवडीचा अधिकारच जणू हिरावून घेतलेला. जगण्यातही प्रत्येक टप्प्यावर केवळ लादणेच सहन करावे लागत आहे. पर्याय नाही अशी जगण्यासाठी सक्ती आणि ती सांभाळताना अगतिकताही. जीवनाच्या कोपऱ्यात शरीराचे मुटकुळे करून आतल्या आत पडून राहतो. हे शरीर म्हणजे एक शववाहिका आहे आणि त्याच्या आत जन्मापासून होऊ घातलेले शव वाहून आणतो आहे. आणि हे एकाकीपण तर इतके टोकाचे की, शेवटी सरणावर स्वतःला ठेवताना त्याला अग्नीही स्वतःलाच द्यावा लागणार असे खात्रीने वाटते. देवाचे असणे वा नसणे हे प्रश्न नेहमीच वादाचे पण याच देवाची माणसाला जशी गरज आहे तशी त्याला देखील माणसाची गरज आहे, हे सत्य लक्षात घेण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे माणसाला माणसाची गरज आहे हे कधी समजून घेणार? मरणानंतरच सुतकी चेहरे करून माणसे भेटायला येणार का? शुद्ध, निरपेक्ष भावनेची माणसे आहेत कुठे? कवीने आपल्यासगळ्यांसमोर हे जगण्याच्या वास्तवाशी जोडलेले प्रश्न ठेवले आहेत. 'स्मशानाकडे जाणारा रस्ता म्हणजे बिन पावलांचा डेड एंड. इथेच तुटते रस्त्याशी पावलांचे अखेरचे नाते.'

असे स्वतःकडे त्रयस्थासारखे पाहणे, स्वतःच्या मनाचा, बुद्धीचा कस पाहणे, स्वतःच्या क्षमता, असमर्थता यांचा शोध घेणे, हे सारे कवी शांतपणे सोलत जातो, एकेक पापुद्रा काढावा तसा. थेट तळाचा ठाव घेतो तसा काळजाचाही थरकाप व्हावा असे सुन्न करणारे चित्र उभे करतो, काळोखातल्या गर्भाचा शोध घेतल्यासारखा.

**कविताच... माझी कबर**
**संजय चौधरी**



कवितांना अनुक्रम देण्याच्या पारंपरिक पद्धतीला इथे छेद दिलेला आहे. सगळ्या कवितांची संख्या जवळपास एकशेदोन इतकी आहे. त्यांची विभागणी बारा आयाममध्ये केलेली आहे. या प्रत्येक आयामाला स्वतंत्र शीर्षक आहे. ते शीर्षक हे त्या आयामाच्या कवितांचा एक गुच्छ घेऊन येतो. या आयामाला रेखाटनांची जोड दिलेली आहे. कवितांना मात्र शीर्षकाऐवजी अनुक्रमांक दिलेले आहेत. सर्वच कविता मुक्तछंदात आहेत. परंतु त्यांच्यात एक वाहता गतीचा प्रवाह आहे. हा प्रवाह वाचकाला त्याच्या तालावर सोबत घेऊन भन्नाट वेगाने पुढे जातो. कधी आड आलेल्या उंच खडकावर आदळतो, लगेच पुढे खोल झेप घेतो. अशा प्रसंगी वाचकाची अवस्था भोवंडून गेलेल्या ओंडक्यासारखी होते. सुटसुटीत असा आशय घेतलेली, रूपक, प्रतीके, अनुप्रासाच्या जाळ्यात फार न अडकात थेट विषयाला आपल्या कवेत घेणारी ही कविता आहे. कुठेही उपमा, उत्प्रेक्षा यांची गल्लत नाही की पुनरावृत्ती नाही. जे सांगायचे ते काळजाला हात घालून, काळजाला हेलावून टाकणारे. वरवर सहजसोपी वाटणारी, परंतु आतला गाभा खोल खोल असलेली ही कविता वेगळेच पाणी घेऊन आलेली आहे. कवीची कवितेकडे पाहण्याची दृष्टी आणि त्याचा पल्ला पाहता, या कवीकडे सांगण्यासारखे खूप आहे. ते त्याचे स्वतःचे आहे. आणि तो हे दालन नक्की स्वतःच्या नावे निश्चित करील असा विश्वास ही कविता देते. जीवनाकडे अंतर्मुख होऊन पाहणारा चिंतनशील असा आश्वासक कवी म्हणून संजय चौधरी या नावाची नोंद आवर्जून घ्यावे लागेल. वसंत आबाजी डहाके यांनी पुस्तकाच्या मलपृष्ठावर या कवितेविषयी आपले निरीक्षण नोंदविलेले अकाहे. त्यांनीही नमूद केले आहे की, 'समकालीन कवितेत स्वतःची अशी वेगळी मुद्रा उमटवणारी ही कविता आहे.' खूप दिवसांनी 'कविताच.... माझी कबर'च्या रूपात आशयसंपन्न अशी चांगली कविता वाचायला मिळाली.

सुभाष अवचट यांचे मुखपृष्ठ आणि रेखाटने कवितेचा आशय अधिक गहिरा करतात.

**मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**दिवस आलापल्लीचे**
**नीलिमा क्षत्रिय**




## रम्य जगण्यातले भावविश्व

'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेले 'दिवस आलापल्लीचे' हे नीलिमा क्षत्रिय यांचे पुस्तक वाचनात आले. वरवर पाहता हे पुस्तक म्हणजे लेखांचा संग्रह, असे त्याचे स्वरूप आहे. परंतु हे अर्धसत्य ठरावे. हे लेख म्हणजे स्वैर लेखांचे पुस्तक नाही. ते आहे लेखिकेच्या बालपणींच्या आठवणींचा फुलोरा. हे लेख त्यांच्या आयुष्याशी जोडलेले आहेत. म्हणजे त्यांच्या चरित्राचा एक लहानसा भाग, असे त्याचे स्वरूप ठरते. कालखंडाच्या भाषेत मोजायचे तर अवघा चार वर्षांचा कालखंड. तोही १९७२ पासून सुरू झालेला. म्हणजे आतापासून पंचेचाळीस वर्षापूर्वीचा. वडिलांच्या बदलीमुळे वास्तव्य करावे लागलेल्या गावातला कालखंड. 'आलापल्ली' गावातला. कुठे आहे हे गाव, तर ते आहे चंद्रपूर जिल्ह्यात. आंध्रपदेशाच्या सीमेपासून काही अंतरावर असलेले. एक निवांत खेडेगाव असावे तसे निसर्गाच्या कुशीत विसावलेले सुंदर गाव!

हे पुस्तक वाचत असताना व्यंकटेश माडगूळकर आणि पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिरेखांचे स्मरण होते. तशा आलापल्लीत अनेक व्यक्तिरेखा आहेत. त्यांची स्वतःची वैशिष्ट्ये आहेत. आलापल्लीत शाळा आहे. या शाळेशी निगडित काही लेख आहेत. या शाळेतील शिक्षकांच्या वागण्याच्या तऱ्हा वेगवेगळ्या. त्यातले उप्पलवार नावाचे सर आहेत. त्यांच्या वागण्यात एक अढी आहे. त्या भागातील गरीब, आदिवासी मुलांविषयी त्यांना कळवळा आहे तर श्रीमंत घरच्या मुलांमुलींविषयी अढी. त्या वागण्याचा त्रास नीलिमाला सुरुवातीपासून सहन करावा लागतो. तसा तिच्यासारख्याच इतर मुलींनाही. शाळा म्हटली की मैत्रिणी येणारच परंतु नीलिमाला मिळालेल्या मैत्रिणी म्हणजे सुफिया, शाहिना आणि परमजीत. फक्त तिघीच. या तिघींसोबतचा मैत्रीच्या गोफ अतिशय घट्ट आणि तितकाच उत्कट आहे. त्यांच्यासोबत त्यांच्या घरची माणसे, त्यांची आर्थिक परिस्थितीही येते. सुफिया घरची गरिबी उघड होऊ नये म्हणून नीलिमाला घरी येण्यापासून अडवू पाहते. तर शाहिनाचे वडील श्रीमंत. ती ऐट शाहिनामध्येही असते. स्वतःच्या इंग्रजीच्या जोरावर ती सरांनाही गप्प करते.

आन्शी ही एक वेगळी व्यक्तिरेखा. 'आन्शे, तुझा नवरा काळा, तू काळी पण देवानं पोरगं मात्र गोरंपान दिलं.' या वाक्याभोवती असलेली तिची कथा विलक्षण आहे. ही नवऱ्याची तिसरी बायको पोर होत नाही म्हणून नवऱ्याने टाकून दिलेली. परंतु गरोदरपणाचा आधार घेत थेट नवऱ्यालाच पायाशी लोळण घ्यायला लावणारी खरी हिंमतवान.

मुथ्थीचा बेरकीपणा वेगळाच. सासू खाष्ट. सतत त्रास देणारी. तिचा सूड म्हणून मुथ्थी अंगात वारं आल्याचे नाटक करी आणि त्यात सासूला टहाळ्याने झोडपून काढी. रामभरोसे हॉटेलच्या शेजारचा हलवाई, गुपचुप त्याची शेव चोरूनही काही न बोलणारा. अम्मा नावाची बाई. कधीकाळी नर्स असलेली. तिच्याविषयी इतकेच माहीत की ती अडल्या नडल्या बायकांची सुटका करते. म्हणजे काय करते ते कळले नाही. फक्त अम्मानेच सांगितले ते एवढेच कळले, 'एखादी बाई अडली की तिला कस्तुरीचा बारीकसा तुकडा नागलीच्या पानातून दिला की तिची लवकर सुटका होते.'

घरात कामाला असलेला दुर्गय्या उर्फ गंगाराम आणि सखू ही नोकरमंडळी आपलेपणाने वागणारी आहेत. कामात चोख. परंतु त्यांची भाषा हा एक गमतीचा प्रकार. 'ळ' ऐवजी 'ड' चा उच्चार अधिक. त्यामुळे अनेकदा गंमती होत. 'वेळ' ऐवजी 'वेड', 'विळी' ऐवजी 'विडी', 'वाळू ' ऐवजी 'वाडू'. पाहुणेमंडळींच्या समोर तर अशा उच्चारांनी धमाल होत असे.

लेखिकेने इतर व्यक्तींविषयी लिहिले तसे आई, बाबा, भाऊ निर्मल यांच्याविषयी देखील त्रयस्थाच्या नजरेतून लिहिले आहे. बाबांची मोटारसायकल चालवण्याची व त्यावरून होणाऱ्या फजितीची गंमत, भुशाच्या खड्ड्यात पडताना झालेली गंमत, यातून दिसणारा त्यांचा स्वभाव. बदलीनिमित्ताने करावी लागणारी बांधबांध, संसाराला लागणाऱ्या गोष्टी आपल्याकडे असल्याच पाहिजे याविषयीचा आईचा आग्रह, इतर नातेवाईकांत वागताना समजून घेण्याची वृत्ती, काटेकोरपणा तसा मोकळेपणा, आईच्या अशा हिकमतींविषयी मोळेपणाने लिहिले आहे.

प्रत्येक गावाला स्वतःची संस्कृती असते. परंपरा असतात. त्यानुसार तेथील लोक वागत असतात. बाहेरून आलेल्या माणसांना याबाबत नेहमीच कुतूहल असते. त्यांच्याशी समरस व्हायला त्यांना वेळ लागतो इतकेच. होळी साजरी करण्यासाठी आईने घेतलेला पुढाकार. दसऱ्यानिमित्ताने पाहायला मिळालेला आत्राम राजाचा राजवाडा आणि त्यावेळचे कार्यक्रम, गावात असलेली दुकाने, कॉलनी, त्यात राहणारे वेगवेगळ्या दर्जाचे लोक, सामान्य माणसांची घरे, त्यांचे राहणीमान, असा एक गाव लेखिकेने या पुस्तकातून उभा केलेला आहे.

परिसराचा संपूर्ण तपशील वाचत असताना आपणच त्यात सोबत फिरत आहोत असा भास होत राहतो.

आपल्या स्वप्नातले म्हणून एक गाव असते, ते कागदावर तितक्याच हळुवारपणे उतरवणे कठीण असते. ज्या वयात ते गाव सोबत असते, त्या वयाचे भान आणि निरागसता जपणे तर त्याहून कठीण असते. परंतु लेखिकेने ती तरलता जपलेली आहे. आलापल्ली हे गाव म्हणजे निसर्गसौंदर्याचे प्रतीक वाटावे असे. हिरवीकंच उंचउंच झाडी, पानाफुलांनी डवरलेली. डोंगर, बारमाही ओढा, वाळू, महाकाय हत्तीपासून सापापर्यंत असंख्य प्राणी, कौलारू घरे, प्रशस्त अंगण आणि फुलपाखरे, मनाला भुरळ घालावी असे सुखद वातावरण. हे सारे शब्दांत पकडण्याचा प्रयत्न लेखिकेने केला. त्याला चित्रकार सतीश भावसार यांनी त्यांच्या कुंचल्यातून तितकाच सुंदर प्रतिसाद दिलेला आहे, हे मुखपृष्ठ पाहून निश्चितपणे म्हणता येते.

**मूल्य २०० रुपये ● सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**कल्चरली करेक्ट**
**संपादन : संदीप सारंग**
**वंदना महाजन**




## नवा जन्म... नवी पहाट

बौद्ध धम्म म्हणजे काय, हा विषय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याचा स्वीकार केला १९५९ मध्ये, तेव्हापासून खऱ्या अर्थाने अधिक चर्चेत आला. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असे मार्गदर्शन करणारे डॉ. आंबेडकर यांनी याच धम्माची दीक्षा का घेतली असावी, यामागचे सूत्र लक्षात घेण्यासारखे आहे. खरेतर त्याचे मूळ 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर केले ते का? या प्रश्नात आहे. याचा अर्थ असा की, आज आपण ज्याला हिंदू-वैदिक धर्म म्हणतो, तो काय आहे? त्याचे सांस्कृतिक, सामाजिक, परंपरा, रूढी, अंधश्रद्धा, यांचे स्वरूप काय आहे? या धर्माला कवटाळणे आणि त्याचे वर्चस्व झुगारून देणे ही अपरिहार्यता आहे की आणखी काही, हे तपासून पाहण्याची गरज आहे, तसेच या धर्माला सोडचिठ्ठी देऊन बौद्ध धम्मात प्रवेश करायचा म्हणजे काय? हा धम्म इतरांहून वेगळा आहे तो कसा, याचाही अनुभव तपासून पाहणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, नीती, विज्ञाननिष्ठा ही मूल्ये जीवनाच्या सर्वंकष उत्थानासाठी आवश्यक असताना त्यांचे माप सगळ्यांच्या पदरात समान पद्धतीने टाकले जात आहे का, हा खरा कळीचा मुद्दा आहे. परंतु इतकेच नाही, धर्मांतर ही चळवळ यशस्वी झाली का? ज्यांनी धर्मांतर केले त्यांचा स्तर या नव्या प्रवाहात कसा आहे? सामाजिक स्तरासोबत मानसिक स्तरात बदल झाला आहे का, असेही प्रश्न उपस्थित होत आहेत. हा विषय माणसाच्या जगण्याशी संबंधित आहे. माणसाचे जीवन केवळ रोजीरोटी पुरते मर्यादित नाही. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, जाती-जमाती, लिंग, अशा अनेक घटकांशी ते निगडित आहे. त्या सर्व प्रश्नांची सोडवणूक झाली आहे का? असा खूप मोठा व्यापक पट नजरेसमोर ठेवून या फलकातील लेखांची आखणी केलेली आहे. लेखातील आशयाची अपेक्षा व्यक्त करतानाच बौद्ध धम्माचा अभ्यास, एक कार्यकर्ता म्हणून घेतलेली भूमिका, अशा विचारवंत महिला लेखिकांकडून हे लेख लिहून घेण्यात आले आहेत.

वैदिक संस्कृतीत असलेले आचार-विचार हे मनुस्मृतीशी चिवट धाग्यांनी आवळलेले आहेत. चार आश्रम, चार वर्ग, उच्चनीचता, लिंगभेद, जातिभेद, विषमतेचा कळस यात हरवलेला माणूस आणि माणुसकी, स्त्रियांविषयीची अत्यंत जुलमी, कठोर भूमिका, त्यांच्या माणूसपणाला गृहीत न धरण्याची वृत्ती, अन्याय, अत्याचार आणि रुढी-परंपराच्या जोखडात भरडली गेली ती महिला आणि समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या जातीय व्यवस्थेतील खालचा वर्ग! याला काही पर्याय आहे की नाही? आहे, तो आहे, 'बौद्ध धम्म'! समानता. स्वातंत्र्य, बंधुता, न्याय अशा पंचसूत्र, अष्टांगांनी माणूसपण बहाल करणारा, माणसाला माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्क देणारा हा धम्म. त्याचा अंगीकार विधिवत दीक्षा घेऊन करता येतो, तसा आचरणातूनही करता येतो. असा अंगीकार केलेल्या महिलांचे अनुभव लेखांद्वारे संकलित करण्यात आलेले आहेत.

या पुस्तकातून व्यक्त झालेले सगळेच विचार हे अनुभवांशी निगडित असूनही ते सगळ्यांना आपलेसे वाटतील असे नाही परंतु ते नाकारता येतील असेही नाहीत हिंदू-वैदिक संस्कृती आणि गौतम बुद्ध यांचा बौद्ध धम्म यांच्यातला फरक, त्यातली सूत्रे, अंगे, व्यवस्था यांचा परिचय, त्यातले अधिक-उणे, हे आत्मपरीक्षण करण्यास नक्कीच प्रेरणा देणारे आहे आणि ही चळचळ कुठपर्यंत आली, तिच्यातून काय साध्य झाले, अजून काय करायला हवे, याचाही अंदाज यातून अभ्यासकांना येईल.

या पुस्तकाचे शीर्षक हे कल्चर – संस्कृतीशी जोडलेले आहे. म्हणजेच सामाजिक स्तरासोबतच एकूण जगण्याच्या पैलूंचाही विचार इथे अपेक्षित आहे. त्यानुसार आलेले हे लेख वैचारिकते बरोबरच जगण्याच्या समृद्ध अनुभवांशी जोडलेले आहेत.

आपली जात, जन्मगाव, शिक्षण, आपले पूर्व आयुष्य, बौद्ध धम्माशी नाते जुळल्यानंतरचे आयुष्य असा हा पट आहे. या पुस्तकाचे संपादकीय दोन भागात असून ते विस्तृत आणि तितकेच आशयघन आहे. त्यावरून संपादन करणारे संदीप सारंग आणि वंदना महाजन यांचा या विषयाकडे पाहण्याचा सर्वंकष दृष्टिकोन आणि त्यावरील हुकूमत लक्षात येते. शेवटी अनेक मान्यवर विचारवंतांची मते दिलेली आहेत, ती या विषयाचे आंतरराष्ट्रीय महत्त्व अधोरेखित करतात.

विशेष म्हणजे या लेखिका उच्च विद्याविभूषित आहेत तशा तळागाळातही कमळाप्रमाणे फुललेल्या, स्वतःचे तेज नजरेत आणून देणाऱ्या रागिणीही आहेत. सामाजिक चळवळ, बदल घडवून आणण्याची मानसिकता असलेल्या, अशा विविध क्षेत्राशी नाते असलेल्या, झोकून देऊन कार्य करणाऱ्या महिला आहेत. त्यांचे स्वतःचे विचार इथे स्पष्टपणे व्यक्त झालेले आहेत. या विचारात प्रगल्भता आणि सम ाजभान आहे. व्यक्त होण्यातला प्रामाणिकपणा आणि स्वतःच्या मतांचा ठामपणा प्रखरपणे या लेखातून जाणवतो. लिहिण्याची प्रत्येकीची धाटणी वेगळी आहे, दिलेले संदर्भ अभ्यासातून जसे आले तसे ते प्रत्यक्ष सहभागातूनही आलेले आहेत. बौद्ध धम्म आणि बुद्धिझम यांच्यावरील विचारांना चालना देणारे अनुभवसंपन्न असे पुस्तक, असे या पुस्तकाचे वर्णन करता येईल.

**मूल्य ३५० रुपये ● सवलतीत २५० रुपये**




# ग्रंथपान

**मनीमानसी**
**संगीता अरबुने**




## आपल्यापलीकडचे काही...

'स्त्री आणि पुरुष यांच्या राहण्यावागण्याचे नियम सुशिक्षित समाजातही समान नाहीत. पुरुषांच्या बाबतीतही अनेक जाचक नियम आहेत. म्हणजे पुरुषाने रडता कामा नये. त्यानं सगळ्या गोष्टी धीराने घेतल्या पाहिजेत. कुठल्याही परिस्थितीत त्यानं आपला संयम सुटू देता कामा नसे. त्याच्या जीवाला पेलवणारं नसलं तरी त्यानं स्त्रीदाक्षिण्य निभावलंच पाहिजे. तो पुरुष आहे, त्याचबरोबरच तो हाडामासाचा माणूस आहे हे ध्यानात घेतलं जात नाही. त्याचं एखादं भित्रेपणाचं, बावळटपणाचं कृत्यदेखील त्याला षंढ ठरवायला पुरेसं असतं. समाजाच्या या धारणेत स्वतःला कोंबून घेताना पुरुषाचा श्वास कोंडत नसेल कशावरून?'

'मनीमानसी' हा संगीता अरबुने यांचा ललित लेखांचा संग्रह नुकताच ग्रंथालीने प्रकाशित केला आहे. 'प्रतिबिंब', 'ओंजळीतलं चांदणं', 'स्वतःला आरपार ओवताना' हे त्यांचे पुरस्कारप्राप्त कविता संग्रह आणि 'चौकट' हा पुरस्कारप्राप्त कथासंग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या या साहित्यातून तसेच अनेक साहित्यिक कार्यक्रमांतून वाचकांना आणि साहित्य-रसिकांना त्यांचा परिचय आहे. जगण्याच्या स्तरावरील प्रत्येक घटकाकडे पाहण्याची नितळ दृष्टी, जे नजरेला दिसते त्याहीपलीकडे असलेले जाणिवांचे तरल भावविश्व, नात्यांमध्ये असलेल्या रेशमी धाग्यांतील नाजूक बंध उलगडून दाखविण्याकडे असलेला कल आणि माणसाला माणूस म्हणून टिपताना त्याच्यातल्या माणूसपणाचा हळुवारपणे वेध घेण्याची वृत्ती, यांचा आपणांस यातून परिचय झालेला आहे. तीच वैशिष्ट्ये प्रस्तुतचा संग्रह वाचताना पदोपदी प्रत्ययास येतात. या संग्रहातील लेख यापूर्वी नियतकालिकांतून प्रकाशित झालेले असूनदेखील त्यांचे ताजेपण कायम आहे. ललित लेखनात जी तरल वृत्ती असावी लागते, वाचकाला आपल्यासोबत घेऊन जाण्याची जी प्रवाही सहजता असावी लागते, तिचा प्रत्यय हे लेख देतात. मुळात हे लेख आणि लेखिका वेगवेगळे आहेत, असे जाणवत नाही. प्रत्यक्ष अनुभवांची शिदोरी जणू वाचकांच्या हाती दिलेली आहे असेच वाटत राहते. बऱ्याचशा लेखांचे निवेदन हे आत्मप्रत्ययी आहे, ज्याला प्रथम पुरुषी म्हणता येईल असे. त्यामुळे नकळत वाचक लेखिकेच्या त्या त्या काळातल्या अनुभवांना चरित्राशी जोडत जातो.

आजीसोबत राहताना आजीचे वर्णन केलेले आहे. आजोबा असताना तिचे जगणे आणि आजोबांच्या नंतरचे तिचे जगणे किती विलक्षण आहे, त्यात वेगवेगळ्या टप्प्यांवर कसे बदल होत गेले, अशिक्षित असूनही तिचे व्यवहार ज्ञान किती चोख होते, याचे वर्णन प्रभावी आहे. स्त्री म्हणून घरातील जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या नादात आपल्या लेखनासाठी वेळ मिळत नाही म्हणून संपूर्ण जबाबदारी मोलकरणीवर सोपविली. परंतु त्यानंतरच्या मोकळेपणाचे जे वर्णन आले आहे ते एका लेखिकेचे राहत नाही, तर तिच्यात असलेल्या आत्मीय गृहिणीचे दिसून येते. अतिथी आणि यजमान यांच्यातल्या नात्याचा उत्साही अनुभवही प्रत्येकाने लक्षात ठेवावा असा आहे. गावात टुरिंग टॉकीजमध्ये सिनेमा पाहताना कशी गंमत येत होती, हा अनुभव एका पिढीतल्या रसिकांच्या ठायी नक्कीच असणार, त्याचे स्मरण या लेखाने पुन्हा होते. चुंबन ही एक माणसाच्या जीवनातील एक उत्कट प्रेरणा. ५ फेब्रुवारी हा त्याचा दिवस. त्याचे औचित्य म्हणून नव्हे तर त्याच्या प्रेरणा, उत्कटता, प्रेमभावना असा सर्वांगीण वेध त्यातून घेताना लेखिका असे म्हणते की 'यात आंतरिक उत्कट ओढ नसेल तर ते चुंबन न राहता बॅक्टेरियांची देवाणघेवाण ठरेल.'

प्रवासादरम्यान हॉटेलात न राहता कुणाकडे राहणे कसे फायदेशीर ठरू शकते. पालकांची मुलांकडून परीक्षेत अधिकाधिक गुण मिळविण्यासाठी वाढलेली भयानक हाव कशी जिवघेणी आहे. गुरूंचे एकमेव स्थान आणि आता प्रत्येक ठिकाणी निर्माण झालेले गुरू, अशा विविध विषयांवर लेखिकेने लिहिले आहे. हे लेख वाचताना एक प्रसन्न असा अनुभव येत राहतो. लेखिकेने लिहिलेले मनोगतही त्यांच्या चिंतनशीलतेचे दर्शन घडवणारे आहे.

या सर्व लेखांमधून प्रकर्षाने जाणवत राहते ती लेखिकेची नितळ दृष्टी. बाह्यरंगासोबतच अंतरंगाचा वेध घेण्याची आंतरिक तळमळ. जे पाहात आहोत, त्याच्या पलीकडेही यापेक्षा वेगळे काही आहे, नाण्याला दुसरी बाजू असते तशी! तिचाही शोध घेण्याची वृत्ती वाचकाला जाणवते. जगणे प्रत्येकाचे वेगळे असते, प्रत्येकाचे आयाम वेगळे असतात. समाजाच्या चौकटीत कुणाचा श्वास कसा गुदमरत असेल, याकडेही त्या तितक्याच आपुलकीने पाहतात. हे लेख वैयक्तिक अनुभवांशी जोडलेले आहेत, तसे व्यक्ती, समाज, सामाजिक धारणा, दैनंदिन जगण्याशी जोडलेले आहेत. प्रत्येकाचा आशय, सूत्र, विचार स्वतंत्र आहेत. तरी या सगळ्याच्या केंद्रस्थानी माणूस आहे. लेखिका स्वतः कवयित्री असल्याने कवितेच्या ओळी येणे अपरिहार्य आहे. परंतु त्या त्यांच्या स्वतःच्या नसून मान्यवर कवींच्या कवितांच्या ओळी आहेत आणि विषयाशी चपखल बसतील अशा आहेत. यातून त्यांचे समृद्ध असे वाचन दिसून येते तसे चिंतनही दिसून येते. 'ग्रंथ हेच गुरू असं आपण वाचत असतो; परंतु आपण नेमकं काय वाचतो यावरही ते अवलंबून असतं.' 'रक्ताची नाती कुठल्याही समूहात फार महत्त्वाची मानली जातात परंतु बऱ्याचदा ती रक्तासारखी पातळ असतात हे मात्र खरे!' ' लिहिणं म्हणजेही एकप्रकारचं चुंबनच, लेखणीने कागदाला दिलेलं...' अशा सुंदर ओळी वाचताना लेखिकेच्या चिंतनाची आणि लेखनातल्या कसदारपणाची ओळख झाल्याशिवाय राहात नाही.

घरात, कुटुंबात, हृदयात, समाजात, प्रत्येक ठिकाणी स्त्रीची ओळख वेगळी आहे, तिचे अस्तित्व वेगळे आहे आणि तिचे जगणे. तिचे रूप प्रत्येक ठिकाणी वेगळे आहे, हे मुखपृष्ठावरील विविध छटांतून दिसून येते. अनिल दाभाडे यांची ही कल्पकता लेखिकेच्या आशयाशी सुसंगत म्हणावी लागेल.

**मूल्य १८० रुपये ● सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथपान

**आरवली ते अरावली**
**प्रकाश अंबुरे**




## ध्येयगर्भ प्रवास

आपण काही केले पाहिजे हे ध्येय मनाशी असेल, ते गाठण्यासाठी आवश्यक असणारी जिद्द मनात असेल आणि त्यासाठी कठोर परीश्रम करण्याची शारीरिक व मानसिक तयारी असेल तर अशक्य नावाची गोष्ट शिल्लक राहात नाही. हा वस्तुपाठ वाचायला मिळतो तो 'आरवली ते अरावली' या पुस्तकातून. उद्योजक प्रकाश अंबुरे यांचे हे आत्म कथन. एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या मुलाचे उद्योजक होण्याचे स्वप्न पूर्ण झाल्याची विलक्षण रंजक कहाणी, अशी या पुस्तकाची ओळख करून देता येईल.

शाळेत असल्यापासूनच आपल्याला व्यवसाय करता आला पाहिजे, या ध्येयाने झपाटलेल्या प्रकाश अंबुरे यांची ही यशोगाथा आहे. नुसता विचार करीत बसण्याऐवजी त्यांनी दिवाळीला आकाश कंदील तयार करून विकले. वटसावित्री पौर्णिमेचे निमित्त साधून आंबे – फणस कोकणातून आणून मुंबईत विकले. यातून आत्मविश्वास वाढीस लागला. परिस्थितीची निकड म्हणून नोकरीला सुरुवात केली. डाका कंपनीत मालक –कामगार –कामगार युनियन हे नाते कळले तसे संघर्षही लक्षात आले. ठाण्यात असताना नोकरीसोबतच स्वतःचे 'अभिजीत वेल्डिंग वर्कशॉप' त्यांनी सुरू केले, तेही मालकाची रीतसर परवानगी घेऊन. पुढे कंपनीने विस्तारासाठी राजस्थानात अजमेर जिल्ह्यात ब्यावर येथे पाऊल ठेवले. तिथे जाण्याची तयारी प्रकाश यांनी ठेवली, तीही कुटुंबाला मागे ठेवून. कंपनीचे हित पाहत असताना आपलेही काही असले पाहिजे, ही अस्वस्थता त्या शांतपणे काम करू देत नव्हती. मालकाच्या इच्छेप्रमाणे अधिक उत्पादन कसे काढता येईल, याचे यशस्वी प्रयोग त्यांनी करून दाखविले. कंपनीच्या अडचणीच्या काळात धैर्याने आणि कौशल्याने साथ दिली. कंपनीत केले जाणारे काम कसे आहे, त्याला अधिक चांगले रूप कसे देता येईल याचे आडाखे सतत मनात असत व त्याप्रमाणे काम केले. त्यातले कौशल्य, साहस आणि चिकाटी याच्या जोरावर स्वतःचा उद्योग सुरू करण्याचे मनावर घेतले. तेही मालकाच्या मंजुरीने. तयार होणारा माल मालकाच्या कंपनीला वाजवी दरात देण्याचे मोठेपणही जोपासले.

स्वतःची 'जे.पी. मिनरल्स' कंपनी सुरू केली. विविध भट्ट्यांसाठी उष्णतारोधक म्हणून क्वार्ट्झ व वाळूचे मिश्रण (रॅमिंग मास) तयार करण्याचे उत्पादन या कंपनीत सुरू झाले. तिला लागणारा दगड व धातूचा कच्चा माल हा खाणीतून येतो म्हणून खाणी विकत घेतल्या. एकापाठोपाठ असे दहा उद्योग सुरू केले. त्यात युगांडा येथेही कंपनी सुरू केली. जगभर त्यांच्या कपंनीकडून पुरवठा सुरू झाला. स्वतःबरोबर मुलेही व्यवसायिक झाली. एक स्वप्न पूर्ण झाले. यात अनेक अडचणी आल्या, तशीच अनेक चांगली माणसे भेटली. त्यातून उभा राहिला तो एक यशस्वी उद्योजक!

प्रकाश अंबुरे यांनी आयुष्यात काही तत्वांना स्वतःशी जोडून घेतलेले आहे. आपल्याला व्यवसाय करता आला पाहिजे आणि करायचाच. पैसा मिळविण्यासाठी परिश्रम करण्याची संपूर्ण तयारी ठेवायची. परिश्रमाचा मोबदला देण्यात कसूर करायचा नाही. पैसा एकदम कधीही दुप्पट वाढवून द्यायची तयारी ठेवायची ती उत्पादन वाढण्यासाठी. परिश्रमाव्यतिरिक्त वा योग्य कारणाशिवाय पैसा द्यायचा नाही. सतत नवीन काहीतरी आपले म्हणून करत राहायचे. उद्योगाची वाढ होण्यासाठी काय काय करता येईल यात तत्परता आणि धडाडी कायम राखायची. आव्हानांचा सामना करायचा. खोटा भ्रष्ट व्यवहाराला थारा नाही.

प्रकाश अंबुरे हे यंत्रांशी, दगड–धातूच्या खाणींशी जोडले गेलेले आहेत तरी त्यांची वृत्ती यंत्रमय वा दगडमय झालेली नाही. तो त्यांच्या व्यवसायाचा भाग आहे. एक यशस्वी उद्योजक म्हणून त्यांनी लौकिक मिळविला तरी ते शेवटी एक माणूस आहेत. एक कुटुंबवत्सल माणूस! पत्नी छाया यांच्याविषयीचे प्रेम सतत त्यांच्या ठायी आहे. त्यांच्या उद्योगामुळे काही काळ तिच्याकडे दुर्लक्ष झाले खरे. परंतु त्याची भरपाई त्यांनी पत्नीच्या आजारपणात केली. पक्षाघाताने त्या आजारी झाल्या तेव्हा त्यातून बाहेर काढण्यासाठी सर्व व्यवहार बाजूला ठेवले. पत्नीची सेवा या एकाच निष्ठेने ते सतत त्यांच्या सोबत राहिले. तीच गोष्ट मुलांच्या बाबतीत. अभिजित आणि अनिकेत यांना उत्तम शिक्षण मिळाले पाहिजे, त्यांना आपल्यासारखेच क्रियाशील होता आले पाहिजे ही दूरदृष्टी त्यांनी सतत बाळगली. त्यामुळे आज हे दोन्ही पुत्र उद्योग जगतात आपला ठसा उमटवत आहेत. वृक्षाची मुळे खोलवर असतील आणि खोड निकोप असेल तर त्याचे डेरेदारपण डोळे दिपवणारे असणारच! प्रकाश अंबुरे केवळ आपल्या कुटुंबाची काळजी घेतात असे नाही, तर आपल्यासोबत काम करणारे कामगार, सहकारी यांचीही काळजी घेतात. त्यांनी स्वतःचा उद्योग सुरू करावा अशी मनिषा बाळगतात, त्यासाठी मदत करतात. आपण ज्या व्यक्तींमुळे पुढे आलो, ज्या व्यवस्थापनाने आपल्याला मदत केली, त्यांचे ऋण मानण्याचा मोठेपणा ते दाखवतात. त्यांच्याविषयी सतत कृतज्ञतेची भावना बाळगतात. त्यांच्याशी एकनिष्ठ राहण्याचा कसोशीने प्रयत्न करतात. यातून त्यांचे माणूस म्हणून मोठेपण दिसून येते. यशस्वी असूनही नम्र, आपुलकी, प्रेम जपणारे, साधेपणाची कास धरलेले असे हे प्रसन्न व्यक्तिमत्त्व!

हे एका उद्योजकाचे आत्मकथन आहे, परंतु त्याचे शब्दांकन केले आहे वैभव वझे यांनी! शब्दांकन करणे ही सुद्धा एक कला आहे. ती वझे यांनी उत्तम साधली आहे. उठावदार व आशयसंपन्न मुखपृष्ठ सजवले आहे सतीश भावसार यांनी. वाचकांकरता प्रेरणादायी ठरेल असे हे पुस्तक आहे.

**मूल्य २०० रुपये ● सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## क्रौर्य जिथे ओशाळते...

कंबोडिया हा लहानसा परंतु शांतताप्रिय देश. तो अगोदर फ्रेंच वसाहतीच्या अंमलात सापडला. आणि पुढे त्याची अक्षरशः धूळधाण झाली. अमेरिकेने व्हिएतनामला नामशेष करण्यासाठी युद्ध छेडले, व्हिएतनाममधील कम्युनिस्ट कंबोडियात आश्रयाला पळाले, हा कंबोडियाचा दोष ठरला. अमेरिकेने या दोन्ही देशांवर केलेल्या आक्रमणाचा तपशील देण्यासाठी लेखकाने 'रिट्रास्पेक्ट द ट्रॅजेडी अँड लेसन्स ऑफ व्हिएतनाम' या पुस्तकाचा संदर्भ दिलेला आहे. या पुस्तकाचा लेखक मॅक्नामारा अमेरिकेचा संरक्षण सचिव म्हणून काम पाहणारा असल्याने सत्यतेबाबत शंका असण्याचे कारण नाही. हे युद्ध अमेरिका हरलेली आहे हे मान्य केले तरी तिने केलेला विध्वंस हा किती पराकोटीचा होता, त्यासाठी उपयोगात आणलेली युद्धसामग्री आणि सैनिकी बळ यांची आकडेवारी पाहिली की डोळे विस्फारल्याशिवाय राहत नाहीत. यात झालेले नुकसान आणि मनुष्यहानी कधीही भरून निघणारी नाही.

कंबोडियाचा वनवास या युद्धानंतरही संपलेला नाही, हे या देशाचे मोठे दुर्भाग्य म्हणावे लागेल. 'पोल पॉट'च्या खमेर रूज संघटनेने अमेरिकाचा कडवा विरोध केला म्हणून लोकांचा त्याला पाठिंबा होता. परंतु तोच त्यांचा कर्दनकाळ ठरला. एप्रिल १९७५ मध्ये राजसत्ता आणि लोकसत्ता उलथवून पोल पॉटने राजधानी नाम्हपेनचा कबजा घेतला आणि शून्य वर्षाला सुरुवात केली. कंबोडिया म्हणजे काम्पुचिया. पृथ्वीतलावर अवतरलेला नवा देश. पूर्वीचे सारे पुसून टाकायचे, हे त्याचे धोरण. त्याची एकूण कारकीर्द ठरली ती तीन वर्षे नऊ महिने. परंतु या काळात त्याचे वागणे ठरले ते हिटलर, स्टॅलिन, माओला मागे टाकणारे, भस्मासुराला शोभणारे. 'सलोथ सार' हे त्याचे मूळ नाव. शिक्षणाबद्दल त्याला विलक्षण तिटकारा होता. त्याचे तत्त्वज्ञान एकच, शेतकरी हा देशाचा खरा आधार आहे. राजघराणी, शिक्षित, व्यवसायिक हे शेतकऱ्यांचे शोषित आहेत. या शोषितांना नष्ट करायचे. टक्केवारीच्या भाषेत हे शोषित नव्वद टक्के होते. या देशाची लोकसंख्या सत्तर लाख होती. त्यांच्या संहाराच्या काळात मारले गेलेल्यांची संख्या वीस लाख आहे. यात ऐंशी टक्के शिक्षक आणि पंच्याण्णव टक्के डॉक्टर व शिक्षित समाजाचा समावेश आहे. तो आणखी सत्तेवर राहिला असता तर ही संख्या पन्नास लाखवर सहज पोहोचली असती, परंतु १९७९ मध्ये व्हिएतनामने लष्करी कारवाई करून त्याची सत्ता उलथून टाकली आणि उरलेले लोक सुदैवी ठरले.

कुमार नवाथे हे यशस्वी व्यावसायिक आहेत तसे उत्तम अभ्यासक आहेत. या निमित्ताने आजपर्यंत जगातल्या तीस देशांना भेटी दिलेल्या आहेत. हिटलरप्रमाणेच क्रूरतेची परमसीमा गाठलेल्या पोल पॉटच्या किलिंग फिल्डची पाहणी करण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष कंबोडियाला भेट दिली. तिथली सर्व स्थळे, स्मारके, संग्रहालये, पाहिली. फाशी देण्याची, डोक्यावर प्रहार करून मारण्याची, तुरुंगात छळ करण्याची ठिकाणे पाहिली. त्यावर आधारित हे पुस्तक लिहिले, 'कंबोडिया सौहार्दाकडून संहाराकडे' नावातूनच त्यांना काय सांगायचे आहे ते स्पष्ट होते. त्यासाठी पुरेसा अभ्यास केलेला आहे, हेही यातून दिसून येते. पोल पॉटच्या भस्मासुरी कारवाया कशातऱ्हेने पार पडल्या यांच्या विषयी माहिती देताना त्या देशाच्या इतिहासाची ओळखही ते करून देतात. सौहार्दात असलेला देश आणि संहाराने थरकाप झालेला देश, अशा दोन उंच कड्यांच्या दरीत असलेला हा देश कुमार नवाथे या पुस्तकातून वाचकांच्या समोर ठेवतात.

'माणूस हा माणूस का राहत नाही, तो क्रूर का होतो? माणसाचे माणूसपण का हरवते? एवढे धर्म, एवढ्या देवदेवता, एवढ्या पूजाअर्चा, यज्ञयाग सारे–सारे चालूच राहते, पण माणसातल्या 'माणूस'पणाशिवाय?' हा लेखकाचा प्रश्न आहे.

कंबोडियाच्या नरसंहाराची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर कुठल्याही माणसाची बुद्धी कुंठित होईल. पाहिलेले अनुभव चित्रित करताना लेखणी गोठून जाईल. परंतु कुमार नवाथे यांनी हे आव्हान समर्थपणे पेललेले आहे. अर्थात ही माहिती घेत असताना आणि पाहणी करताना त्यांची मानसिक अवस्था कशी होत असायची याचेही ते वर्णन करायला विसरत नाहीत. १९८० सालीच त्यांना हा देश पाहायचा होता. तो काळ तर संहाराच्या रणगांड्यांखाली आक्रोश करीत असलेला कातरकाळ होता. त्यामुळे त्यावेळी तिकडे जाता आले नाही. परंतु सुरू असलेल्या संहाराविषयीची अस्वस्थता त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. या विषयावर उपलब्ध होणाऱ्या साहित्याचा शोध घेतला, त्याचा अभ्यास केला, चित्रपट पाहिले. यातून मानसिक तयारी झाली; नाही, आता हा देश पाहिलाच पाहिजे. त्या एका अतिउत्कट जिज्ञासेतून त्यांनी या देशाच्या प्रवासाला प्रस्थान ठेवले. जे पाहिले त्याची नोंद त्यांनी अतिशय संयतपणे केली. एखादा वाटाड्या पुढेपुढे सोबत घेऊन जात राहतो तसे वाचकाला ते आपल्यासोबत घेऊन जातात. लेखनात केवळ वर्णन नाही तर त्यामागचा गूढार्थ शोधणारे चिंतन आहे. त्यामुळे लेखनाचा दर्जा प्रवासवर्णनात्मक न राहता त्याला ऐतिहासिक संदर्भमूल्याचा ऐवज असे स्वरूप प्राप्त झाले आहे. पुस्तक छोटेखानी असूनही त्याचा प्रभाव कधीही पुसून टाकता येणार नाही, असा आहे. जिज्ञासू, अभ्यासक यांना कंबोडिया नावाचा देश पाहण्याची उत्सुकता यातून निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही, परंतु त्याचवेळी अभ्यासासाठी मार्गदर्शक म्हणून हे पुस्तक सोबत ठेवण्याला देखील पर्याय असणार नाही.

सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ केवळ आशयनिष्ठच नाहीतर चित्रकाराच्या कल्पकतेचा कस पाहणारे आहे. त्यावरून हा क्रौर्य अनुभवलेला देश एका दृष्टिक्षेपात येतो. पाहिलेला काळ सूर्यालाही लाजवणारा होता आणि उद्याचा सूर्योदय या देशाचा असेल असे यातून सूचित केले आहे.

**कंबोडिया**
**सौहार्दाकडून संहाराकडे**
**कुमार नवाथे**




**मूल्य १०० रुपये   सवलतीत ६० रुपये**

## ग्रंथपान

**जीवन चाळ**
**शुभांगी चेतन**




### आरस्पानी निरागसता

चाळ ही वस्तीच अशी आहे की, तिथे वास्तव्याला असणारी माणसे एका कुटुंबासारखी असतात. परंतु त्यांचे प्रत्येकाचे वैशिष्ट्ये त्याने जपलेले असते, ती वैशिष्ट्ये वागणे, बोलणे, राहणे, व्यवहार करणे, संबंध राखणे, वेशभूषा, पेहराव, शारीरिक ठेवण, शरीराला लाभलेला वर्ण, अशा अनेक पैलूंशी जोडलेली असतात. पु.ल. देशपांडे यांचे 'बटाट्याची चाळ', श्री.ना. पेंडसे यांचे नाटक 'संभूसाची चाळ' आणि दूरदर्शनवर चंदू पारखी आणि उषा नाडकर्णी यांच्या अभिनयाने गाजवलेली मालिका 'चाळ नावाची वाचाळ वस्ती' यांची आठवण 'चाळ' या शब्दाशी जोडलेली पट्कन आठवते. त्या आठवणींच्या रांगेत आणखी एक तसेच चाळीवरील पुस्तक म्हणजे लेखिका शुभांगी चेतन यांचे 'जीवन चाळ'.

शुभांगी या स्वतः उत्तम चित्रकार आहेत. २०१६ साली त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन बजाज आर्ट गॅलरी, मुंबईत झाले. मुलांसाठीच्या कला, हस्तकला उपक्रमात त्यांचा सहभाग असतो. लोकसत्ताच्या रविवार पुरवणीसाठी त्यांनी लेखन केलेले आहे. 'ऋतुरंग', 'अक्षर', 'करुणा', 'मिळून साऱ्याजणी' यासारख्या दर्जेदार नियतकालिकांतून त्यांचे लेखन प्रकाशित झालेले आहे. प्रस्तुतचे 'जीवन चाळ' हे देखील २०१७ च्या 'ऋतुरंग'च्या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेले लेखन आहे.

आपले बालपण हा प्रत्येकाचा कायमस्वरुपी असलेला एक नैसर्गिक ठेवा. चिरंतन सोबत करणारा. कुठल्याही चरित्रकाराला त्याच्या बालपणाच्या या दिवसांना, व्यक्तींना, परिसराला टाळून पुढे जाता येत नाही. त्याच्या यशपशाच्या कळसाचा पाया या दिवसांनी घट्ट धरून ठेवलेला असतो. फरक इतकाच असतो, की पाहणारा त्याकडे कोणत्या नजरेने पाहतो.

या लेखांची लक्ष्मणरेषा आहे ती चाळीभोवती. नावाप्रमाणे जीवन चाळ. लागून असलेले मैदान, बाजूला मारूतीचे मंदिर, जवळच आपटा, पिंपळ, गुलमोहर, जांभूळ ही झाडे. बैठ्या चाळीत असलेल्या व्यक्ती, त्यांचे त्यांच्या घरापुरते असलेले संबंध, इतरांशी असलेले संबंध हे महिलांपुरते. या सगळ्यांकडे पाहणारी पिंकी! मैदानात सागरगोटे, लगोरी, लपंडाव, असे खेळ खेळणारी, शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे आपले समजून पाहणारी, तर रिकाम्या खोलीत राहायला येणाऱ्यांकडे कुतूहलाने पाहणारी. या पाहण्यात तिच्या वयाची नजर आहे. समज त्याच वयाची आहे. मंदिराचा परिसर स्वच्छ केल्यानंतर कसा दिसायचा, 'न्हाऊ घालून तीट-पावडर केलेल्या बाळासारखा.' 'मंदिराजवळच्या झाडावरच्या फळांचा वास', 'हनुमान जयंतीच्या दिवशी सजलेला हनुमान इतर दिवशी मात्र रागावलाय की काय असं वाटायचं. तर मंदिराला दिलेला रंग त्याला विचारून दिला नाही म्हणून त्याचे डोळे वटारलेले असतील.' असे हे अंतर्मुख करायला लावणारे वर्णन लेखिका सहजपणे करून जाते.

समोरचा पिंपळ, पानगळ झालेला, नव्याने फुलून आलेला. त्याची विविध रूपे टिपलेली आहेत. 'वाऱ्याने सळसळणारी पाने खूप काही बोलायची. पालवीच्या दिवसात तो खूप देखणा दिसायचा, तर पानगळ झाली की तो अबोल व्हायचा. त्याचा आनंद, दुःख त्याच्या पानांच्या सळसळण्यातून व्यक्त करतो की काय असं वाटायचं.' बंद असणारे कुलूप उघडले गेले. त्याच्याकडे पाहून मनात विचार आले, 'त्या कुलपाला किती छान वाटलं असेल! त्याचं अवघडलेलं अंग त्याने मोकळं केलं असणार आणि मग उगीचच ते माझ्याकडे पाहून हसतंय.'

चाळीत राहणारी कुटुंबे वेगवेगळ्या प्रदेशातून आलेली, वेगवेगळी भाषा असलेली. ग्वाल्हेरचे झा कुटुंब, साबुदाण्याच्या फेण्या करायच्या साच्यासारखे. वेगवेगळ्या चकत्यांप्रमाणे असलेले. त्यातली प्रेमळ मोठी आई ही मोठी चकती, मध्यम चकती हे चाचा आणि धाकटी चकती म्हणजे त्यांचा बिट्टू. अशी ही त्यांची वर्गवारी. दुसऱ्या खोलीत राहणारे शाली मावशीचे कुटुंब. शाली स्वच्छतेची आवड असलेली तरी भांडखोर स्वभावाची. त्याउलट तिचा नवरा. त्यांच्याविषयी लेखिका लिहिते, 'मामा परकोटीचे शांत. त्यांना खूपच्या खूप गदागदा हलवलं तर दोन-तीन शब्द बाहेर पडतील.' इथे असलेली बहुतेक पुरुषमंडळी अशीच शांत, अबोल, प्रेमळ, फारशी न मिसळधारी. त्याउलट महिलावर्ग. त्यांच्या वागण्याच्या, बोलण्याच्या तऱ्हा वेगवेगळ्या. परंतु त्यांच्यात असलेले प्रेम आपुलकी दाखवणारे. यात मधून रिकाम्या घरात येणारे, काही काळ राहून पुन्हा घर सोडणारे भाडेकरूही अपवाद नाहीत. हेल काढून बोलणारी कारवारची सुगरण मामी. तिच्या बोलण्यात केवळ कानडी हेलच नव्हता, तर तिथला माड आणि समुद्र यांची भव्यताही होती. मनाने ती उदार होती, हे लेखिकेचे निरीक्षण. बंगाली बुंबाची सुंदर आई, पंजाबचा सळसळता उत्साह असलेली पम्मी, झणझणीत च्याबी आंटी, सनीची आई, अतिप्रेमळ गागाजी, मुरंब्यासारखे वीरूदादा, नेहमी सांबर आणि भात खाऊनही काळा कुळकुळीत असलेला मद्रासी अण्णा, कुणाशी एक शब्द न बोलणारा तरी सतत भीती वाटावी असा निळ्या डोळ्यांचा जॉन, बांगडीवाला चाचा, मासळीवाली मावशी, फकीरचाचा, अशा अनेक व्यक्तिरेखा या पुस्तकात आपल्या भेटीला येतात. त्यांच्यासोबत लहान मुले आणि खेळकरी सवंगडी यांच्याविषयी देखील वर्णन आहे. पम्मीच्या कुटुंबाविषयी त्या लिहितात, 'पम्मी, ते उंच काका आणि रानो हा त्रिकोण म्हणजे ज्याची कोणतीच बाजू आणि कोणताच कोन ह्यांच्यात साम्य नव्हतं.' विषमभूज त्रिकोण!

लेखिकेतला चित्रकार इथे पावलोपावली जाणवत राहतो. रंगावर जशी हुकुमत आहे तशी शब्दांवरही आहे, हे मान्यच करावे लागते. त्यामुळे हे रंगचित्र नसले तरी रंगाने व्यापलेले असे शब्दचित्र आहे. इतके बारीक बारीक तपशील त्यांनी रंगवले आहेत की, आपण प्रत्यक्ष त्या चाळीत उभे आहोत.

चाळीचे प्रातिनिधिक चित्र मुखपृष्ठावर रंगवलेले आहे. तशाच आशयाशी संबंधित व्यक्ती, झाडे, मारुती यांची रेखाचित्रे आत रेखाटलेली आहेत. ही सजावट स्वतः लेखिकेने स्मितकबीरसोबत केलेली आहे. यातून ही जीवन चाळ सजीव झालेली आहे.

**मूल्य १०० रुपये   सवलतीत ६० रुपये**




# ग्रंथपान

**सल शिक्षणाचा**
**सूर्यकांत कुलकर्णी**




## सुशिक्षित की ज्ञानी?

सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून शासन अनेक योजना आखत आहे. तरीही समाज शिक्षणाच्या नावाने ओरड करीत आहे की शिक्षणात काही राम राहिलेला नाही. शिक्षण कुचकामी आहे, वगैरे वगैरे. शिक्षण घेऊनही मनासारखी नोकरी मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थी आणि त्यांचे पालक वेगळ्याच चिंतेत आहेत. हे सारे चित्र 'शिक्षण' या शब्दाभोवती फेर धरून आहे. यातून प्रश्न निर्माण होतो, सद्याचे शिक्षण म्हणजे नेमके काय? त्याचा अर्थ, मूल्य, योग्यता, उपयुक्तता काय? पोटाला अन्न मिळवून देऊ शकेल किंवा उपजीविकेचे साधन म्हणून उपयोगी पडेल, ते म्हणजे शिक्षण का? आहे हेच उत्तम आहे की कुचकामी? त्यात बदल हवा का? बदल करायचा झाला तर तो कुठे आणि कसा करायचा? या क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या सोबत असलेल्या सर्व घटकांची यात काही जबाबदारी आहे का आणि ती समर्थपणे पेलण्यास ते निपुण आहेत का? हे आणि असे असंख्य प्रश्न आहेत, ज्यांच्याविषयी तळमळीने बोलणारा वर्ग समाजात मोठा आहे परंतु बोलणे आणि सोडून देणे ही वरवरची तळमळ झाली. तळमळ हवी ती शब्दांत आणि कृतीत तर तिला खरा अर्थ प्राप्त होतो. हा खरा अर्थ खोलवर विचाराद्वारे समजावून सांगितला आहे सूर्यकांत कुलकर्णी यांनी, 'सल शिक्षणाचा' या पुस्तकाच्या माध्यमातून!

'सल शिक्षणाचा' हे 'शिक्षण' या विषयावर अतिशय गंभीरपणे आणि तितकेच तर्कशुद्ध पद्धतीने विचारांची मांडणी करणारे पुस्तक आहे. त्याचप्रमाणे ते केवळ विचारांच्या पातळीवर राहिलेले आहे, असे नाही; त्याला अनुभवांची जोड आहे, प्रयोगांच्या सिद्धतेची जोड आहे. लेखक स्वतः या प्रक्रियेचा एक भाग आहेत, कार्यकर्ता म्हणून, राज्य व केंद्र शासनाच्या विविध समित्यांवरील तज्ज्ञ सल्लागार म्हणून. 'सर्वांत आधी शिक्षण' या फोरमच्या संस्थापकांपैकी ते एक आहेत. शंभर संस्थांना सोबत घेऊन 'युनिसेफ', 'सेव्ह दि चिल्ड्रेन', 'क्राय' यांच्या सहभागाने 'बाल हक्क अभियाना'ची स्थापना त्यांनी केली आहे. 'फाय फाउंडेशन'सारख्या मानाच्या पुरस्काराने त्यांच्या कार्याचा सन्मान केलेला आहे. त्यांच्या चिंतनातून, विचारांतून, अनुभवांतून सिद्ध झालेले पुस्तक म्हणजे 'सल शिक्षणाचा'.

या पुस्तकाची सुरुवात होते ती 'शिक्षण म्हणजे काय?' आणि 'शिक्षण कशासाठी?' या मूळ प्रश्नांपासून. पूर्वीच्या काळी गुरुगृही, आश्रमात शिक्षण होत असे. त्यात विविध विद्यांचा, कलांचा समावेश होता. पुढे ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली तेव्हापासून शिक्षणपर्व सुरू झाले. आज एक मेडिकल सोडले तर काहीही शिका आणि काहीही करा अशी अव्यवहारिक शिक्षणपद्धती भारतात आहे. म्हणजे काहीही शिका आणि नोकरीची वाट पाहा, अशी शिक्षणपद्धती झाली आहे. मूळात शिक्षणाचा हेतू हा व्यक्तीला ज्ञानसंपन्न बनवणे, तिचे कौशल्य विकसित करणे हा असायला हवा. माणसाला शरीरश्रम आणि बुद्धिमत्ता वापरून मानाने जगता येईल असे शिक्षण हवे. कृतिशीलता हे शिक्षणाचे अंग हवे. शिक्षणातून स्वावलंबन यायला हवे. हे शिक्षण त्याच्या आवडीनुसार, कुवतीनुसार असायला हवे. त्याला ज्या क्षेत्रात गती असेल त्यानुसार असायला हवे. हे ठरवताना ग्रामीण आणि शहरी यातली तफावत लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

शिक्षण व्यवस्थेत सर्वांत संवेदशील व महत्त्वाचा भाग म्हणजे शिक्षक. त्यांच्यावर विद्यार्थ्यांचे भवितव्य अवलंबून असते. राज्यात सहा लाख शिक्षक आहेत. डी.एड., बी.एड. अशी शैक्षणिक पात्रता त्यांच्याकडे आहे म्हणून ते दर्जेदार शिक्षक आहेत असे मानणे बरोबर नाही. सोबतच उच्च दर्जाची अभिरुची, ज्ञान, कौशल्य, शिक्षक होण्याची तीव्र इच्छा, हे ज्याच्याकडे आहे तो दर्जेदार शिक्षक ठरतो. शिक्षक वर्गात शिकवतात म्हणजे काय करतात, हा प्रश्न विचार करायला लावणारा आहे. तसेच शासनाने विहित केलेल्या सेट, नेट इत्यादी परीक्षा उत्तीर्ण न होणारे शिक्षक स्वतः किती क्षमतेचे आहेत तेही लक्षात घ्यायला हवे. मग असे शिक्षक खाजगी, विना अनुदानित शाळांत दाखल होतात. त्यातले बरेचसे स्वतः संस्थेला पैसा देऊन पाच सहा हजारात राबत राहतात. यांच्या ज्ञानदानाविषयी प्रश्नचिन्ह उभे राहते. राज्यात अड्डसष्ट हजार शाळांची पाहणी केली असता समोर आलेले चित्र नक्कीच विदारक आहे. त्याला कारण शिक्षक आणि संस्थाचालक हे देखील तितकेच कारणीभूत आहेत. 'शाळांसमोरील आव्हाने' या प्रकरणात या बाबींचा तपशील आहे. यात महत्त्वाचा मुद्दा आहे तो असा, शिक्षकांची सुद्धा दर तीन वर्षांनी परीक्षा घ्यावी. पास झालेतर पुढे नोकरीत ठेवावे. त्यांचे ग्रेडिंग करावे. त्याप्रमाणे पगार द्यावेत.

शाळेत येणाऱ्या मुलांचे प्रश्न आहेत, तसे न येणाऱ्या मुलांचेही प्रश्न आहेत. 'सर्वांना शिक्षण' हा अभियानातला हेतू सफल होतो का, याची तपासणी केली असता त्यातून वेगळेच प्रश्न उपस्थित झालेले दिसून येतात.

शिक्षक, परीक्षा पद्धत, शाळा, शाळांचे व्यवस्थापन, विद्यार्थी, शासन, समाज अशा सर्व घटकांना समोर ठेवून या पुस्तकाची मांडणी झालेली आहे. लेखन मुद्देसूद असून अभ्यासपूर्ण अशा तपशिलांची जोड दिलेली आहे. प्रत्येक विषय स्वतंत्र घेऊन मांडणी केल्याने पुनरावृत्ती झालेली नाही. एक दमदार असा प्रवाहीपणा आशयाला लाभलेला आहे. मूलभूत विचारांपर्यंत जाताना केवळ उणेच दाखवायचे असे नाही, तर अधिकची बाजू कोणती, याचाही विचार या पुस्तकात केलेला आहे. यात कुणावर टिका करण्याचा हेतू नाही, हे लेखकाने मनोगतात आधीच स्पष्ट केलेले आहे. या क्षेत्रात जी पडझड सुरू आहे, तिची कारणमीमांसा त्यांनी स्पष्टपणे उघड केली आहे. शासनापासून ते शैक्षणिक संस्था चालक, शिक्षक, विद्यार्थी आणि त्यांचे पालक, या सगळ्यांना आत्मपरीक्षण करण्यास ती उपयुक्त ठरेल. अंतर्मुख होऊन कुणी यात अपेक्षित बदल घडवून आणण्यास प्रवृत्त झाले, तर ते या पुस्तकाचे यश असेल, असे म्हणता येईल.

**मूल्य १८० रुपये   सवलतीत १०० रुपये**




# ग्रंथपान

## झुंड

**संजय कळमकर**




## चौथ्या स्तंभाच्या विटा

''उपजीविकेपुरतं माणूस कुठंही कमावतो लेका. परंतु पत्रकारांनी खूप श्रीमंत असावं असं मला वाटत नाही. समाजात सर्वात असूनही त्यानं नसल्यासारखं राहावं. या अलिप्ततेतूनच तो समाजाकडे नीटपणे पाहून वृत्ती-प्रवृत्तीवर निर्धोक प्रहार करू शकतो. वेड्यासारखे सारेच भौतिक सुखाच्या मागे धावत असताना निदान त्यानं तरी या बाबींपासून फटकून राहावं. शेवटी पत्रकारिता हे व्रत आहे. त्यापुढं आर्थिक, भौतिक बाबी तुच्छच समजायला हव्यात. प्रत्येक नीतिमान पत्रकार माझ्या-मते अदृश्य समाजसेवक असतो. आता आपल्यातीलच काहींनी लाज सोडून पत्रकारितेच्या भांडवलावर दिसेल ते ओरबाडायला सुरुवात केली तर त्या लेकीच्यांना काय म्हणावं! स्वतःचं घर भरण्यासाठी ते समाज विस्कटून टाकतात. अशांनी सारं क्षेत्रच बरबटून बदनाम करून टाकलंय.''

वरील परिच्छेदावरून लक्षात यायला हरकत नाही की पत्रकारिता हा या कादंबरीचा आत्मा आहे. पत्रकार दिनकर या क्षेत्रात पदार्पण करतो ती जगण्याची एक अपरिहार्यता म्हणून. ग्रामीण भागातून आलेल्या या दिनकरला पत्रकारिता आणि शहर दोन्ही ही नवीन असतात परंतु त्याचा मित्र रधू त्याला या कामात मदत करतो. आणि तो या क्षेत्रात स्थिर होत जातो. या प्रवासात त्याला जे अनुभव येतात, त्यांची वर्णने येथे आली आहेत. पत्रकारिता म्हणजे केवळ सत्य आणि नीतीच्या गोष्टी नव्हेत, तर त्या पत्रकाराच्या आयुष्याशी खेळणाऱ्या शक्तीही आहेत, याचा साक्षात्कार दिनकरला होतो. तीन तलाव व चार रस्ते हरवल्याचे प्रकरण, चारशे कोटी बुडवणारी सहकारी बँक प्रकरण, पैसे घेऊन मेडिकलच्या पदव्या विकणाऱ्या कातकेचे प्रकरण, टँकरचे प्रकरण, देवस्थानावर नियुक्त केलेल्या अध्यक्षबाईंचे प्रकरण, अशा अनेक प्रकरणांचा छडा लावून ती उजेडात आणण्याचे काम पत्रकारांनी केलेले आहे. याविषयीच्या बातम्या तयार करणे हे शोध पत्रकारितेच्या सदरात मोडणारे काम आहे. यासाठी पत्रकारांना कधी सहज तर कधी जिवावर उदार व्हावे लागते. केवळ प्रकरण उकरून काढून भागत नाही, त्याला पुराव्यांची आवश्यकता असते. पुराव्याअभावी अशी प्रकरणे छापण्यास संपादक राजी होत नाहीत. संपादक हा वाचक आणि मालक यांच्यातला दुवा असतो. बातमीतले सार कितीही लोकोपयोगी असू दे, मालकाचा दृष्टिकोन, त्याची बांधीलकी, ध्येयधोरणे, राजकारण, यांची काळजी अगोदर घ्यावी लागते. अन्यथा होणाऱ्या गंभीर परिणामाना सामोरे जाण्याला पर्याय राहात नाही.

पत्रकारिता आणि राजकारणाचा परस्परांशी असलेला संबंध कधी रेशमी तर कधी सुताच्या धाग्यासारखा असतो. कधी गोड तर कधी कटू. तरीही हातात हात घालून चालणारे. दोघेही एकमेकांचा वापर करून घेताना दिसतात. त्याबाबत लेखकाने केलेली वर्णने कुठल्याही काळातल्या पत्रकारितेला लागू होणारी आहेत. यासाठी बाह्य तपशीलांची आवश्यकता असते, तसा अंतर्गत नात्यांचा आणि परस्पर विरोधांचा फार बारकाईने अभ्यास असावा लागतो. तो पुस्तकातून जाणवतो. प्रत्यक्षात लेखक हे स्वतः पत्रकार असावेत इतक्या सराईतपणे परिपूर्ण अशी माहिती इथे दिलेली आहे. ती मुळातच वाचण्यासारखी आहे.

सूर्योदय वृत्तपत्राचे संपादक मुधोळकर हे आपले काम चोखपणे कसे पार पाडावे, पत्रकारांनी काय-काय पथ्ये पाळावीत, याची जाणीव असलेले, जुन्या पिढीतील नावाजलेल्या संपादकांच्या मांदियाळीत त्यांचा समावेश होऊ शकेल. ते कुठल्या प्रलोभनाने विचलित होत नाहीत की कुणाच्या मागे उगाच धावत जात नाहीत. वाणी हा पत्रकार तसाच. आपल्या इमानाशी कायम चिकटून असलेला. परिस्थितीने हतबल होत तो वाऱ्यावर फेकला जातो पण आपल्या ईमानाला वाऱ्यावर सोडत नाही. माने, दासू मात्र याला अपवाद आहेत. पत्रकारितेच्या जोरावर सगळी सुखे त्यांच्यासाठी हात जोडून उभी आहेत. नीतिअनीती या गोष्टी न पाळणाऱ्या पत्रकारांचे ते प्रतिनिधी ठरतात. शेंडे, राजन, रहीम, असे इतरही पत्रकार आहेत. त्यांचे स्वभाव, वागण्याची पद्धत, आपसातले संबंध, हे सगळे पत्रकारांच्या भूमिकेतून इथे वाचकांच्या भेटीला येतात.

पत्रकार वृत्तपत्रासाठी काम करीत असताना तो समूह त्याच्या पाठीशी पाठबळ देण्यासाठी कायम ताठपणे उभा असतोच असे नाही. अशावेळी पत्रकार एकटा पडतो. वृत्तपत्राचा जीव वृत्ताशी जोडलेला असला तरी तो जाहिरातींच्या सलाईनवर अवलंबून असतो, हे विसरता येत नाही. त्यामुळे जाहिरातींना प्राधान्य पहिले! त्यासाठी पत्रकारांना वेठीला धरले जाते. नेत्यांच्या बातम्या देतानाच त्यांच्याकडून जाहिराती मिळविण्यासाठी पत्रकारांना नाकदुऱ्या काढाव्या लागतात. हे सगळे अनुभव दिनकर घेत या जगतात पत्रकार म्हणून वावरत राहतो. कधी अडचणीत येतो, कधी उद्विग्न होतो. इतरांच्या अनुभवांनी व्यथित होतो. काही तत्त्वे त्याला चुकीची वाटतात. कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता स्वतःच्या तत्त्वांना प्राधान्य देतो. आजूबाजूचे जग उघड्या नजरेने पाहतो. त्याच्या जगण्याला एक दुखरी किनार आहे. कुटुंबाच्या व्यथेने अस्वस्थ आहे. ती अस्वस्थता या कथानकाला व्यापून टाकणारी आहे.

अरुण सांधूच्या 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन'ची आठवण करून देणारी ही एक दमदार कादंबरी आहे.

मुखपृष्ठावर धनंजय गोवर्धने यांनी झुंडीच्या मानसशास्त्राची प्रतिमा रंगवलेली आहे. झुंडीत सत्ता असते, अधिकार असतात, बळ असते. त्यांच्या जोरावर काहीही करणे अशक्य नसते. अणकुचीदार भलीमोठी शिंगे आणि अंगी असलेला मस्तवालपणा, पाहताच याची खात्री पटावी. उठावदार आणि आशयसंपन्न असे हे मुखपृष्ठ आहे.

**मूल्य ४०० रुपये   सवलतीत २५० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**गुंजारव**
**एका स्वयंसेवकाचा**
**डॉ. शरद (भाई) कुळकर्णी**




**साधकाचे गुंजन**

आत्मचरित्र, आत्मकथा, आत्मकथन, आत्मनिवेदन, अशा नामावलीत मुख्य व्यक्तिरेखा ही तिच्या जीवन प्रवासाबाबत, केलेल्या कार्याबाबत, कर्तृत्त्वाबाबत वाचकासमोर एक पट उलगडत जाते. यात त्या काळाच्या पावलांच्या खुणा असतात, अवतीभवती होणारे बदल असतात, त्या अर्थाने तो त्या काळाचा एक दस्तऐवज असतो. हा दस्तऐवज व्यक्ती कोणत्या क्षेत्रातली आहे, तिचे वास्तव्य कुठे आणि कोणत्या स्तरावरचे आहे, यावरही हा पट अवलंबूल असतो. यातून घडणारे दर्शन व्यापक स्वरूपाचे असते कधी स्वतःच्या परिघातले असते. त्याला विचारांची, वैश्विकतेची जोड दिलेली असेल तर, त्याचा पट तसाच वैश्विक होतो, अन्यथा त्याचे खुजेपण अधोरेखित होते. या अर्थाने पाहता एक वैश्विक विचार आणि अनुभव असलेले कथन समोर आले आहे, त्याचे नाव आहे 'गुंजारव एका स्वयंसेवकाचा' आणि त्याचे लेखक आहेत डॉ. शरद (भाई ) कुळकर्णी.

डॉ. कुळकर्णी त्यांच्या मनोगतात लिहितात, भारताला स्वातंत्र्य मिळाले, त्याला कारण एकटे गांधीजींची अहिंसक चळवळ आहे का? हजारो क्रांतिकारक, नौदलाचा उठाव, सर्वोदयी तत्त्वज्ञान, अंत्योदय, या सगळ्यांचे योगदान व्यर्थ समजायचे का? डॉ. कुरियन, बाबा आमटे, इलाबेन भट, अण्णा हजारे, नानाजी देशमुख, जयंत नारळीकर, मराठी विज्ञान परिषद, साराभाई सेंटर, यांचे योगदान अमान्य करणार का? असा बृहत विचार मनोगतात ज्यांनी लिहिलेला आहे, त्यांची वैचारिक पातळी ही किती वेगळी आहे, हे वेगळे सांगायला नको.

डॉ. कुळकर्णी हे उच्च शिक्षित आहेत. हे शिक्षण सहजासहजी मिळालेले नाही. त्यासाठी त्यांचे अथक प्रयत्न आणि स्वतःवरील दृढ विश्वास कारणीभूत आहेत. तसा त्यांचा जीवन प्रवास प्रेरक ठरावा असा दीर्घ स्वरूपाचा आहे. रत्नागिरीतील कोळोशी या गावापासून त्यांचा प्रवास सुरू होतो. पालघर, मुंबई येथे काही काळ स्थिरावतो. परिस्थितीशी झुंज देत स्वतःच्या अस्तित्वाला आकार देतो. स्वतः बुद्धी चातुर्याने, अंगमेहनतीने, संघाच्या संस्काराने, झोकून देण्याची वृत्ती, ध्यास आणि प्रज्ञा यांच्या जोरावर आपले स्थान अढळ करतो. अमेरिकेसारख्या अनेक देशांशी नाते जोडतो. शिक्षण हा एक विषय सांख्यिकी, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र यांच्या माध्यमातून सर्वदूर पोचवतो. व्यवस्थापनात शिक्षण, संघटन कौशल्य, यात स्वतःची शिक्षण पद्धती विकसित करून क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा करतो. शाळा, कॉलज, विश्वविद्यालय, कंपन्या, बँका, विमा यासारख्या संस्था त्यांच्याकडे सल्ल्याच्या स्वरूपात मदत घेतात. इतकेच नाहीतर आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेतला जातो. एनसीइआरटी, एससीइआरटी, इटीएस, आयएपीएल, एनआयबीएम, आयएमएफ, या सारख्या अनेक संस्था आहेत. येथे शिक्षण पद्धत, संशोधन पद्धत, ट्रेनिंग सिस्टीम, इंटेजिलंट कोशंट आणि इमोशनल कोशंट, इंडस्ट्रीयल रिलेशन, प्रकल्प, यांना विकसित करीत विविध पातळ्यांवर काम तर केलेलंच आहे, परंतु स्वतःच्या पद्धतीही निर्माण केल्या, स्वतःच्या कार्याच्या ठसा उमटविला. इतर विद्वानां–प्रमाणे परदेशाला आपले ज्ञान अर्पण करण्याची वृत्ती त्यांनी झिडकारली. स्वतःच्या देशाच्या ओढीने परत आले. भारतात करण्यासारखे अनेक उपक्रम आहेत, भेडसावणाऱ्या काही समस्या आहेत, त्यांच्यासाठी आपण काम केले पाहिजे, ही भूमिका कायम मनात होती. तिला न्याय देण्याचे कार्य त्यांनी केले. पाणी प्रश्न, वृद्धाश्रम, शिक्षण, समाजसेवा याकडे एका कार्यकर्त्याच्या नजरेने पाहिले. त्यात झोकून दिले. आपल्या ज्ञानाचा, क्षमतेचा पूर्ण वापर केला. मुळात कुळकर्णी हे शिस्तीतले कार्यकर्ते. देशसेवा हा पिंड. प्रसंगी शिक्षण सोडले. तुरुंगवास भोगला. माणसे पाहिली, जगाचा अभ्यास केला. जगभर शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान देत राहिले. तरीही त्यात कुठे गर्वाची फुशारकी नाही. एक नम्रतेचा भाव त्यांच्याकडे आहे. ज्यांनी–ज्यांनी मदत केली, सहकार्य केले त्यांच्या विषयीची कृतज्ञेची भावना मनात सतत ठेवली. मनाने मोठा, तितकाच मोकळा, व्यासंगाचा प्रचंड आवाका असलेल्या व्यक्तीचा हा अनुभवाचा खजिना या पुस्तकातून वाचकांच्या हाती सुपूर्द झालेला आहे. स्वतःच्या निर्णयक्षमतेला पूर्णपणाने आणि विश्वासाने उपयोगात आणले तर माणूस उच्च दर्जाची प्रतिथयश अशी कामगिरी उत्तमपणे पार पाडू शकतो, याचे उदाहरण म्हणजे डॉ. कुळकर्णी.

मधु मंगेश कर्णिक यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. ते लिहितात, 'कुळकर्णी यांना आधुनिक जगाच्या इतिहासाचे चांगले भान आहे. जागतिक पातळीवरील विविध विचारधारांमुळे घडून आलेले सामजिक–राजकीय बदल, परिवर्तन याचा त्यांनी अभ्यास केलेला आहे. ते भारतीय इतिहासावर, संस्कृतीवर आणि एकात्मेवर भाष्य करतात. ऋग्वेदातील 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामयाः' हे वचन त्यांना आठवते आणि 'अंतिमतः विश्वकल्याणासाठी महात्माजींचा सर्वोदयाचा किंवा पंडित दीनदयालाजींचा अंत्योदय विचार हा त्यांना महत्त्वाचा वाटतो.'

डॉ. कुळकर्णी स्वतःला एक स्वयंसेवक म्हणवून घेतात. ते तर सत्यच आहे. परंतु तेवढेच पुरेसे नाही. स्वयंसेवकाला काही मर्यादा असतात. त्याच्यावर नियंत्रण ठेवणारी आणखी वेगळी यंत्रणा पाठीशी उभी असते. इथे आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात घडणारे तसे प्रसंग आहेत. परंतु पुढे ते स्वतःच एक संस्था होतात. एकेक प्रकल्पातून नवीन नवीन काही घडवत जातात, जे सगळ्यांनाच दिशा देण्यास उपयुक्त ठरते. तरी ते स्वतःच्या आत्मकथेविषयी लिहितात, 'नव्वदी ओलांडलेल्या एका आंधळ्या म्हाताऱ्याची ही रडकथा नाही किंवा एका अति ज्येष्ठाची ही गर्वकथाही नाही. हे आहे एका यात्रिकाचे स्पंदन, एका साधकाचे गुंजन.'

आशयाला सूचक न्याय देणारे मुखपृष्ठ प्रगती गोलतकर यांनी साकारले आहे.

**मूल्य २०० रुपये   सवलतीत १२० रुपये**




# ग्रंथपान

**भाषाविचार**
**डॉ. दीपक पवार**




**भाषेचा समग्र विचार**

भाषा हा विषय चर्चेला आला तो इंग्रजीशी संपर्क आल्यापासून, म्हणजे इंग्रजांनी आपल्या देशावर वसाहतवाद सुरू केल्यापासून. मातृभाषेविषयी कळकळ असणाऱ्या मंडळींनी या भाषेचा होणारा परिणाम हा केवळ इंग्रजांच्या कारभारापुरता राहणार नाही, तो मराठी भाषेच्या मुळावर घाव घालणारा ठरणार आहे, याचा अंदाज तेव्हाच वर्तविला होता. परंतु अशी कळकळ असणारी माणसे बोटावर मोजण्याइतकीच असल्याने तो आवाज क्षीण ठरला असे नाही, वणवा पेटवण्यासाठी ठिणगी पुरेशी ठरते. परंतु आपली मानसिक गुलामी इतकी सुस्त आणि तितकीच प्रभावी आहे की, तिला पेटवण्यासाठी ज्वालाग्राही अग्निबाण निष्प्रभ ठरतील. तसेच झाले. जे कळकळीने प्रतिपादन करीत होते, त्यांची शक्ती ही कुठल्याही अग्निबाणापेक्षा अधिक होती, परंतु त्यांचा परिणाम शून्य ठरला. आज त्याचे कडवट परिणाम उजळपणे आपले अस्तित्व दाखवीत आहेत. मग त्याविषयीच्या कंठरवांना ऊत आला तो अलीकडच्या काळात, बैल गमावल्यानंतर ट्रॅक्टरच्या नावाने बोटे मोडण्यासारखा.

मराठीच्या चळवळीचे एक कार्यकर्ते, देशभराच्या भाषिक चळवळीशी जोडून घेतलेले अभ्यासक आणि संशोधक कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे. मराठी अभ्यास केंद्राचे ते अध्यक्ष आहेत. 'कॅम्पेन फॉर लँग्वेज इक्वालिटी अ‍ॅण्ड राईटस्'चे संस्थापक सदस्य आहेत. त्यांनी पूर्ण केलेल्या संशोधनाचे नाव आहे, 'जागतिकीकरणानंतरचं महाराष्ट्रातलं भाषेचं राजकारण'. 'मराठी भाषेची अश्वेतपत्रिका –(ना)मराठीचा विकास, (ना) महाराष्ट्राचा', 'शिक्षणाचे मराठी माध्यम – अनुभव आणि अस्वस्थ वर्तमान' (सहसंपादन), 'पोस्ट ग्लोबलायझेशन पॉलिटिक्स ऑफ लँग्वेज इन महाराष्ट्र' ही त्यांची ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर आहे. 'ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशन'तर्फे भारत आणि पाकिस्तानातील भाषिक चळवळीच्या तुलनात्मक अभ्यासासाठी आणि पुराच्या दस्तवेजीकरण प्रकल्पासाठी त्यांना पाठ्यवृत्ती प्राप्त झालेली आहे. याशिवाय महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती, समकालीन महाराष्ट्र, भाषाधोरण, भाषेचे राजकारण या विषयांवर त्यांनी विविध वर्तमानपत्रांमधून स्तंभलेखन केलेले आहे. प्रस्तुत 'भाषाविचार' हे पुस्तक याच परंपरेतील आहे.

भाषाशास्त्रज्ञ अशोक केळकर यांनी भाषेची उत्पत्ती, समकालीन व्यवहार आणि भविष्यलक्ष्यी नियोजन याविषयी जे विचार मांडलेले आहेत, त्यांचा मागोवा लेखकाने येथे घेतलेला आहे. म. गांधींनी मातृभाषेतून भाषणांचा आग्रह धरला होता. शिक्षणही मातृभाषेतून हवे, याचा आग्रह धरला होता. इंग्रजी भाषेतून शिक्षण घेण्याचे दुष्परिणाम सांगताना ते सांगतात, 'इंग्रजी भाषेतून शिक्षण घेतलेल्या मुलांतून रवींद्रनाथ टागोर, सुभाषचद्र बोस, राममोहन रॉय निर्माण होणार नाहीत.' ज्ञानपीठ विजेते वि. वा. शिरवाडकर तर मराठीचा सर्वच स्तरावर आग्रह धरतात. स्वतःच्या भाषेचा अभिमान असणे वेगळे आणि दुसऱ्या भाषेतून शिक्षण घेणे वेगळे, हे दुटप्पी धोरण झाले. असे होण्याचे कारण काय? कुठलीही भाषा ही नुसती ज्ञानाची असून उपयोगाची नाही, ती पोटाची व्हायला हवी. अशा प्रश्नांचा उहापोह लेखकाने केला आहे.

कुठलाही विषय हा प्रश्न मांडून करून सुटत नाही. त्यासाठी उत्तरे देखील शोधावी लागतात. डॉ. दीपक पवार यांनी त्या दृष्टीने विचार समोर मांडलेले आहेत. ''सगळा समाज स्वभाषाशून्य अवस्थेत पडून राहतो. यातून बाहेर पडायचं तर सर्व भारतीय भाषांची विधायक ताकद एकत्र करून आपापल्या भाषेच्या जतन–संवर्धनासाठी एल्गार केला पाहिजे. इंग्रजीचं कचकड्याचं साम्राज मोडून पडायला वेळ लागणार नाही. सर्व राज्यांनी स्वतःचं ग्रंथनिर्मिती मंडळ सुरू केलं पाहिजे. सर्व विद्यापीठांना प्रादेशिक आणि इंग्रजी या भाषांतील शिक्षण अनिवार्य केलं पाहिजे. तर इंग्रजीतून उच्चशिक्षण घेणाऱ्यांना प्रादेशिक भाषा टाळून उच्च शिक्षण घेता येणार नाही, अशी व्यवस्था केली पाहिजे.''

संशोधकाची वृत्ती असलेल्या लेखकाकडून जे लिहिले जाते, त्यात केवळ विचारांची वावटळ असत नाही, त्यात असतो तो मूलगामी विचाराचा गाभा. त्या विचाराला अधिष्टान असते ते संदर्भांचे. संदर्भ हे तात्कालिक नाहीत तर सर्वांगीण असतात. काळाचा, व्यक्तींचा, संस्कृतीचा, मानसिकतेचा अभ्यास, अशा विविध टप्प्यांचा वेध त्यातून घेतलेला असतो. त्या सर्वांगीण अभ्यासाचे दाखले डॉ. दीपक पवार यांनी प्रस्तुत पुस्तकात दिलेले आहेत. त्यामुळे व्यक्त झालेले विचार हे भाषेशी नाळ जुळलेल्या कुठल्याही व्यक्तीला अंतर्मुख करतील असे आहेत. परंतु ज्यांना भाषेविषयी काही न्यूनगंड असेल, तर त्यांना त्यापासून मुक्त करण्याची क्षमता या लेखांमध्ये आहे. लेखन अभ्यास आणि संशोधनावर आधारित असल्याने यात आलेली भाषा संशोधकाची असणे स्वाभाविक आहे, आणि ती तशी असणेच योग्य. परंतु ती पाठ्यपुस्तकीय नाही. विषय मुळात मेंदूला आणि सहनशीलतेला आव्हान देणारा आहे. 'एखाद्या समाजात भाषेचे वाईट दिवस येण्याची खूण म्हणजे सुशिक्षित आणि पुढारलेला वर्ग जेत्यांच्या भाषेच्या कक्षेत शिरतो.' 'आपल्याकडे भाषांची हेळसांड होणं म्हणजे पर्यायाने इतिहास आणि संस्कृतीची हेळसांड होणं, हे लक्षातच येत नाही.' 'इंग्रजीच्या महामारीत प्रादेशिक भाषांना अपमृत्यू येत असताना सर्व गोष्टींबद्दल शून्यवादी होणं आणि पराभव स्वीकारणं हा एक मार्ग आहे किंवा प्रतीकात्मक बदलांनी पायवाट तयार करत करत त्याचा हमरस्ता होण्याची वाट पाहणं हा दुसरा मार्ग आहे. माझ्यासारख्या अभ्यासक कार्यकर्त्याला दुसरा मार्ग गरजेचा आणि महत्त्वाचा वाटतो.' ही त्यांची विधाने महत्त्वाची आहेत. भाषिक आत्मीयता असणाऱ्या प्रत्येकाने वाचावे असे हे पुस्तक आहे. त्यातून भाषिक चळवळीत सहभागी होण्याची प्रेरणा जागृत झाली तर उत्तमच!

मराठी भाषेची पाळेमुळे खोलवर रूजलेली आहेत. मार्गात आलेल्या आक्रमणांना, सामील झालेल्यांना आपल्या कवेत घेत ती पुढे विस्तरत गेली आहेत. वटवृक्ष डौलाने उभा आहे. परंतु आता आपण त्याच पाळामुळांची सोईस्करपणे छाटणी करीत मुळावरच घाव घालीत आहोत. प्रदीप म्हापसेकर यांची ही मुखपृष्ठाची कल्पकता अप्रतिम!

**मूल्य १८० रुपये   सवलतीत १०० रुपये**




# ग्रंथपान

**अतस्त**
**मधुवंती सप्रे**




## रेषेच्या आतबाहेर

आपल्या भोवतीचे जग आपण किती सजगतेने पाहतो, त्यात माणूस नावाच्या घटकाकडे किती डोळसपणे पाहतो, रूढी परंपरा यांचा अन्वयार्थ किती उलगडून पाहतो, आणि या सगळ्यांचा परिणाम आपल्यावर काही होतो की, चालायचंच असं म्हणून सोडून देतो? जगण्यात असलेला विरोधाभास आणि आखून घेतलेल्या चौकटी यांच्या सीमारेषा पुसून टाकायच्या की त्यांच्यातच दडपून जगायचे, याचाही विचार कधी आपल्याला अस्वस्थ करतो की, त्याचेच वारसदार म्हणून बुजुर्ग काळाची झूल अंगभर पांघरून आपण वावरत राहणार? सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या व्यवस्थेत ज्यांचा बळी जातो आहे, त्यांच्याविषयीची आपली भूमिका आपण कधी तपासून पाहणार आहोत? जे कुणी या विरोधात विवेकबुद्धीने उभे राहण्याचा प्रयत्न करतील त्यांना पाठबळ द्यायचे की, त्यांना बंडखोर म्हणून हिणवायचे? जगणे शहरी असो की ग्रामीण, जगणे हे जगणेच असते. या जगण्याकडे संवेदनशील लेखक त्याच्या नजरेने पाहतो तेव्हा तो नक्कीच अस्वस्थ होतो. त्याच्या लेखनाला आपोआप धार येते ती याच अस्वस्थेतून. त्यातून जी निर्मिती होते ती वाचकाला अंतर्मुख करणारी ठरते. अशीच अंतर्मुख करणारी साहित्यकृती घेऊन आल्या आहेत मधुवंती सप्रे, 'अंतस्त' या कथासंग्रहाच्या रूपात. या कथांना ललित कथा असे त्यांनी नाव दिलेले आहे.

मधुवंती सप्रे यांच्या नावावर कथा, कादंबरी, कविता, चरित्र, ललित, अशी विपुल साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. 'अक्षरगंध' या दिवाळीअंकाच्या संपादक आणि प्रकाशक म्हणूनही त्यांचा आपणांस परिचय आहेच. काही वेगळेपण जोपासाण्याचा, शोधण्याचा, हा त्यांच्या लेखनाचा गुण आहे. त्यांच्या या गुणाची प्रचिती देणारा 'अंतस्त' हा नवा कथासंग्रह आहे, असे हमखास म्हणता येते.

या कथासंग्रहात एकूण आठ कथा आहेत. त्यांच्याविषयी मनोगतात लेखिकेने स्पष्ट केलेले आहे, 'या पुस्तकातल्या आठ कथांमधल्या सगळ्या स्त्रिया मला प्रत्यक्ष भेटलेल्या आहेत. नवनिर्मितीच्या क्षणी त्यात मी माझी भर घातली अहे. लहानपणापासून पाहिलेल्या, भेटलेल्या स्त्रियांनी मला अस्वस्थ केले. गोठ्यातल्या गाई, म्हशींनाही याहून सन्मानाची वागणूक मिळे. पण घरात जन्माला आलेल्या मुली, दुसऱ्या घरातून घरी आलेल्या सुना, यांचा माणूस म्हणून कुणी विचार करीत नसे. गाय, म्हैस, बैल चरायला गेले कुणाच्या बागेत, शेतात घुसले आणि त्यांना ग्रामपंचायतीने कोंडवाड्यात कोंडले, तर शेतकरी लगेच पैसे किंवा धान्य भरून सोडवून आणीत असे. परंतु मुलीचा सासरी छळ होत होत असेल तर तिला कोणी सोडवीत नसे.'

'ती' या कथेतील वेणू हुषार असून तिला डॉक्टर व्हायचे आहे. परंतु तिच्या अपेक्षेप्रमाणे काहीच घडत नाही. याला कारण परंपरावादी भूमिका, 'पोरींना शिकून काय करायचंय! लग्न होऊन जाणार आणि शाळेचा खर्च कोण करणार?' यातून वेणूची परवड होते. वेणू कथेच्या शेवटी भेटते तेव्हा ती वेगळ्या वळणावर उभी असते. या कथेचा पट मोठा असल्याने फ्लॅशबॅक पद्धतीने लिहिलेली आहे. 'मुलगी' या कथेत मफतलालच्या घरातील स्त्रिया श्रीमंतीत आहेत, पण त्यांना स्वातंत्र्य नाही. घराबाहेरचे जग त्यांच्यासाठी नाही. या उलट घरकाम करायला येणाऱ्या गरिबाघरच्या रेणुका आणि महानंदा या कामाला वाघ आहेत. शिक्षण न घेताही त्या मजुरी करून पैसे आणतात. मग शिक्षण कशाला हवे? अशी दोन टोकांना एकत्र जोडणारी ही कथा आहे. 'सुनीती' या कथेतील सुनीती बॅरिस्टर, कलासक्त, बुद्धिमान, आहे. स्वतःच्या पायांवर ठामपणे उभी आहे. परंतु नवऱ्याने वेगळा संसार मांडला आणि सगळेच बदलले. वैभव असूनही अनाथ झाली. 'मैत्री' या कथेत फ्रान्सचा दौरा आणि भेटलेल्या ख्रिस्तीन, अलबेख्त, इझाबेला, मैत्रिणींच्या विषयी लिहिले आहे. देश बदलला तरी स्त्रीच्या जगण्यातले दुवे सारखेच आहेत. 'कुठे आहोत आम्ही' या कथेत सुशिक्षित वीराची रूढी परंपरामुळे झालेली तगमग दाखवलेली आहे. 'जो जे वांछील' या कथेत 'हेमंती' लग्न या विधीची नव्याने मांडणी करताना दिसते. नचिकेत तिला साथ देतो. ही कथा लग्नाकडे नव्या दृष्टीने पाहण्याच्या पर्यायावर आणून उभी करते. 'शोभेच्या कुंड्या' या कथेत गंगुताई आपला परंपरावादी दृष्टिकोन कायम ठेवण्यावर भर देतात.

या कथा आत्मनिवदेन स्वरूपात आलेल्या आहेत. त्या वाचकांसोबत संवाद साधतात. कथेतील प्रत्येक व्यक्तिरेखा वेगळी आहे परंतु ती लेखिकेशी जोडलेली आहे, असे वाटत राहते. परिणामी सहवेदनेचा स्पर्श तर आहेच, परंतु असेही वाटत राहते, या कथा नसून लेखिकेच्या चरित्राचे काही अंश आहेत. इतकी एकरूपता या कथांना लाभलेली आहे. असे असले तरी लेखकाकडे एक जो तटस्थपणा असावा लागतो, प्रत्येक व्यक्तिरेखेचे वेगळेपण दाखवण्याची अंगभूत कल्पकता असावी लागते. आपल्याला जे मांडायचे आहे, त्यातली सुस्पष्टता अधोरेखित करण्याची किमया साधलेली असेल तर कथेची उंची अधिक उंच होते. या सगळ्यांचा प्रत्यय या कथा वाचताना येत राहतो. लेखनातला सहजपणा, कथेच्या शेवटाकडे जाईपर्यंतची उत्सुकता, विचारांतील स्पष्टता, नेमकेपणा, यामुळे या कथा शेवटपर्यंत खिळवून ठेवतात. काही वेगळे वाचले, याचा आनंद देतात.

बहरात आलेली पानेफुले कधी अचानक फांदींचा हात सोडून देतात तर काही अकाली आपला रंग हरवून बसतात, त्याचे कारण त्याच्या खोडाच्या आत असलेला परंपरेने ग्रासलेला पोकळपणा. आशयाच्या अंतरंगाशी नाते सांगणारे मुखपृष्ठ प्रज्ञा हरणखेडकर यांनी सजवलेले आहे.

**मूल्य १८० रुपये सवलतीत १०० रुपये**




# ग्रंथपान

**गर्जे मराठी**

**आनंद गानू, सुनीता गानू**




**अवकाश ज्यांनी मुठीत घेतले**

'गर्जे मराठी' हे सुनीता गानू आणि आनंद गानू यांनी लिहिलेले पुस्तक. पुस्तक नव्हे चांगला भलामोठा जाडजूड असा ग्रंथच म्हणायाला हवा, असा हा दस्तऐवज आहे. हा ग्रंथ साकारण्याचे काम म्हणजे शिवधनुष्य उचलण्याचा प्रकार म्हणावा लागेल, इतका त्याचा आवाका मोठा आहे. 'सिद्धहस्त लेखक आणि संशोधनाची आवड व चिकाटी असलेल्या प्रज्ञावंताचेच हे काम असू शकते आणि हा ग्रंथ वाचून झाल्यानंतर त्यातल्या माहितीने जसे थक्क व्हायला होते, तशी लेखकांच्या उद्यमशील प्रज्ञेचाही आवाका पाहून मती थक्क होते. दोघेही आपापल्या क्षेत्रात बहुआयामी लौकिक प्राप्त केलेले. लेखनाची धाटणी सुलभ, सोपी, अनलंकृत असून त्या–त्या व्यक्तिरेखांच्या विचारांना, मतांना कुठे बाधा येणार नाही, याची दक्षता घेतलेली आहे. मुळात हा ग्रंथ लिहिला गेला आहे तो इंग्रजीतून. या ग्रंथाच्या अनुवादाचे श्रेय मेधा आलकारी व जी. बी. देशमुख यांच्याकडे जाते.

या ग्रंथाला व्यासंगी प्रस्तावना लाभली आहे ती डॉ. रघुनाथ माशेलकर यांची. ही प्रस्तावना म्हणजे गानू दाम्पत्याच्या कर्तबगारीला शाबासकीच म्हणायला हवी. याची मांडणी सुद्धा लक्ष वेधून घेणारी आहे.

या ग्रंथात एकूण तेहतीस असामान्य कर्तृत्ववान अनिवासी मराठी सरस्वती पूजकांच्या यशस्वी जीवनगाथा रेखाटलेल्या आहेत. हे सरस्वतीपूजक मराठी मुलखातील आहेत आणि जगाच्या कानाकोपऱ्यात आपल्या कर्तबगारीची पताका डौलाने फडकवत आहेत. लेखकांनी त्यांची वर्गवारी केली आहे ती अशी, ज्ञानोपासना, अर्थककारण, उद्यमशीलता, औषध आणि वैद्यकीय संशोधन, अध्यात्म, तंत्रज्ञान, नाटक आणि संगीत, आणि चीन, मॉरिशस, इस्राएल मधील मराठी समाज. यातली सगळी मंडळी ही शैक्षणिकदृष्ट्या गुणवत्ता, गुणवंत, प्रज्ञावंत, अशा अत्युच्च बिरुदावलीने सन्मानित आहेत. ती सर्जनशील आहेत, चिकाटी, ध्येय, निष्ठा या सूत्रांनी बांधलेली आहेत. आपापल्या क्षेत्रात सर्वोच्चस्थानी विराजमान झालेली आहेत. तरीही विनयशील, जमिनीवर पाय रोवलेली आहेत.

डॉ. विजय जोशी हे 'ऑर्डर ऑफ आस्ट्रेलिया' या सर्वोच्च गौरवाने सन्मानित आहेत. लोखंडाच्या खनिजापासून पोलाद निर्मितीच्या प्रक्रियेत जोड उत्पादन म्हणून निघालेल्या टाकाऊ मळीचा उपयोग वाहतुकीचे रस्ते आणि विमानांच्या धावपट्टी बांधण्यासाठी होऊ शकतो, या नावीन्यपूर्ण कल्पक प्रयोगाचे जनक.

अंतरिक्षयानाच्या नॉनडिस्ट्रक्टिव्ह टेस्टिंग–विषयीच्या समस्या सोडविणारे डॉ. अजय कोष्टी हे अभिमान वाटावा अशा प्रतिष्ठित नासाम ध्ये एक जबाबदार इंजिनीअर आणि विषयतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या संशोधनासाठी अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केलेले आहे.

नील आर्मस्ट्रांग, चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा मानव, यांच्या मार्गदर्शनाखाली एरोस्पेस इंजिनीअरिंग या विषयात स्नातकोत्तर आणि पीएचडी पदव्या प्राप्त करण्याचे भाग्य ज्याना लाभले, बोईंग ७३७,७४७,७५७ आणि ७६७ ह्या प्रकारच्या विमानांकरिता एअरप्लेन मॅथ मॉडेल तयार करण्यासाठी आवश्यक उड्डाण चाचण्यांच्या माहितीचे विश्लेषण करण्याचे तंत्र विकसित करणारे, आतापर्यंत विमानांच्या व्यवहारातून ३०० अब्ज डॉलर किंमतीच्या विक्रीचे श्रेय ज्यांच्या नावावर आहे, ते आहेत डॉ. दिनेश केसकर. आज ते बोईंग इंटरनॅशनलचे वरिष्ठ उपाध्यक्ष पदावर विराजमान आहेत. व्यक्तिगत संबंध, भरवसा आणि ग्राहकाला तुमच्या सेवेतून मिळत असलेले समाधान, या सूत्रांवर अढळ श्रद्धा असलेले, 'दिवस असो की रात्र, तुम्ही मला साद घाला, मी तडक उठून तुमच्या समस्येचे निवारण करीन' हा विश्वास दिल्याने विक्री व्यवहारात यशस्वी ठरलेले डॉ. केसकर निष्ठा, प्राामाणिकपणा आणि विश्वास या गुणांचा आदर्श समोर ठेवतात.

डॉ. सदानंद जोशी हे ओळखले जातात ते तेल उत्पादनातील वाढीसाठी आडव्या विहिरीचे तंत्रज्ञान विकसित करणारे आणि त्यासाठी गणितीय समीकरण मांडणाऱ्या 'जोशी इक्वेशन' शोधाचे जनक. 'जोशी टेक्नॉलॉजीस इंटरनॅशनल' या तेलकंपनीचे संस्थापक. ४५००० सदस्य असलेल्या पेट्रोलियम इंजिनीअर्स सोसायटीचे वैशिष्ट्येपूर्ण लेक्चरर आहेत. डॉ. मिनोती आपटे यांनी स्वादुपिंडाच्या कर्करोगावर उपचारासाठीचे मोठे संशोधन केले आहे. त्यांच्या या कार्यासाठी त्यांना 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया मेडल'ने सन्मानित करण्यात आलेले आहे. जगभरात या विषयाला हात घालणाऱ्या त्या पहिल्या संशोधक आहेत. डॉ. समीर मित्रगोत्री यांनी इन्सुलिन सारखे औषध शिरेत सुईने टोचण्याच्या पद्धतीला विराम देत सुईविरहित औषध देण्याचे तंत्रज्ञान विकसित केले. रोग्याच्या शरीराला किंचितही इजा न करता त्वचेवर लावण्यात येणाऱ्या औषधी चकतीमधून ते पोचवण्याची सोय केली. त्यांनी लावलेल्या शोधांचे १५० पेटंट त्यांच्या नावावर आहेत. डॉ. मीना नेरूरकर या प्रसूती आणि स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत. अमेरिकेत अनेक वर्षे यशस्वी कारकीर्द पार पाडल्यानंतर त्या आपल्या आवडीच्या क्षेत्राकडे वळल्या. कथ्थक, भरतनाट्यम व कुचिपुडी ह्या प्रकारच्या शात्रीय नृत्यात प्रावीण्य मिळविलेल्या डॉ. नेरूरकर यांनी 'कलाभवन' नावाची निर्मिती संस्था स्थापन केली. तिच्यामर्फत जवळपास ३० नाटकांची निर्मिती केली. त्यापैकी काही नाटकांचे लेखन, दिग्दर्शन करून स्वतः त्यात भूमिका केल्या. यातून मिळालेले नऊ लाख डॉलरहून अधिक मिळालेले उत्पन्न त्यांनी लोककल्याण्यासाठी दिले. चीन हा देश आपल्यासाठी शतूत्वाच्या पक्षातला. परंतु तिथेही आपले लोक आहेत आणि ते उत्तमपणे आपला जम बसवून आहेत. अमित विनय वाईकर हे 'डोहलर फूड अॅण्ड बेव्हरेज इन्ग्रेडिएंटस' या कंपनीत वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. मॉरिशस, इस्त्रायल येथे असलेले अनेक प्रगत मराठी बांधव, यांचीही माहिती या ग्रंथात आहे.

मराठीचा झेंडा अटकेपार फडकविणाऱ्या कर्तृत्ववान मराठी माणसांच्या कर्तृत्वाची, प्रतिभेची, शिक्षणातून मिळवलेल्या प्रावीण्याची दखल घेणे, त्यापासून इतरांनी घेणे, हा हेतू समोर ठेवून या ग्रंथाचे लेखन झालेले आहे. तो हेतू नक्कीच सफल होईल, असा हा ग्रंथ आहे.

**मूल्य ६५० रुपये सवलतीत ४०० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**परतवाडा आणि बरेच काही**

**संपादन : अरुण शेवते**




**मागे वळून पाहताना...**

'परतवाडा आणि बरेच काही...' हे अरुण साधू यांचे लेखांचे पुस्तक. सहा लेख असलेले. हे सर्व लेख वेळोवेळी एकाच दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेले आहेत. त्या दिवाळी अंकाचे नाव आहे 'ऋतुरंग'. या अंकाचे संपादक आहेत अरुण शेवते. शेवते यांनी त्यांच्या अंकासाठी नेहमीच वेगळेपण जोपासले आहे. ते वेगळेपण विषयाचे आणि त्यावर लिहिणाऱ्या लेखकांचेही. त्या त्या विषयास अनुसरून पुढे यथावकाश शेवते यांनी स्वतंत्र पुस्तके प्रकाशित केली, त्यातून त्यांचे वेगळेपण कायम राहिले, जोपासले गेले. तीच परंपरा कायम ठेवणारे हे पुढचे पाऊल, एकाच लेखकाचे त्याच्या विविध लेखांचे पुस्तक. अरुण साधू हे बहुआयामी असे व्यक्तिमत्त्व. शिवाय 'ग्रंथाली'च्या संस्थापकांपैकी एक. त्यामुळे सुदेश हिंगलासपूरकर यांचे नाते अतिशय धनिष्ठतेचे. त्याच आत्मीयतेने त्यांनी या पुस्तकात आपले मन मोकळे केले आहे. अरुणा साधू यांनी यांनीही या पुस्तकनिर्मितीचे मनापासून स्वागत केले आहे. ग्रंथालीने त्यांच्या चळवळीच्या वाटचालीशी समांतर असलेले एक चांगले पुस्तक वाचकांच्या हाती देऊन साधूचा प्रथम स्मृतिदिन त्यांच्या आगळ्यावेगळ्या प्रद्धतीने साजरा केला आहे.

पं. जवाहरलाल नेहरू यांचे व्यक्तिमत्त्व उमदे आणि राजकारणात सर्वमान्य. राजकारणात ते जितके अग्रभागी तितकेच ते लेखक म्हणून ख्यातकीर्त. त्यांच्या प्रेमभावना आणि त्यांच्या नावाशी जोडलेल्या काही स्त्रिया यांची ओळख सर्वांनाच आहे. परंतु त्यात आणखी एक नाव आहे, पद्मजा नायडू (सरोजिनी नायडू यांच्या कन्या). त्यांना पं. नेहरूनी लिहिलेली पत्रे यात दिलेली आहेत. पं. नेहरूंची पत्रे चटका लावणारी, खिळवून ठेवणारी आहेत. अतिशय नेटकी, कमी शब्दातील आहेत. त्यातून नेहरूंच्या मनातील तरल भावना, रसिकता, संवेदनशीलता यांचे सुरेख दर्शन होते. त्यांच्या भाषेचे माधुर्य व पारदर्शीपणा चटकन लक्षात येण्यासारखा आहे.

इंदिरा गांधी यांना लाभलेले बालपण आणि पं. नेहरू यांनी त्यांना दिलेले संस्कार यांची ओळख 'जगावेगळे बालपण : इंदिरा गांधी' या लेखात आहे.

सगळ्यात लक्ष वेधून घेणारा आणि कायम लक्षात राहावा असा लेख म्हणजे 'आतला आवाज'. 'मला आग्रह करू नका. माझा आतला आवाज सांगतो आहे. काही झाले तरी मुकुट मी स्वीकारणार नाही. मला सत्ता नकोच होती... मी लढले ते या देशाच्या लोकशाहीसाठी. लोकशाहीचा गळा घोटणाऱ्यांचा पराभव करण्यासाठी.' हे त्यांचे उद्‌गार! सोनिया, त्यांचा राजीवच्या जीवनात झालेला प्रवास, त्यांचे सांसरिक भावविश्व, इंदिरा गांधी यांच्याशी असलेले त्यांचे संबंध, राजकारणात येण्याची कारणे, त्यांनी अनुभवलेले भयंकर हत्यातांडव, पक्षाची जबाबदारी स्वीकारण्याची अपरिहार्यता, अशा अनेक अंगांनी हा लेख सजलेला आहे. यात आलेले वर्णन आणि लेखकाने पत्रकार म्हणून केलेले साधार विश्लेषण थक्क करणारे आहे. एक मोठा विषय आटोपशीर लेखात प्रभावीपणे कसा मांडता येतो, त्याचे हे उत्तम उदाहरण होय.

पद्मभूषण देशपांडे यांनी साधूंची घेतलेली साहित्यिक मुलाखत, ही साधूंची लेखक म्हणून असलेली भूमिका समजून घेण्यास उद्‌बोधक ठरावी अशी आहे. साहित्यव्यवहार, पत्रकार, भाषा, आंतरराष्ट्रीय घडामोडी, असा मोठा आवाका असलेली ही मुलाखत आहे.

'परतवाडा आणि बरेच काही...' हा लेख साधूंच्या बालपणीच्या गावाविषयीच्या आठवणी सांगणारा आहे.

अरुण साधू यांचे लेखांचे पुस्तक वाचत असताना त्यांच्या वैचारिक प्रगल्भ पातळीचा जागोजागी प्रत्यय येत राहतो. राजकारणावर लिहीत असताना त्यातले बारकावे, खाचखळगे टिपावे लागतातच. परंतु त्याचवेळी संपूर्ण वातावरणाचा, परिस्थितीचा, डावपेचांचा आढावा घेत पुढे जावे लागते. त्याला सुसंगत अशी साधार साखळी जोडावी लागते, त्याचे समर्पक असे विश्लेषण करावे लागते. तारखा, ठिकाणे, व्यक्ती यांचे सदर्भ असावे लागतात. ती सगळी व्यवधाने सांधूनी अतिशय कसोशीने सांभाळलेली आहेत. एखादा सुंदर गोफ न दिसणाऱ्या नाजूक धाग्यांनी गुंफावा, तसे हे लेख आहेत. पं. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि सोनिया गांधी, यांच्या राजकारणांवर प्रकाश तर टाकलेला आहेच, परंतु त्यांचे आपसातले संबंध, सांसरिक जीवन, व्यक्तिगत पातळीवरील जगणे, त्यांचे भावविश्व, आवाका आणि मर्यादा, असा मोठा पट साधूंनी उलगडून दाखवलेला आहे. त्यांनी दिलेली वाक्ये ही काळाच्या आणि तर्काच्या कसोट्यांना पारखून आलेली आहेत, असे जाणवत राहते. 'स्वार्थकेंद्रित नेत्यांना वाऱ्याची दिशा सर्वात आधी कळते हे खरे, पण स्वार्थाच्या पलीकडे पाहण्याची वृत्ती नसल्याने त्यांना दूरचे दिसत नाही... व्यापक स्वार्थामध्ये स्वतःचा स्वार्थ शोधणाऱ्या पुढाऱ्यांमध्ये बऱ्यापैकी दूरदृष्टी असू शकते.'

पुन्हा पुन्हा वाचावे असे हे पुस्तक आहे.

गावाची आठवण, आपण बालपणी पाहिलेला – अनुभवलेला गाव आणि बऱ्याच काळाने दिसणारा गाव, यात कधीकधी खूप तफावत झालेली दिसते. काही नवीन उदयाला आलेले असते तर काही भग्न स्मृती जपताना दिसतात. अशाच एका भग्नतेचे प्रातिनिधिक चित्र मुखपृष्ठावर घेऊन ते सजवलेले आहे. परतवाडा आणि बरेच काही, या शीर्षकाशी साम्य दाखवणारे हे मुखपृष्ठ सजवले आहे सतीश भावसार यांनी.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

## लाखो इथले गुरू

**फ्रान्सिस डिमेलो**




**खडूंच्या सोबतीने...**

'विद्यार्थी, पालक आणि शिक्षक हा एक त्रिकोणच आहे. विद्यार्थी हा त्याचा शिरोबिंदू आहे; तर पालक आणि शिक्षक पायाचे दोन बिंदू! हे दोन्ही बिंदू जितके जवळ येतील तितका शिरोबिंदू उंच जाईल. याउलट जर हे दोन्ही बिंदू एकमेकांपासून दुरावले तर शिरोबिंदूवर असलेला विद्यार्थी खाली घसरल्याशिवाय राहणार नाही.' हे बोल आहेत विद्यार्थी आणि पालक यांच्याशी घनिष्ट नाते असलेल्या हाडाच्या शिक्षकाचे. सदतीस वर्षे मनोभावे ज्ञानदानाचे उदात्त कार्य करणाऱ्या अनुभवी ज्ञानवंताचे. शाळा, विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना समानतेच्या पातळीवर समजून घेणाऱ्या विचारवंताचे आणि जात, धर्म, उच्चनीचता यांच्या पातळ्या आडवळाने कधी आक्रमकतेने जपणाऱ्या हितचिंतकापेक्षा विश्वव्यापी माणुसकीच्या धर्माला प्राधान्य देणाऱ्या एका सहृदय माणसाचे! आपण, आपले व्यावसायिक क्षेत्र आणि त्याला लाभलेला परीघ, याच वर्तुळात वावरणारी माणसे अनेक असतात. मोठ्या पदावर पोहोचलेल्या विद्यार्थ्यांच्याच यशाचे माप आपल्या पदरात घेणाऱ्यांची संख्याही काही कमी नाही, परंतु असा कुठलाच भेदभाव न बाळगणारे काहीजण असू शकतात. शिक्षकच ज्ञानदान करू शकतो यावर अधिक भर देण्याऐवजी शिक्षकही विद्यार्थ्यांकडून शिकत असतो, असे मानणारे जे थोडेफार समग्रविचारी शिक्षक आहेत, त्यापैकी एक आहेत डिमेलो सर! सदतीस वर्षाच्या शिक्षकाच्या भूमिकेत वावरताना शाळा नावाच्या वावरात जे अनुभवांच्या आधारावर बरेवाईट पीक आले, त्याची रास त्यांनी या पुस्तकाच्या रूपाने वाचकांच्या समोर तयार करून ठेवली आहे. तिचे नाव आहे, 'लाखो इथले गुरू.'

हे अनुभव शाळा, तिचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक, पालक, शालेय उपक्रमांच्या निमित्ताने भेटलेली अनेक मोठी माणसे, माजी विद्यार्थी यांच्याशी निगडित आहेत. पाठ्यपुस्तकात जसे वेगवेगळे विभाग असतात आणि प्रत्येक धड्याला स्वतंत्र शीर्षक असते, तशी मांडणी या पुस्तकाची आहे. विद्यार्थी, शिबिरे, पालक, शिक्षक, शिपाई, सुसंगती, आणि पुन्हा शाळा, असे सात विभाग आहेत. या सर्व विभागात मिळून एकोणचाळीस लेख आहेत. त्यामुळे जे सांगायचे, ते आटोपशीर आणि नेमकेपणाने मांडता आलेले आहे. यात कुठेही शैक्षणिक तत्वज्ञानाच्या पाट्या टाकून पाल्हळिकपणाने पानेच्या पाने भरणारा मजकूर नाही. ज्यांच्याविषयी लिहिले आहे, त्यांना अवास्तव वाटेल असे रंगवलेले नाही. मुद्देसूदपणा म्हणून जो काही एक गुण असतो त्याचा प्रत्यय या लेखनात येतो. स्वतःचेच अनुभव सांगायचे म्हणून उगाच फापटपसाराही नाही. यात कुठे 'मी' मी डोकावत नाही. इतरांवर 'तो' मात करीत नाही. संथ आणि शांतपणे तसेच तितकेच संयमाने केलेले हे अनुभवकथन आहे. विद्वत्ता असूनही लेखनात त्याचे बोजडपण होणार नाही, याची काळजी घेतलेली आहे. समवयस्कांशी आपण जितक्या सहजपणे संवाद करतो, तसे लेखन आहे. त्यामुळे त्यातला अस्सलपणा उठून दिसतो. 'लाखो इथले गुरू' या शीर्षकावरून याची कल्पना यावी. शाळेत केवळ शिक्षकच गुरूच्या भूमिकेत वावरत असतो असे नाही. विद्यार्थी, पालक, व्यवस्थापन, शिपाई, उपक्रमाच्या निमित्ताने त्या त्या वेळी भेटणारी माणसे, ही गुरूपेक्षा कमी नसतात, असे इतरांना मोकळेपणाने आणि मोठ्या मनाने श्रेय देणारी वृत्तीच सारे काही सांगून जाते.

'गोखले एज्युकेशन सोसायटी'च्या अनेक ठिकाणी शाखा आहेत. त्यापैकी परळची आर एम भट शाळा येथे सरांनी बावीस वर्षे पुढे पंधरा वर्षे बोरिवलीच्या शाळेत, असे सदतीस वर्षे (१९७१ ते २००८) ज्ञानदान केलेले आहे. शिक्षक म्हणून कितीही विद्वान असलात, तरी गरज असते ती विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्याची कला अवगत करण्याची आणि स्वतःचा जम बसविण्याची. या गोष्टी साध्य झाल्या की मग पुढचा प्रवास सुखाचा होतो. यासाठी काय करावे लागले, याचा अनुभव सर देतात. वर्गात टारगट असलेला मुलगा पीटीच्या तासालाही टारगटपणा दाखवायला लागला, तेव्हा सरांनी त्यांच्यातला शिक्षक बाजूला ठेवून त्याला वठणीवर आणला. तो टारगट वठणीवर तर आलाच पण पुढे यशस्वीही झाला परंतु त्या एकाच प्रसंगाने इतर विद्यार्थ्यांना सर काय आहेत, याची कल्पना आली. हर्षद हा विद्यार्थीही तसाच. सगळ्या शिक्षकांनी त्याच्यासमोर हात टेकलेले, परंतु हर्षदच्या वागण्यामागचे कारण शोधल्यानंतर सरांची भावना बदलली. त्याला सगळ्या शिक्षकांनी सहकार्य करावे अशी विनंती केली. सुबोध, महेंद्र, मनीषा, रामाने, संगिता, संजय, सुल्या, चंदू, अशा अनेक विद्यार्थ्यांविषयीच्या आठवणी दिलेल्या आहेत. विद्यार्थ्यांना समजून घेणारा शिक्षक अशी ओळख त्यांनी निर्माण केली. जवळपास दोन ते अडीच हजार विद्यार्थ्यांची संपूर्ण नावे त्यांना पाठ आहेत. ते लिहितात, 'सर्वच मुले एकाच परिस्थितीतून येत नाहीत. मुलांची पार्श्वभूमी लक्षात घेऊनच आपण त्यांच्याशी वागायला हवं. विद्यार्थ्यांनाही भावभावना असतात. त्या शिक्षक समजून घेत नाहीत, त्यांना व्यक्त करायला संधी देत नाहीत. समजून घेणे, व्यक्त व्हायला संधी देणे हे शिक्षकांचे कर्तव्यच आहे.'

पालकांच्या सभा हा एक वेगळाच विषय असतो. यात पालकांचे अनेक नमुने अनुभवाला येतात. पालकांशी नाते जोडणे सरांना नेहमीच महत्त्वाचे वाटत आले. विद्यार्थ्यांसाठी अनेकदा ते पालकापर्यंत घरी पोहोचले. कधी त्यांना शाळेत बोलावून घेत. त्यातून एक वेगळे नाते तयार झाले. पालकांना सल्ला देतात, 'पालकांनी 'कंपल्शन' (सक्ती),'कंपेरिजन' (तुलना) आणि 'क्रिटिसिझम' (टिकास्र) हे तीन सी टाळणे आवश्यक आहे.'

या पुस्तकाला फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांची प्रस्तावना लाभलेली आहे. तर सुंदर मुखपृष्ठाची जबाबदारी सतीश खानविलकार यांनी उत्तमपणे सांभाळलेली आहे.

**मूल्य २०० रुपये   सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**माझ्या मनातलं**

**संपादन : अरुण शेवते**



**मनाचा तळ शोधताना**

'आपलं मन नदीसारखं असतं. ओढ्यासारखं खळखळाट करणारं असतं. वाऱ्यासारखं उधळणारं असतं. आपलं मन तळ्यासारखं शांत असतं आणि वादळासारखं अशांतही. आपल्या मनात आपण काय साठवून ठेवलेलं आहे हे आपलं आपल्याही कळत नसतं. आयुष्य जगत असताना आपलं मन घडत असतं आणि...सारं काही सांगून जात असतं...' 'ऋतुरंग' या रौप्य महोत्सवी दिवाळी अंकाचा विषय होता, 'माझ्या मनातलं.' त्याच दिवाळी अंकातील तेच शीर्षक असलेला निवडक लेखांचे हे पुस्तक आहे. संपादन केलं आहे अरुण शेवते यांनी. त्यांच्याच भाषेत सांगायचं तर या पुस्तकाचा क्रमांक आहे त्रेपन्नवा.

गुलजारांची दिग्दर्शक म्हणून कारकिर्दीला सुरुवात झाली त्याला कारण एन.सी.सिप्पी. सिप्पी हे स्वतः सिनेमा निर्माते, दिग्दर्शक म्हणून लौकिक असलेले. कामात, वागण्यात शिस्त असलेले. जे काम करायचे त्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनही शिस्तीत असलेला. माणूस निवडताना, त्यांच्यावर जबाबदारी सोपवताना त्याला पारखून घेण्याची उपजत कला, कुठल्याही चांगल्या कामासाठी वाटेल ती साहस करण्याची तयारी. यामुळे सिनेजगतात स्वतःचा दबदबा निर्माण केलेल्या सिप्पीसाहेबांच्या सोबत काम करण्याची संधी मिळणे ही गुलजार यांच्यासाठी मोठी भाग्याची गोष्ट ठरली. गुलजार पुढे स्वतःच्या कलेने, प्रतिभेने नामवंत व्यक्तिमत्त्व म्हणून उभे राहिले, त्यामागे सिप्पींचे मार्गदर्शन आणि सहाय्य मोलाचे ठरले. त्यांच्यासोबत काम करताना आलेले अनुभव, त्यांनी केलेली पारख, त्यांचा साहस दाखवण्याचा उदार दृष्टिकोन, हे सारे सांगताना, स्वतः मी कसा घडत गेलो, त्यात सिप्पी साहेबांचा वाटा किती महत्त्वाचा होता, याचे प्रांजळ कथन 'मेरे अपने...सिप्पीसाहेब' या लेखात गुलजार यांनी केलेले आहे.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे गायनाविषयीचे अनुभव हा सगळ्यांच्या उत्सुकतेचा विषय. सगळ्यात लक्षात राहणारा अनुभव आहे तो 'ऐ मेरे वतन के लोगो' या गाण्याविषयीचा. या गाण्याने क्रांती घडवली, तसे गैरसमजही पसरविले. मुळात हे गीत आशा भोसले गाणार होत्या परंतु ते त्यांच्या ऐवजी लताजींनी गायले, यात त्यांचा स्वार्थ होता, असे काही गैरसमज! ते समज या लेखाने दूर होतातच, परंतु एक वेगळा अनुभव सगळ्यांना हेलावून जातो. गाण्याच्या निमित्ताने उच्चारले गेलेले शब्द आनंदच देतील याची खात्री नसते. काही गाणी अजरामर होतात, पण त्यांनी दिलेल्या जखमाही अजरामरच असतात.'

'ग्रंथाली'चा गेली बेचाळीस वर्षांचा समृद्ध अनुभव गाठीशी असलेले सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या उपक्रमशीलतेविषयी 'ग्रंथालीतील माझे दिवस' या लेखात अतिशय आत्मीयतेने मन मोकळे केले आहे. कुमार केतकर, दिनकर गांगल आणि अरुण साधू यांचा सहवास लाभलेल्या सुदेशसाठी ग्रंथाली म्हणजे एक विद्यापीठच. तिचा चढता आलेख आणि ग्रंथालीसोबत स्वतःची होत गेलेली जडणघडणही ते मोकळ्या मनाने सांगून जातात. उदय निरगुडकर यांनी आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सांगताना कुटुंबातील प्रत्येकाविषयी अलिप्तपणे लिहिले आहे. 'आयुष्य म्हणजे नेमकं काय...?' या लेखात ही आत्मीयता आणि कृतज्ञता व्यक्त झाली आहे. 'ताई आणि माई' या लेखात गिरीश कुबेर यांनी या दोन आजींविषयी लिहिले आहे.

राजीव खांडेकर यांनी पत्रकारितेतील अनुभवांविषयी लिहिले आहे. वकिलाच्या सोबत सर्वोच्च न्यायालय सुद्धा ग्रहदूषित असू शकते, हा अनुभव 'न्यायालयाचा अवमान होईल' या कारणास्तव जाहीर करता आला नाही, त्याची त्यांना वाटत असलेली खंत. अजमल कसाबला फाशी देताना शासनाने पाळलेली कमालीची गुप्तता असून ती बातमी मिळणे, मिळालेल्या बातमीचा पाठपुरावा करताना करावी लागलेली कमालीची चिकित्सक कसरत, आणि आपल्या चॅनलवर सगळ्यांत प्रथम ती बातमी दाखविल्यात मिळालेला आनंद. पत्रकारितेची पथ्ये पाळताना येणारे अविस्मरणीय असे अनुभव म्हणजे पत्रकारासाठी मोठी शिदोरीच असते, तिचा प्रत्यय 'बातमी' या लेखात येतो.

याशिवाय संदीप वासलेकर यांचा 'माझ्या स्मरणातले जग' हा लेख, 'भेट तुझी माझी...' हा सुशीलकुमार शिंदे यांचा लेख, 'आम्ही दोघे ' हा नितीन गडकरी यांचा लेख, मनोहर पर्रीकर यांचा 'अधुरी एक कहाणी', निखिल वागळे यांचा 'सुकून' हा लेख, हे लेख स्वतःचे अनुभव, स्वतःची माणसे, त्यांच्याविषयीच्या आठवणी, अनुभव, स्वभाव मोकळेपणाने सांगतात.

या पुस्तकातील लेख हे आपापल्या क्षेत्रात लौकिक प्राप्त केलेल्या नामवंतांचे लेख आहेत. हे लेख अतिशय खाजगी स्वरूपाचे, कौटुंबिक नातेसंबधांचे आहेत. याविषयी फारसे कुणी असे जाहीरपणे मन सहसा मोकळे करीत नाही. परंतु इथे कुठलाही आडपडदा ठेवलेला नाही. मनातल्या जगण्याचे संदर्भ पारदर्शीपणे मांडलेले आहेत. आपण एका कुटुंबातील आहोत, एकत्र गप्पागोष्टी, संवाद करण्यासाठी आलो आहोत आणि त्याविषयी मनसोक्त असे बोलत आहोत, असे हे लेखन वाचताना जाणवत राहते. यातल्या काही लेखांचे शब्दांकन दुसऱ्यांनी केलेले आहे. परंतु ते वाचत असताना त्यात कुठे परकेपणा जाणवत नाही. कर्ता स्वतः आपल्यासमोर बोलत आहे, आपल्याशी संवाद साधत आहे, असेच वाटते. कुठलाही लेख वाचला तरी आपण त्याच्याशी एकरूप होतो, आणि नकळत पुढचा लेख वाचायचा मोह होतो. असे हे वाचनीय पुस्तक आहे.

माणसाचे मन हे फुलपाखरासारखे असते, अनेक रंगाच्या छटा असलेले. त्या छटांची प्रतिमा घेऊन सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ सुंदरपणे सजवलेले आहे.

**मूल्य १८० रुपये सवलतीत ११० रुपये**




# ग्रंथपान

### हे काही शब्द

**रत्नाकरी मतकरी**




**खोल गाभाऱ्यातला नाद**

रत्नाकर मतकरी यांचा परिचय एक गूढ–कथाकार आणि यशस्वी नाटककार, इतका मर्यादित नाही. वीस कथासंग्रहाबरोबरच सत्त्याण्णव नाटके, अठरा एकांकिका संग्रह आणि आत्मचरित्र, वैचारिक लेखसंग्रह, ललित लेखसंग्रह, कादंबरी, बालसाहित्य, असे विपुल साहित्य त्यांच्या नावावर आहे. म्हणजेच साहित्यातील सर्वच प्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळलेले आहेत. नाटक, सिनेमा, मालिका यातून कविता, गाणी यांनी यापूर्वीच आपली नाममुद्रा कोरून ठेवलेली आहे. त्यांचा कवितासंग्रह 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला आहे, त्याचे नाव आहे, 'हे काही शब्द'.

कुंती आणि विदुर यांच्या संवादातून निघालेले तत्त्वज्ञान हे आत्मपरीक्षणाचे आहे तसे आत्मवंचनेचे. वंचना ही गरीब–श्रीमंत, लहान–थोर, उच्च–नीच यावर अवलंबून असतेच, तशी ती जन्मावरही अवलंबून असते. हा जन्म उजाड माळरानावर होऊ दे नाहीतर राजमहालात. तिचा विखार कुठल्याही सन्मानाने शीतल होत नाही, कुठल्या राजवस्त्राने झाकला जात नाही. त्यातल्या जखमा अखंड भळभळत राहतात, अश्वत्थाम्याच्या जखमेसारख्या! कर्णाच्या वाट्याला आलेली वंचना, विदुराच्या वाट्याला आलेली वचंना तशी कुंतीची वंचना! विदुर आणि कर्ण हे दोघेही सूतपुत्र, त्यामुळे त्यांच्या वाट्याला आलेले भाग्य केवळ त्यांच्या जन्माशी जोडलेले आहे. त्याविषयी कुंतीच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द त्यांच्या सत्यतेचे दर्शन घडवितात,

माय बदलताच जात बदलते, आणि बदलते विधिलिखित नाहीतर माझ्या कर्णाचे का चुकले असते सारे गणित? या ओळी मग साकार होतात.

'टेकड्यांचा प्रदेश' या कवितेत टेकड्यांच्या मनोगतातून त्यांचा दृष्टिकोन चित्रित झाला आहे. या खुज्या वृत्तीच्या प्रवर्तकांना उंची लाभलेल्यांचे कौतुक नसतेच मुळी. उलट करायचाच झाला तर तो असतो हेवा, नकारात्मक भाव, आपल्यापेक्षा कोण कसा हीन आहे, हे सिद्ध करणे. अशा खुज्या लोकांच्या संख्येला कधी मर्यादा आढळत नाही आणि आज अशाच टेकड्यांचे प्रदेश जागोजागी पसरलेले दिसतात.

अलीकडे मोबाईल नावाच्या संपर्कमाध्यमाने खूप जणांना आपल्या संपर्कात जोडले आहे. त्याचा आपल्याला काही प्रमाणात अभिमानही वाटत असतो. त्यात दिवसागणिक भरच पडत जाते, कमी होण्याचे प्रमाण जवळजवळ नाहीच. कधी तटस्थपणे या जोडलेल्या माणसांच्या यादीकडे पाहिले तर, स्थळकाळानुसार त्यात बदल करण्याची खरच गरज असते आणि त्याप्रमाणे मन तयारही होते, नको असलेले संपर्क यातून वगळूया म्हणून परंतु प्रत्यक्षात तसे करायला पुन्हा मन राजी होत नाही, अशी ही अवस्था येते. मन उचल खाते. मोबाईलमुळे जी मानसिक आंदोलने तयार होतात, त्यांचे आवर्त या 'डिलिट' कवितेत वाचकालाच कवेत घेते.

'हे काही शब्द' याच नावाची एक दीर्घ कविता आहे, जी संग्रहाच्या अगदी सुरुवातीला आहे. लेखक, कवी यांचे आयुध म्हणजे शब्द. व्यक्त होण्यासाठी उपयोग होतो तो शब्दांचा. प्रतिभेचे धुमारे फुलतात ते शब्दांनी. कुणी, कुठे, कधी, कसे शब्द वापरायचे, हे पुन्हा स्थळकाळानुसार ठरते. शब्दांची किमया अगाध आहे, हे खरेच, परंतु या शब्दांच्या जातकुळीविषयी साहित्यिक किती जागरूक आहे, त्यांचा वापर किती चपखल करतो, त्यांचे संदर्भ आणि व्यक्तिमत्त्व जपण्याचा किती प्रयत्न करतो, हे अधिक महत्त्वाचे आहे. अन्यथा त्यांचे गुळगुळीत चमकतेपण तेवढेच दिसत राहील. जणू साहित्यिकांना सावधानतेचा इशाराच या कवितेतून दिलेला आहे. बालगीत कसे असावे, याचा सल्ला देणारी कविता स्वतंत्रपणे समाविष्ट आहेच.

'पुस्तकाचा वास' ही अशीच एक सुंदर कविता आहे. प्रत्येकाला त्याचा वास येतो तो त्याच्या वकुबानुसार, परंतु जो पुस्तकप्रेमी आहे, त्याला जो वास येतो, तो असतो फक्त पुस्तकाचा. त्यात अनेक संदर्भ जोडलेले आहेत. 'विकते इथं; पिकत नाही','नाते : अखंड आणि अनंत', 'निरर्थाचा महापूर', 'दिवाळी येईल' 'शांतता' अशा इतरही अनेक सुंदर कविता या संग्रहात आहेत.

या संग्रहाची दोन भागात विभागणी करण्यात आलेली आहे. पहिला भाग हा 'कवितांचा' आहे. यात आलेल्या कविता या दीर्घ स्वरूपाच्या आहेत. त्यांच्यासाठी मुक्तछंदाचा वापर केलेला आहे, परंतु त्यांच्यात असलेली लय आणि बहुपेडी आशयाचा असलेला अतूट धागा वाचताना खिळवून ठेवतो. कविता सूत्ररूपाने येते तसे तिचे संदर्भ काळाशी संघर्ष करीत येतात, त्याला आपल्या प्रभावाशी जखडून ठेवतात. अनेक स्तरावरील खोलवरच्या नादाला ते मोकळे करू पाहतात. तर दुसरा भाग हा 'नाटक व इतर माध्यमातील निवडक गाणी' असा आहे. यात सूत्रधाराने, समूहाने नाटक पुढे नेण्यासाठी गायलेल्या गीतांचा समावेश आहे. तसेच नाटकातील कथानकाचा भाग म्हणूनही आलेली गीते आहेत. अर्थात ज्यांनी नाटके पाहिलेली असतील, त्यांना ती पट्कन आठवतील.

या संग्रहाला कवी आणि अभिनेता सौमित्र आणि संगीतकार यशवंत देव यांच्या प्रस्तावना लाभलेल्या आहेत. यशवंत देवांनी संगीत दिलेली गाणीही यात आहेत. कविता आणि गाणी अशा दोन्ही काठांना जोडणाऱ्या या प्रस्तावना आहेत. या संग्रहात रत्नाकर मतकरींनी कवितांना अनुरूप अशी रेखाचित्रे रेखाटलेली आहेत. त्यांच्यातली तरलता कवितेइतकीच उत्कट आहे. या संग्रहाचे मुखपृष्ठ देखील त्यांनीच सजवलेले आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**मु.पो. आई**
**संपादकांचं मातृस्मरण**
**संपा. संदीप रामराव काळे**




## शोध आईच्या गावाचा!

संदीप काळेंनी माध्यमांतील जाणकार संपादक मंडळींचे संपादित केलेले सगळे लेख वाचले तर जाणवतं की, आई म्हणजे प्रतिकूलतेशी अव्याहत झगडणारी, मुलांच्या भल्यासाठी तगमगणारी, कधी हळवी; तर कधी खंबीर, मुलांना घडवणारी वात्सल्यमूर्ती असते. बऱ्याचदा आवर्जून केले जातात ते उपचार ठरतात आणि नकळत झालेले संस्कार होतात. असे संस्कार घडून येण्यासाठी आईचं स्वतःचं जीवन हा एक धडा असतो. या पुस्तकाच्या पानोपानी निःस्वार्थ सेवेचं, क्षमाशीलतेचं आणि स्थितप्रज्ञतेचं दर्शन सर्वच लेखांमध्ये घडतं. खासदार शरद पवार यांची या पुस्तकाला समग्र अशी प्रस्तावना लाभली आहे, तिच्यातला हा अंश. ही प्रस्तावना म्हणजे या पुस्तकाचा शिरपेच म्हणता येईल.

संदीप काळे हे पत्रकारितेतील हुकमी नाव. लेखनाच्या सोबतच अनेक सामाजिक चळवळींशी नाते ठेवून युवकांमध्ये प्रेरणा चेतवण्याच्या कामात ते सक्रिय आहेत. या पुस्तकाची संकल्पना कशी पुढे आली याची माहिती ते त्यांच्या मनोगतात देतात. खरेतर पत्रकार बातमीचा उगम सहसा सागत नाहीत. परंतु संदीप काळे यांनी तो मोकळेपणाने सांगितला आहे.

खासदार कुमार केतकर म्हणजे लेखक, संपादक, वक्ता, आणि चिकित्सक निर्भीड सडेतोड पत्रकार! प्रवासात गप्पांच्या ओघात काळेंनी त्यांना एक प्रश्न विचारला, 'सर, तुमच्या वैचारिक बैठकीचा पाया कसा रचला गेला?' 'आईच्या इराद्यांचा हा असर आहे. माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी मी माझ्या आईला बरेचसं श्रेय देईन.' हा तो संवाद. यातून आईच्या गावाचा शोध घेण्याचे बीज रूजले. पत्रकारांना आपली बातमी शिळी होऊ द्यायची नसते. अवघ्या एका वर्षभरात हे पुस्तक वाचकांच्या हाती आले.

एकूण एकतीस संपादकांनी आईविषयीचे लेख लिहिले आहेत. विषय सोपा तितकाच अवघड, हळवा तिकाच कठीण. समोर दिसणाऱ्या पाऱ्याच्या थेंबासारखा इवलासा पण चिमटीत न पकडता येणारा. सागरासारखा अथांग, कवेत न मावणारा. अनेक परिमाणे असलेला तरी समग्रपणे नीट न मांडता येणारा. मातृत्व, प्रेम, वात्सल्य, माया, ऋजुता एका बाजूला, संस्कार, शिक्षण, सांभाळ, कष्ट अशा अनेक आघाड्यांवर करावी लागणारी कसरत, तरीही आकाशी झेप घेताना नजर पिलांवर ठेववणारी; स्वतःचे स्वपण सोडून संसार नावाचा गाडा सांभाळणारी, इतरांसाठी कणाकणाने चंदनासारखी झिजणारी, ही दुसरी बाजू. या सगळ्यांत प्रत्येकाला आपली आई दिसतेही आणि तरीही तिचे वेगळेपण त्या वयात न दिसणारे. कधीतरी वयाच्या एका टप्प्यावर स्वत:च्या आताच्या वाटचालीचा मागोवा घेण्याची सवड मिळते, तेव्हा सगळ्या गोतावळ्यात केंद्रभागी कोळ्याच्या जाळ्यात असल्यासारखी आई दिसू लागते, तिचे आईपण उमगू लागते.

कुमार केतकरांनी आपल्या वैचारिक अधिष्ठानाचे केंद्र आई असल्याचे स्पष्ट केले, त्यावेळी हेही लक्षात येते, आईची स्वतःची ठाम अशी वैचारिक बैठक देखील तितकीच प्रगल्भ होती. तिचा साहित्य, संगीत, कला यांचा व्यासंग आणि कर्तबगारी कितीतरी अनेक पटीने अधिक होती. मधुकर भावे लिहितात, 'वडिलांना गांधी हत्येनंतर अटक झाली. त्याकाळात आईने द्रौपदीची थाळी कुठून आणली होती ते कधीच कळले नाही, परंतु आईने कधी उपाशी झोपू दिले नाही, कशाची कमी पडू दिली नाही. घरातच वेदशाळा असल्याने स्वतः शिकलेली नसतानाही तिला संस्कृतमधली अनेक वचने, गायत्री मंत्र, व्यंकटेश स्तोत्र, रामरक्षा, भीमरूपी तिला पाठ होते. परवचा, भीमरूपी, व्यंकटेश स्तोत्र म्हटल्याशिवाय जेवण मिळणार नाही, हा तिचा पाठ होता.'

राजीव खांडेकर लिहितात, 'सदैव गोड बोलणे, लहान थोरांशी प्रेमाने वागणे, अंगी कायम नम्रता बाळगणे, मोठ्यांविषयी आदर बाळगणे, या आईच्या अंगी असलेल्या वैशिष्ट्यांच्या वाटेने अबोलपणे चालतो आहे. आवडलेल्या कथा लिहून काढणारी आई ही एकमेव म्हणावी लागेल.' अभिनंदन थोरातांची आई आपल्या कुटुंबाप्रमाणेच देशाचाही विचार करते. १९६२ च्या चीन आक्रमणाच्या वेळी या माऊलीने स्वतःचे मौल्यवान सर्व दागिने संरक्षण दलाच्या मदतीसाठी दान केले. हे मन जितके उदार होते तितकेच खंबीर. एका प्रसंगी मुलावर कठीण प्रसंग गुदरला तेव्हा ती ठामपणे पाठीशी उभी राहिली आणि म्हणाली, 'तू जर खऱ्या आईचे दूध प्यायला असशील तर कसल्याच प्रकारच्या दबाला बळी पडणार नाहीस.' भरतकुमार राऊत यांच्या मातेने तर दुधाचा रतीब घातला, घरात इंग्रजी वृत्तपत्र असावे म्हणून. प्रवीण बर्दापूरकर यांच्या आईच्या वाट्याला दोन गोष्टी होत्या, अतिशय सुंदर असे नितळ गोरेपान असे रूप आणि सतत कष्ट, कष्टच. कितीही कसेही कष्ट पडले तरी त्यांचा कधी ओझे म्हणून अव्हेर केला नाही. ती गावची डॉक्टर म्हणून ओळखली जायची. कधी कष्टापुढे पुढे झुकली नाही. वसा म्हणून त्याकडे पाहिले. तसा कुठल्या परिस्थितीत मनाचा खंबीरपणा कधी सोडला नाही.

या पुस्तकात अनेक थोर संपादकांनी आपल्या आईविषयी मन मोकळे केले आहे. प्रत्येकाच्या आईचे वेगळेपण यातून दिसून येत असले तरी शेवटी आई ही एकच आहे. सर्व नात्यांना जन्म देणारे, त्यात सामावणारे आई नावाचे गाव. यात प्रत्येकाची लेखनाची शैली ही कमावलेली आहे. नेमकेपण टिपण्यात प्रत्येकाची हुकुमत आहे. आई विषयी सांगताना तो काळ, आप्त, घरची परिस्थिती, स्वतःचे बालपण, जडणघडण याचेही मनोज्ञ असे वर्णन ओघाने येत जाते. संदीप काळे यांनी प्रत्येकाच्या मनात असलेले मातृस्मरण उत्तमपणे संपादित करून वाचकांना अंतर्मुख केले आहे. लेखांच्या सोबत सुरुवातीला त्या-त्या लेखकाचा फोटोसह परिचय दिलेला आहे. यातून त्या लेखकाचा परिचय होतो. हे पुस्तक वाचताना प्रत्येकाला यात आपली आई इथे मुक्कामी आहे, असे नक्की वाटेल. नयन बारहाते यांनी सजवलेले मुखपृष्ठ म्हणजे ममत्वाचे सुरेख शिल्पच म्हणायला हवे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**गाव कुठे आहे?**
**संजीवकुमार सोनावणे**




**नादंणाऱ्या गावाच्या कथा**

गावाकडच्या कथा म्हटल्या की गाव प्रथम नजरेसमोर उभा राहतो. मग गावातली माणसे, त्यांचे आपसातले संबंध, राजकारण, गाववस्ती, शेती, शेतमजुरी, बोली, असे विविध स्तरांना आपल्यासोबत जोडून घेणारे गाव दिसू लागते. कुटुंबातील संवाद, मतभेद ही आणखी त्यात भर घालणारी गोष्ट. तरीही गावातली प्रत्येक व्यक्ती ठळकपणे नजरेसमोर कायम राहते, तिच्या गुणदोषासह. बोलण्याची पद्धत, वागण्याची रीत, खेळवण्याची तऱ्हा, माणसागणिक वेगळी असली तरी ती गावाची ओळख असते. या गावाकडच्या कथा 'गाव कुठे आहे?' या संग्रहात वाचायला मिळतात. या कथांना दोन विभागात विभागलेले दिसते. ही कथा ग्रामीण जशी आहे, तशी ती गावगाड्याबाहेरच्यांची देखील आहे. तरीही ती एकसंध अशी जोडलेली आहे. नाण्याच्या दोन बाजू असल्यातरी नाणे एकच असते. असा एकजीव कथांचा हा संग्रह घेऊन आले आहेत डॉ. संजीवकुमार सोनवणे. जे लेखक, कवी आहेत, संशोधक आहेत, त्यांच्या कविता आणि कथांचा समावेश उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात करण्यात आलेला आहे.

या कथांचे वेगळेपण प्रथमतः लक्षात येते ते त्यांच्या बोलीभाषेवरून. ही खानदेशातील बोली आहे. तिचा ढब, आक्रमकपणा, तिथले वेगळे शब्द, उच्चारण्याची पद्धत, हा सगळा वेगळाच बाज आहे, तिथल्या वांग्याच्या भरितासारखा. शहरी माणसांना समजून घेताना थोडी झटापट करावी लागेल. परंतु ती कळू लागते कथेच्या ओघात तेव्हा मात्र मन हरखून गेल्यासारखे नक्कीच होते. दुसरा लक्षात येणारा प्रकार आहे तो म्हणजे, 'गावकूस आणि गावकुसाबाहेर' अशा दोन्हींच्या परिघात नांदणाऱ्यांच्या कथा या संग्रहात आहेत. गावकुसाबाहेरच्या कथा लिहिताना एक वेगळेच निरीक्षण आवश्यक असते. त्याचा परिचय नसेल तर कथा आत्मा हरवल्यासारखी कृत्रिम होण्याची शक्यता असते, परंतु या कथासंग्रहाबाबत असे झालेले नाही. या लघुकथा आहेत. त्यांचा आवाका एका बिंदूवर केंद्रित असावा असा, नेमकेपण सांगणाऱ्या आहेत. लेखकाचा हा पहिलाच कथासंग्रह असला तरी आपली झेप कशी असेल याची प्रचीती देणारा संग्रह आहे.

'सायजा' या कथेत नवऱ्याच्या व्यासनापायी सायजा संसाराची जबाबदारी कामधंदा करून पार पाडते आहे. कामावर जाताना खाटेवर खिळलेल्या नवऱ्याच्या नाकर्तेपणावर ती खेसकते, 'पी-पी भागला न् बसला माह्या करमाची कातडी काढत!' परंतु ती सायजा कामावरून आल्यानंतर लेकीला जिलेबी देते तेव्हा बजावते, 'तुझ्या बाला एखाद् तुकडा ठीव गं!' 'पंचायत' या कथेत आरक्षणामुळे पंचायतीत सरपंच म्हणून निवडून आलेली रत्ना, गावाचा विकास करू पाहते. परंतु अनेक वर्षे सरपंच असलेला रायबा पाटील तिला फक्त सह्याजीराव ठेवून सगळा कारभार आपल्या हाती घेतो. हे लक्षात आल्यानंतर रत्ना सावध होते आणि स्वतः खंबीरपणे उभी राहते. 'सावित्रीमाईले नही का लोकेस्नी तरास दिधा... तरी ती माय बधनी नही...तिन्ही स्त्री शिक्षण दिसन आम्हना उद्धार करा की नाही? मी पन मागे हाटाव नही... ग्रामपंचायतमा जासू..रायबा पाटीलनी 'पंचायत' करसू..गावना विकास करसू.' सायजा, रत्ना प्रमाणेच दमयंती, नेहा, सायतारा, बायजाबोय या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा या कथांमध्ये आहेत. त्या परिस्थितीशी दोन हात करताना आपला कणखरपणा सोडत नाहीत. कणा मोडल्यासारख्या शरण जात नाहीत. '...माय बाईना जनमच आसा ऱ्हास...आपलेबी इज्जत प्यारी ऱ्हास...पण आते कई नही...आपणबी डंडार ऱ्हाववो...आसासले उपटी मारवो.'

डॉ. बाबासाहेबांची शिकवण, चळवळ, आरक्षण, बॅकलॉग यांच्याशी संबंधित काही कथा आहेत. 'बॅकलॉग' कथेतील प्रा. पवार हे चळवळीच्या जोरावर कॉलेजमध्ये बॅकलॉग भरण्याच्या म ागणीतून आपला स्वार्थ साधून घेतात आणि त्यानंतर चळवळीकडे पाठ फिरवतात. 'कार्यकर्ता' या कथेत नगरपालिकेने कामावरून काढून टाकलेल्या सफाई कामगारांसाठी उपोषण करणारा भीमनगरमधला कार्यकर्ता शेवटी एकाकी पडतो. इतका की शेवटी घरातलेही त्याच्या विरोधात उभे राहतात. समाज सुधारण्याच्या नादापायी घराचा बट्ट्याबोळ झाला त्याचे काय, असा प्रश्न विचारतात. 'डोळ्यांतला पाऊस' या कथेतला कार्यकर्ता सामाजिक चळवळीतील कार्यकर्ता होता. आता तो राजकीय चळवळीचा कार्यकर्ता झाला. त्याच्यातला कार्यकर्ता व्यसनाच्या आहारी गेला. समाज चळवळीच्या कार्यकर्त्यावर भाळलेली ती मात्र उध्वस्त झाली.

दुष्काळाचा परिणाम केवळ शेतकऱ्यावरच होतो असे नाही, शेतमजुरांवरही होतो. आत्महत्या करून प्रश्न सुटत नाहीत. गावात चारदोन टपऱ्या टाकल्या म्हणजे विकास झाला, गाव बदलले, असेही होत नाही. नोकरी सुटल्यानंतरचे जगणे आणि निवडणुकीत पोळी भाजून जगणे, हाही विरोधाभास अस्वस्थ करणारा आहे. एक आश्वासक कथासंग्रह लेखकाने वाचकाच्या हाती दिला आहे. यातला ओघवता प्रवाह, भाषेवरील अधिकार, बोली भाषेची परिमाणकारकता लक्षात येणारी आहे.

या कथासंग्रहाला योगीराज वाघमारे यांची अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावना लाभलेली आहे. गावगाड्याचे बोलके चित्र सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर रंगवलेले आहे.

**मूल्य १२० रुपये   सवलतीत ७० रुपये**

# ग्रंथपान

**कितीदा नव्याने तुला आठवावे**
**संकल्पना : मंदार आपटे**
**शब्दांकन : श्रेयसी वझे-मंत्रीवादी**




**सुरांच्या हिंदोळ्यावर**

'पहिल्या वहिल्या गोष्टी या सहजतेने हाती पडत नाहीत हेच खरं. पण त्या नेहमी खास असतात. कारण, पुढच्या प्रवासात त्याच आपल्या गुरू होतात. कधी – कधी आपल्या पहिल्या प्रयत्नांना तितकंसं यशही मिळत नाही. पण पुढच्या यशाचा पाया घालण्याचं काम मात्र नक्की होतं.'

एखादे गाणे हे माणसाचा कब्जा घेते आणि माणूस गाणेमय होऊन जातो. गाणे माणसाला स्थळकाळ विसरायला लावते. सुखदु:खात साथ करते तेही गाणेच! गाणे माणसाला आत्ममग्न करते. माणूस जेव्हा एखादे गीत गुणगुणत असतो स्वतःशीच, तेव्हा समजावे, हे गाणे नव्हे, ते गुणगुणाऱ्याचे गाणे जगणे आहे. एक काळ असा होता की, सतत गाणी कानांवर येत असत. ती इतकी मधुर असत की, माणूस नकळत ते स्वतःशी गुणगुणत असायचा. ज्यात जीवनरस आहे, सजीव स्वर आहेत, भावभावनांचे उत्कट खेळ आहेत, ती गाणी आपोआप माणसाला आपल्याकडे ओढून घेतात. आणि माणूस त्यांच्या मोहिनीत एकरूप होतो. असेच एक गाणे आहे,

कितीदा नव्याने तुला आठवावे
डोळ्यांतले पाणी नव्याने वहावे

'ती सध्या काय करते?' या सतीश राजवाडे यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटातले हे गाणे आहे. हे गाणे लिहिले आहे देवयानी कर्वे – कोठारी यांनी. या गीताला संगीताचा साज बहाल केला आहे तो मंदार आपटे यांनी. स्वरसोबतीला आहेत आर्या आंबेकर. संगीत दिग्दर्शक म्हणून मंदार आपटे यांचा हा पहिलाच चित्रपट. मंदार आपटे यांची संगीतकार म्हणून खरी कारकीर्द सुरू झाली ती २००४ सालापासून. नऊ अल्बम, नव्वद गाणी, अशी मोठी कामगिरी त्यांच्या नावावर कोरली गेली आहे ती तेव्हापासून. याची यादीही त्यांनी या पुस्तकाच्या शेवटी दिलेली आहे. असे असले तरी त्यांची वेगळी ओळख किंवा 'संगीतकार' म्हणून त्यांच्या नावावर मोहर उमटविण्यास जे गाणे कारण ठरले आहे, ते आहे 'कितीदा नव्याने तुला आठवावे.' या गाण्याला प्रतिसादही भरभरून लाभला. फोन, मेल, ई –मेल, यू ट्युब यावरून कौतुकाचा वर्षाव झाला. कुणी समक्ष येऊन दाद दिली. असा प्रतिसाद कुठल्याही कलावंतासाठी फार मोलाची भेट असते, कुठल्याही पुरस्कारापेक्षाही मोठी असते. यात कौतुकाचा भाग असतो तसे प्रोत्साहनही असते. आपले काम रसिकांना आवडते आहे, या सारखी भाग्याची दुसरी कुठलीच गोष्ट असूच शकत नाही कलावंतासाठी. यातून रसिक आणि कलावंत याचे जे वेगळे कलासक्त नाते तयार होते, तेही लौकिक नात्यापेक्षा वेगळे नितळ आणि निरपेक्ष असते. अशा सुहृद नात्याची जपणूक करणे हा खरा भावनिक आणि जिव्हाळ्याचा विषय.

'प्लेझर बॉक्स' हे व.पु.काळे यांचे पुस्तक असेच आहे, वाचकांनी त्यांच्या साहित्यावर केलेल्या भरभरून कौतुकाच्या वर्षावाचे. त्यांना आलेल्या पत्रांचे त्यांनी पुस्तक रूपाने हे रसिकप्रेम जतन करून ठेवले. इतरही साहित्यिकांनी असे प्रयोग केलेले आहेत. मंदार आपटे यांचे हे पुस्तक याच प्रवाहातील आहे. चाहत्यांची संख्या मोठी असली तरी निवडक असे शंभर अभिप्राय त्यांनी या पुस्तकात समाविष्ट केले आहेत. तसे हे काम कठीण होते. भाव व्यक्त करताना शब्दांच्या संख्येला महत्त्व नसते, परंतु पृष्ठांना मर्यादा असते. त्यामुळे 'निवडक'ला पर्याय नसावा. यात तंत्रज्ञ, कलावंत, यांच्याविषयी लेख आहेत, ज्यांचा थेट या चित्रपटाच्या, संगीताच्या, गाण्याच्या निर्मितीत सहभाग आहे.

नाना पाटेकर यांची प्रतिक्रिया तर खूपच बोलकी आहे. खरे म्हणजे नाना गाण्यावर दाद देऊन टीव्हीवर आणि समक्ष फोनवर मंदारला मनमोकळी दाद देतात, ही अप्रूप वाटावी अशी गोष्ट आहे. पण नानांनी ती दिलखुलासपणे दिली आहे. ती कशी आहे, त्याचा आस्वाद पुस्तकातून घेण्यातच खरी गंमत आहे.

सुकन्या मोने यांना खरंतर पुनर्जन्म लाभला की काय किंवा हे सारे सहन करण्यासाठीच त्यांचा जन्म झाला आहे की काय, अशी शंका यावी, इतके आयुष्याने त्यांना छळले आहे. तरीही त्याची सावली सोबत न ठेवता हसतमुखाने सहज वावर दाखवणारी सुकन्या वेगळी आहे, ते या पुस्तकातील लेखामुळे लक्षात येते. सतीश राजवाडे यांचे नाव दिग्दर्शन क्षेत्रात अग्रभागी आले खरे, पण त्यांचा प्रवास लाल गालिचावरून झालेला नाही, काटेरी मुकुट घालूनच झालेला आहे, हे त्यांच्या लेखामुळे कळते. संगीत संयोजन हा वेगळा प्रकार आहे. 'इंट्रो पीस' म्हणजे काय असते, हे अमित पाध्ये समजावून सांगतात. मुख्य ध्वनिमुद्रक यांचेही अनुभवविश्व वेगळे असते आणि इतर कुठल्याही कलाकाराइतकेच महत्वाचे आहे, याविषयीचा सौरभ कारजेकर यांचा लेख गाण्यासोबतच लक्षात राहावा असा आहे. देवयानी कर्वे-कोठारी, ऊर्मिला कानिटकर-कोठारे, नीलेश मोहरीर, तेजश्री प्रधान, विजय दयाळ यांचीही मनोगते यात आहेत. मंदारने आपल्या कामाविषयी, सहकाऱ्यांविषयी मन मोकळे केले आहे.

पुस्तकाची संकल्पना साकार करायची तर त्यासाठी अनेकांचे सहकार्य अपेक्षित असते. त्यातले मोठे सहकार्य म्हणजे या सगळ्यांचे संकलन करणे, शब्दांकन करणे. श्रेयसी वझे-मंत्रवादी यांनी ही जबाबदारी नेटाने आणि तितक्याच सहजपणे पार पाडली आहे. व्यस्त कलावंतांच्या वेळेत वेळ साधून त्यांना बोलते करणे, हवे तेच नेमके टिपून घेणे, कठीणच. पण त्यांनी ही जबाबदारी आपलेपणाने सांभाळल्याची दिसून येते.

या पुस्तकाच्या रूपाने गाण्याच्या आठवणींचे दस्तावेजीकरण होत असल्याचा आनंद सुनील बर्वे यांची प्रस्तावनेत व्यक्त केला आहे. दररोजच्या रियाजाचा विसर नको, हे सूत्र अनिल हर्डीकर यांनी मनोगतातून अधोरेखित केले आहे. समीर वैद्य यांनी कलात्मक असे सुंदर मुखपृष्ठ सजवले आहे. भावमुद्रा आणि रसिकमुद्रा यांचा हा संगम आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**फणा**

**पंढरीनाथ रेडकर**




**आकांक्षेच्या प्रतिमेतील चेहरे**

'प्रत्येकालाच प्रेमाची भूक असते, त्या जवळिकीची भूक असते. प्रत्येक भावनाशील माणसांची ती गरज असते. अनुदिनी अनुतापाने तापलेल्या, दमलेल्या माणसाची अशी एक कूस हवीच असते, की जिथे आपण हक्काने विरघळून जाऊ. सगळे काही विसरून त्या सावलीत शांत, निवांत पडू शकू. सर्जनशील माणसाला तर अशा सुखाची निवांत आवश्यकता असते.'

पंढरीनाथ रेडकर, हे साहित्यक्षेत्रात स्थिरावलेले एक नाव. साहित्यातील सर्व प्रकारांतील वाङ्मय निमिर्ती केलेली असून त्यासाठी त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित केलेले आहे. त्यात 'फणा' या नव्या कथासंग्रहाचा समावेश झाला आहे. एकूण सतरा कथांचा हा संग्रह असून तिच्यात 'हरितीर्थ' या ऐतिहासिक वळणाच्या कथेचा समावेश आहे. तशी ही कथा दीर्घ स्वरूपाची वाटत असली तरी ती एका कादंबरीचा विषय ठरावा, असा मोठा आवाका असलेली कथा आहे. इतर सर्व वाचून झाल्यावरही हीच कथा मनाभोवती विळखा घालून बसलेली आहे असा भास होतो. त्याचे कारण या कथेत असलेल्या अहिल्या, वसुंधरा आणि रुक्मिणी या स्त्रिया आणि त्यांच्या केंद्रस्थानी असलेला युवराज देवराय. प्रेम, आसक्ती, विफलता, द्वेष आणि शौर्य यांचा संगम या कथेत अनुभवास येतो. व्यक्तिरेखा आणि प्रसंगांची तर सुंदर गुंफण गुंफली गेली आहे.

'किनो' या कथेचे स्वरूप आणखी वेगळे आहे. ती कथाप्रकारचा एक वेगळा प्रयोग घेऊन येते. किनोच्या जगण्याचे वेगवेगळे किनारे कधी शारीरिक तर कधी मानसिक स्तरावर समुद्राच्या लाटांना झेलत असल्यासारखे दिसतात. तिला प्रश्न पडतो,' बाईने नवऱ्याची दासी म्हणून लाड का करावेत? तो आयुष्यभराचा सोबती असतो म्हणून? शय्यासोबती करतो म्हणून? तिचा रक्षणकर्ता म्हणून? मग तो तुडवायचे, शरीराची विटंबना करण्याचे का थांबवत नाही? सहकाऱ्याने तिच्याकडे वाईट मागण्या केल्यावर तो गप्प का बसतो? संततधार कोसळणाऱ्या पावसात चिखल-चिखल झालेली जमीन आणि स्वतः, यातले विलक्षण साम्य ती टिपते. 'मीरा' या कथेतील सुशिक्षित डॉ. मीरा अशाच शारीरिक आणि मानसिक छळाला सामोरे जाते. प्रेमाची भीक मागणारा डॉ. मनोहरच तिच्या सगळ्या स्वप्नांचा चक्काचूर करतो. तेव्हा तीच त्याला विचारते, 'आता मी माझं पालापाचोळा झालेलं जिणं घेऊन कुठे जाऊ?'

'आनंद वाटुनि घे...'मधील भामिनी कायस्थ, 'हृदयस्थ' मधील पांडुरंग, 'द्रोह' मधील सूर्यकर्ण चंद्रभान, 'घोर' मधील करवी; रुक्मिणी, यांची प्रत्येकाची एक स्वतंत्र ओळख आहे. आयुष्यात येणारे विफलतेचे आणि पारंपरिक समज-गैरसमजाचे हे बळी आहेत. कर्णासारखे. 'अग्निपुरुष' कथेत कर्णाच्या वाट्याला आलेले अनाथ सूतपण हे सूर्यपुत्राचे तेज अंगी असूनही त्यावर मात करते. अजिंक्य असा वरदान लाभलेला हा वीर आतून दुभंगलेला आहे. तो सल,द्वेष आणि त्वेष कुंती-मातेसमोर उघड होतो. कुंतीच्या मनातही वेगळे शल्य आहेच. हा संवाद आंतरिक भावनाचे दर्शन घडवतो. 'रिजेन्सी' मधील रिजेन्सीचे प्रेम आणि समजूतदारपणा हा तिच्या नितळ अशा निरागसपणाला आणि वयालाही शोभून दिसतो. त्याचे एकच कारण, दोघांचे एकमेकांवर असलेले निःसीम प्रेम. तशीच एक कथा आहे 'कविता' नावाची. दोघांचेही परस्परांवर उत्कट प्रेम आहे परंतु लग्न होऊ शकत नाही, तिची जात आडवी येते म्हणून. ही एकप्रकारे तिच्यासाठी फसवणूकच. ती त्याच्यापासून दूर होते कायमची, मात्र तेच प्रेम कायम हृदयात ठेवायची जिद्द ठेवून, अविवाहित राहून!

या कथा वाचताना लक्षात येते कीक, त्या तृतीय आणि प्रथमपुरुषी निवेदनातून प्रकटलेल्या आहेत. या कथांची बांधणी बांधेसूद आणि ठेवणीतली आहे. वातावरण, परिस्थिती यांच्याशी ती एकरूप झालेली आहे. त्यामुळे त्या कथेच्या परिघात वाचकाला खिळवून ठेवण्याची किमया लेखकाने चपखलपणे सिद्ध केलेली आहे. भाषेचा डौलही तसाच कथेचा डोलारा सांभाळणाराच नव्हेतर तिला सौष्ठव बहाल करणारा आहे. हे सौष्ठव प्रत्येक कथेच्या अंगोपांगातून नजरेस येते. या कथांचा स्थळकाळ,प्रदेश वेगवेगळा असला तरी सोबतीला निसर्ग आहे. जणू निसर्गाच्या रंगात घोळलेल्या या कथा आहेत. पाऊस तर सतत कथांमधून झिरपत राहतो, व्यक्तिरेखांच्या अंतःकरणात मुरलेला वाटतो. कवितांच्या ओळीही पावसाच्या सोबत येत राहतात. विशेष म्हणजे अनेक ठिकाणी पुराणकथा, इतिहास, चरित्र यांचे दाखले कथेच्या आशयाचा परीघ विस्तारताना दिसतात. त्यावरून लेखकाचे वाचन चौफेर असल्याची प्रचीती येते. कसदार अशा कथा लेखकाने वाचकांच्या हाती दिलेल्या आहेत, असे हमखास म्हणता येईल.

पुस्तकाची मांडणी वेगळ्या पद्धतीने केलेली आहे. तिला रेखाटनांची जोड दिलेली आहे. हे रेखाटन स्त्री-पुरुष इतके ढोबळ नाही, ते आहे नरमादीचे. सत्ता आणि शोषक, अहंकार आणि विफलतेचे. अग्नितांडव आणि रक्षेचे. तेच सूत्र मुखपृष्ठावरही अवतरले आहे. फुत्कारणारा भयप्रद असा नाग फणा उभारलेला. जो प्रत्येक पुरुषाच्या वृत्तीत सतत जागा असतो. त्याच्या मस्तकावर नागमणी आहे, जो भक्ष्याचे सारे आयुष्य क्षणात उद्ध्वस्त करतो. त्याचा लाल रंग धोक्याची दिशा दाखवतो तसा कपाळावर रेखलेल्या कुंकवाचाही प्रतिनिधी ठरतो. ज्याचा तोल सांभाळण्याची जबाबदारी दोघांवरही असते, परंतु तेच भान ऐनवेळी विसरले जाते. शीर्षकाला तोलून घरावे, असे हे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवले आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**